तथापि तव भक्तिनें तव अनुग्रहें या पदा,
प्रपन्नजन पावती, इतर भोगिती आपदा. ॥ ८१
येणें प्रसंगेंच उपासकांचे प्रकारही वर्णियले स्ववाचे, ।
सिद्धांत कीं, 'श्रीहरिभक्ति ज्यांला, ब्रह्मात्मताप्राप्ति घडे तयांला.' ॥ ८२
करि हरीच अनुग्रह जेधवां, अगुणिंचा महिमा मग तेधवां, ।
सहज एक चिदात्मपणें कळे सगुणिंचा महिमा तरि नाकळे. ॥ ८३
श्लोकद्वयेंकरुनि हेंचि वदेल आतां, टीकामुखें करिति जें सुख सर्व संतां; ।
आत्मज्ञता वदति शाब्दिक ते प्रसंगें खंडील येथ निजकेवळआत्मयोगें. ॥ ८४
तुझा अतर्क्य महिमा न कळे तथापि, जाणावयास महिमा अगुणस्वरूपीं, ।
पूर्वोक्त भक्त भजतां तुज योग्य होतो चित्तास चिन्मय करूनि तुतें वरीतो. ८५
योगीं निर्गुणिंचा कळे न महिमा भक्तिप्रतापें जरी,
आत्मानात्मविवेक तों गुरुमुखावांचूनि नेणे तरी; ।
सांगे श्रीगुरु आत्मता मग घडे सद्भक्ति सर्वेश्वरीं
तेव्हां निर्गुणिंचा कळेल महिमा दुर्बोध तो तोंवरी. ॥ ८६
दास्येंचि लभ्य हरिभक्ति असे तथापी, जे कां निजात्मरति केवळ चित्स्वरूपीं, ।
ते प्रीति तों जडशवांत तया निषेधी तो श्रीहरी गुरुपणें निजतत्वबोधी. ॥ ८७
जो निर्निमित्त सतत प्रिय हो! चिदात्मा, तो **वासुदेव** कळल्यावरि भक्तिवर्त्मा, ।
जाणोनियां करि अनन्य अखंड भक्ती तेव्हांच निर्गुणमहत्व कळोनि मुक्ती. ८८
याकारणें म्हणतसे **विधि** कीं, '**अनंता!** त्वद्दासही गुरुकरूनिच तत्वबेत्ता; ।
तूं विश्वरूप गुरु होउनि भेट देसी सर्वात्मतानुभवरूपहि तूंचि होसी. ॥ ८९
तूं विश्वरूप परि तूज गुरुत्व तेथें, कीं चित्त चिन्मय स्वरूप असेल जेथें, ।
तें चित्त चिन्मय सजीव जरी जनाचें मालिन्य तत्वविषयात्मपणें मनाचें.' ॥ ९०
याकारणें अमल चित्त असे जयांचें तें चित्त चिन्मय अखंड असे तयांचें, ।
याकारणें **विधि** म्हणे अमलांतरात्मे जे त्वन्मुखेंचि कळती निजबोधवर्त्में. ॥ ९१

---

१. प्रसादानें. २. शरण आलेले लोक. ३. ज्यावर हरीचा अनुग्रह झाला आहे असा (श्लोक
८१ यांत वर्णिलेला). ४. चित्तास आत्मस्वरूपज्ञानविशिष्ट करुन. ५. आत्मा काय आणि अनात्मा
काय याचा विचार; देहाच्या ठायीं शुद्ध निर्विषय जो ज्ञानांश तो मात्र मी, इतर देहादिक तें
अनात्मा होय, म्हणजे मी नव्हे असा जो विचार तो. ६. सुख. ७. जड प्रेतांत. ८. अकारण.
९. भक्तिमार्गी. १०. तत्व जाणणारा. ११. ज्ञानरूप. १२. मलिनत्व. १३. वास्तविक जें विषयांच्या-
ठायीं आत्मत्व त्याणें. १४. अमल (शुद्ध) आहे अंतरात्मा (अंतःकरण) ज्यांचा ते. १५. आत्मज्ञानाचे
वर्में=मार्ग.

हा आत्मशब्द मन चित्त शरीर बुद्धी बोले तरी प्रकरणानुगुणार्थसिद्धी, ।
या प्रस्तुतीं अमळ चित्त असा चतुर्थी हा आत्मशब्द धरणें हृदयीं समर्थी.॥९२

परम अमळ ज्याचे अंतरात्मे मुरारी !
वदनिंहुनि तयांच्या केवळात्मा विचारीं, ।
तदुपरि महिमेतें निर्गुणाच्या तुझ्या तो
हळहळ समजाया माधवा ! योग्य होतो. ॥ ९३

गुरुमुखें कळल्यावरि आत्मता, अगुणिंचा महिमा मग तत्वता, ।
कळतसे कळण्यासहि योग्यता, घडतसे म्हणतो विधि अच्युता. ॥ ९४

आत्मज्ञता द्विविध यास्तव या विचारें बुद्धीस शुद्धि म्हणवूनिच दोंप्रकारें, ।
शुद्धात्मता गुरुमुखें कळली तथापी आत्मज्ञ भक्ति करितां मिळतो स्वरूपीं. ९५

जरी हेमें तावोनियां ओप देती तयांतील त्या मिश्र धातू न जाती, ।
कैंसीं लावितां तें दिसे हीन सोनें तसीं शुद्ध चित्तें अहो ! भक्तिहीनें. ॥ ९६

करुनि विहित कर्मे साधिली चित्तशुद्धी,
श्रवणमननमात्रीं योग्यता हेचि सिद्धी; ।
जरि मन विघरेना सेवितां विष्णुलीला,
अकळचि महिमा हा निर्गुणाचा तयाला. ॥ ९७

कनक जेरिति घातल्या पुंटीं इतर धातु जळे मग शेवटीं, ।
कनक केवळ शुद्ध जसें उरे, अमळ चित्त तसें अगुणीं मुरे. ॥ ९८

आत्मज्ञ आत्मरतिनें भजती हरीला प्रेमें मनीं द्रवति सेवुनि विष्णुलीला. ।
होईल येरिति जसीजसि सत्वशुद्धी तत्वींच सत्व मुरतां अगुणात्मसिद्धी. ॥ ९९

जो स्कंध एकादश तेथ देवें हें उद्धवालागुनि वासुदेवें, ।
श्लोकद्वयें वर्णियलें, तयाचा भावार्थही वर्णिल कृष्णवाचा. ॥ १००

टाकी सुवर्ण मळ बाह्य हुताशनें तें तेंही पुंटीं द्रवविलें तरि शुद्ध होतें, ।

---

१. प्रकरणाला योग्य अर्थाची सिद्धि. २. सोनें. ३. कसोटीला. ४. उचित, योग्य. ५. भक्तिरसानें आर्द्र न होई तर निर्गुणाचा महिमा त्यास कळावयाचा नाहीं. ६. कळावयाचा नाहीं असा. ७. मुशींत, पुटपाकांत, पदार्थ चांगला गुंडाळून अग्नींत घालून तापवितात त्यास 'पुटपाक' म्हणतात. ८. चित्तशुद्धि. ९. अग्नीनें. 'यथाग्निना हेम मलं जहाति ध्मातं पुनः स्वं भजते च रूपम् । आत्मा च कर्मानुशयं विधूय मद्भक्तियोगेन भजत्यथो माम् ॥ यथा यथात्मा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः । तथा तथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवांजनसंप्रयुक्तम् ॥' (एकादशस्कंध-अध्याय). १०. सोनें रुपें इत्यादि शुद्ध करण्याची क्रिया.

भावें अशा विविध ताप वदे तयातें कीं तें पुन्हा द्रवविलें तरि शुद्ध होतें. ॥ १०१
ऐशीच शुद्ध जरि कर्म करूनि बुद्धी आत्मैक्यभक्ति करितां मग पूर्ण सिद्धी, ।
कर्मेंचि शुद्धि, परि आशय त्याच कर्मा, तोही त्यजी श्रवणकीर्तनविष्णुधर्मा. १०२
माझें कथाश्रवण आणिक नाम वाचे गातां धुतो जसजसे मळ हो मनाचे, ।
तत्वासही तसतसा अतिसूक्ष्म दृष्टी पाहे [1]मदात्मक चराचर सर्व सृष्टी. ॥ १०३
तत्व स्वयें स्थिरचरांतहि सिद्ध आहे, जो दृष्टि निर्मळ करील तयास पाहे, ।
चित्तांत जे रजतमोगुण त्यांस नाशी मद्भक्ति अंजन मनोमय लोचनासी. ॥ १०४
याकारणें गुरुमुखें समजोनि तत्व, भक्तीकरूनि जरि शोधिल शुद्ध सत्व, ।
तो एक निर्गुणमहामहिमेस पावे, पावोनि शुद्धि हृदयीं अगुणीं स्थिरावे. ॥ १०५
याकारणें गुरुमुखें म्हणतो विधाता, जाणोनि तत्व मग साधक तो, अनंता! ।
होईल योग्य अगुणीं महिमा कळाया पूर्वोक्त भक्त तव सेवक देवराया! ॥ १०६
ऐसें तथापिहि समाधिविणें कळेना, जो कां अनंत मनबुद्धिस आकळेना, ।
त्या निर्गुणीं मन [2]तदात्मकतेस पावे तेव्हां अनंतमय मानस तें ठसावे. ॥ १०७
सिंधूमधें लहरि जेसमयीं [3]निमाली गंभीरता तिस अलभ्यहि लभ्य झाली, ।
तैसें मुरे मन जई अगुणीं तयाचा तेव्हां अनंतमहिमा कळलाच साचा. ॥ १०८
कीं त्या अनंतमहिमेंत अनंत हेंही झालेंचि तन्मय जई न विरुद्ध कांहीं, ।
सिंधूंत [4]सैंधवखडा विघरोनि गेला त्याला समुद्र म्हणती न किमर्थ बोला? ॥ १०९
कैसें अहो! मन तदात्मकतेस पावे? त्याच्या अनंतमहिमेस कसें ठसावे? ।
तें बोलतो [5]कमळसंभव [6]उत्तरार्धीं श्लोकांत या न करितां बहु [7]शब्दवृद्धी. ॥ ११०
मन [8]अविक्रिय होउनियां मुरे, अगुण होउनियां अगुणी उरे, ।
म्हणुनि यास्तव तो महिमा कळे, इतर त्यास कदापि न [9]आकळे. ॥ १११
विषय तामस राजस इंद्रियें विमल केवळ सत्त्व मन स्वयें, ।
परि विकार तयास [10]गुणद्वयें अगुणि तें अगुणात्मक निश्चयें. ॥ ११२
परि न अच्युत तें मनही स्वयें, विषयही जड आणिक इंद्रियें, ।
करि मनास सचेतन आत्मता, परि न हें जन जाणति तत्त्वता. ॥ ११३

---

१. मी आहें आत्मा जिचा अशी (सृष्टि). २. तद्रूपतेस पावे, निराकारत्वास पावे. ३. शांत झाली, मिसळून गेली. ४. मिठाचा खडा. ५. कमळापासून संभव (उत्पत्ति) ज्याचा तो. (ब्रह्मदेव.) ६. सहाव्या श्लोकाच्या दुसऱ्या अर्धांत—'अविक्रियात्स्वानुभवात्' इत्यादि. ७. सविस्तर टीका न करतां. ८. विक्रिया(विकार)रहित. ९. समजे. १०. रज आणि तम या गुणद्वयानें.

दीप प्रकाशी नयनास जैसा, आत्मा प्रकाशी मनबुद्धि तैसा, ।
दीपप्रकाशेंचि घटादि दृष्टी, दिसे मना येरिति सर्व सृष्टी. ॥ ११४
ते दृष्टि दीपासचि पाहताहे, तेव्हां पदार्थापरतें न पाहे, ।
ध्यानीं मन स्वात्मसुखें निमालें तें[1] विक्रिया[2] टाकुनि तेंचि[3] झालें. ॥ ११५
म्हणुनि निर्गुणिंचा महिमा मना कळतसे म्हणतों मधुसूदना ! ।
विधि असे वदला, परि अंतरीं उपजला मनिं संशय यापरी. ॥ ११६
जरि मनें त्यजिल्यावरि विक्रिया अगुणिंचा महिमा कळतो तया, ।
तरि सुषुप्तिमधें[4] न पडे कसा ? अगुणिच्या महिमेंत मना ठसा. ॥ ११७
कमळसंभव मानुनियां असा हृदयिं संशय हा हरितो कसा ? ।
'मन सुषुप्तिविलक्षणता धरी,' म्हणुनि वर्णिल तो विधि यावरी. ॥ ११८
जरी विक्रियातें सुषुप्तींत सोडी, न जाणे तमोलीन[5] तेथील गोडी, ।
समाधीमधें तों चिदाकाशरूप मुरे निर्गुणीं स्वानुभूतिस्वरूप. ॥ ११९
सुषुप्तीमधें तों तमोलीनचित्तीं, नसे लेशही स्वात्मतेची प्रतीती[7]; ।
समाधीमधें स्वात्मतास्फूर्ति[6] जेव्हां न निद्रा, नसे विक्रिया त्यास तेव्हां. १२०
असी ते अवस्थात्रयातीत[8] तुर्या[9] विधाता असें बोलतो देववर्या, ।
प्रसंगें तया अद्वितीयानुभूती वदे ते पहावी विचारूनि संतीं. ॥ १२१
जें कां मन स्वानुभवीं स्थिरावे[10] तें निर्गुणाच्या महिमेस पावे, ।
निजात्मभूतीस्तव शुद्ध तुर्या जेथें कळे निर्गुण देववर्या. ॥ १२२
सुषुप्तिनें स्वानुभवें न जेव्हां, कीं स्वप्न कीं जागृति होय तेव्हां, ।
स्वप्नामधें आणिक जागरींही, उणें नसे स्वानुभवास कांहीं. ॥ १२३
या पूर्वपक्षास हरू पहातां तुर्याच ते स्थापितसे विधाता, ।
कीं निर्गुणी चित्त अरूप होतें अरूप त्याचा महिमा पहातें. ॥ १२४
स्वप्नीं निजानुभव आणिक जो प्रबोधीं[11], देहादिरूप न तसा वदवे समाधीं, ।
येथें निजानुभव केवळ जेथ कांहीं देहादि सर्वहि चराचररूप नाहीं. ॥ १२५
स्वप्नीं निजानुभव आणिक जो प्रबोधीं, नाहीं म्हणोनिच विलक्षणता समाधी, ।
हे स्वप्नजागृतिसुषुप्तिहुनी निराळी, तुर्या अरूप मन जेथ समाधिकाळीं. ॥ १२६

---

१. मन. २. विकार, परिणाम. ३. ज्याचें ध्यान केलें तेंचि. ४. गाढ झोंप. ५. तमांत लीन झाल्यामुळें, तमोव्याप्त असल्यामुळें. ६. अनुभव, प्रत्यय. ७. प्रतीति. ८. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था. ९. चवथी अवस्था, समाधिरूप चवथी अवस्था. १०. स्थैर्य पावे. ११. जागृतींत.

'अविक्रियात्स्वा[1]नुभवादरूपतो' श्लोकाचिया या चरणीं विराजतो; ।
तुर्येमधें ब्रह्मचि होय जेधवां, जाणे मन ब्रह्ममहत्व तेधवां. ॥ १२७
असा निर्गुणानंद तुर्येंत योगी अवस्थात्रयातीत होऊनि भोगी, ।
असें बोलतां येस्थळीं भेदवादी न हें मानिती अज्ञ जे कां अनादी.॥ १२८
अवस्थात्रयातीत होवोनि लक्षी तरी भिन्न तो बोलती पूर्वपक्षी, ।
न तुर्येंत या भिन्न तो ध्यानकर्ता, निवारील धाता असी भेदवार्ता.॥ १२९
'अनन्यबोध्यात्मतया न चान्यथा' अशा चतुर्था चरणांत सर्वथा, ।
न भेद येथें म्हणऊनियां विधी वदेल अद्वैतसुधा महासुधी. ॥ १३०
कळावया योग्य दुजें न जाणें तदात्मकत्वेंच तयास जाणें, ।
अनन्यबोधेंचि तयास पाहा समर्थ बोले विधि अर्थ तो हा. ॥ १३१
ज्याच्या अन्यपणें करूनि न घडे जाणावया योग्यता,
शास्त्रीं त्यास 'अनन्यबोध' म्हणती तेव्हां कसा तत्त्वता ? ।
जाणावा तरि आत्मतेकरुनियां जाणावया योग्यता,
यालागिं स्वचिदात्मतें करुनियां जाणेल तो जाणता. ॥ १३२
ऐक्येंचि हो ! वैष्णव तो तयाला जाणोनि ऐसा कृतकृत्य झाला; ।
जाणें तया द्वैतपणें न कोणीं वाणीसही [6]हे वदतेच वाणी. ॥ १३३
द्वैतेंचि जे भजति त्यांस न बोधसिद्धी, त्यांच्या श्रुती वदति कीं पशुतुल्य बुद्धी;।
मी अन्य दैवतहि अन्य म्हणोनि देही सेवी तया श्रुति म्हणें नकळेचि कांहीं. ॥
ज्ञानानिमित्त भजती जन अज्ञ देवा, तेव्हां घडे कसि तयासहि ऐक्यसेवा ? ।
भेदें भजेल मग त्यास अभेदसिद्धी हा पूर्वपक्ष करितो निगमार्थसिद्धी. ॥ १३५
अद्वैत हें निगमसिद्ध खरें तथापी, नाहीं मला अनुभव स्वसुखस्वरूपीं; ।
[11]तो, ईश्वरा ! मज घडो म्हणऊनि देवा जिज्ञासु[12] सेविल, तयास [13]फळेल सेवा. ॥
जे सर्वथा म्हणति अद्वयता घडेना, भेदाविणें इतर गोष्टिच आवडेना, ।
[14]जीवेशभेद दृढ साधुनि, वासुदेवा जे सेविती पशुसमान तदीयसेवा. ॥ १३७

---

१. स्वानुभवात्+अरूपतः. २. द्वैतवादी, जीव आणि परमात्मा हे वस्तुतः भिन्न होत असा जो द्वैतवाद त्याचा अभिमानी किंवा अनुयायी. माध्वमतानुसारी लोक हे द्वैतवादी होत. ३. द्वैतवादी. ४. अद्वैत (जीव आणि परमात्मा एक, अभिन्न असें मत) हेंच अमृत. ५. मोठा बुद्धिमान् ज्ञाता. ६. द्वैतपणानें त्याला कोणी जाणत नाहीं असा भाषणाला. ७. ज्ञानप्राप्ति. ८. 'अथ योऽन्यां देवतामुपास्ते सोऽन्योऽहमिति न स वेद यथा पशु' इत्यादि वचनें. ९. निगम=वेद. १०. वेदांत-प्रतिपादनानें निश्चित केलेलें. ११. तो अनुभव. १२. परमेश्वराला जाणूं इच्छिणारा. १३. फळ-दायिनी होईल. १४. जीव आणि ईश यांचा भिन्नपणा.

ज्ञानाविणें [1]अकळ अद्वय तत्त्व जेव्हां, ज्ञानार्थ जे भजति ऐक्य कळे न तेव्हां; ।
त्याला असें म्हणतसे [2]श्रुति हें घडेना निंदेस पात्र कुमताविण सांपडेना.॥ १३८
जे कां धरूनि दृढ [3]भेदमताभिमाना अद्वैत तत्त्व म्हणती सहसा घडेना; ।
मानूनि [4]भेदें जन जे भजती मुकुंदा त्यांचीच हे वदतसे श्रुति येथ निंदा. १३९
श्रुत्यर्थ हा मनिं धरूनि वदे [5]विरंची कीं अन्यथा भजति त्यांसहि सिद्धि कैंची? ।
याकारणें त्यजुनि भेद, निजात्मभक्ती जे कां जगीं करिति, पावति तेचि मुक्ती.॥
[6]आत्मज्ञता गुरुकृपेस्तव होय ज्याला [7]योगीं कळे [8]अगुणिंचा महिमा तयाला; ।
चैतन्यसागरिं मुरे लहरी गुणाची, तैं प्राप्ति येथ वदला विधि निर्गुणाची. १४१

गुरुवर अगुणात्मा बोधिती यासि जैसे
सगुण अगुण ऐसा सांगती तेचि तैसे; ।
तरि मग महिमेतें त्याचिया कां न पाहे?
म्हणउनि विधि शंका येथ हे वारिताहे. ॥ १४२

जरि सगुण गुणातें देखती संत संख्या,
तरि मग उपदेशीं बोधिती शिष्यमुख्या; ।
म्हणुनि गुरुमुखेंही बोलवेनात जेव्हां
[9]अकळचि महिमा हा सिद्ध हे गोष्टि तेव्हां. ॥ १४३

यालागिं हा भाव धरूनि आतां अगण्यता विष्णुगुणासि धाता ।
[10]श्लोकामध्यें या स्फुट वर्णिताहे आजन्म जो अंत गुणीं न पाहे. ॥ १४४
होती हितालागिं [11]चराचराच्या कीं मूर्ति तूझ्या जगदीश्वराच्या, ।
[12]अनंतकल्याणगुणें शरीरें म्हणे गुणात्मा तुज या विचारें. ॥ १४५
तूं जो असा त्या तुझिया गुणाला मोजावया [13]नीलसरोजनीला, ।
होती जगीं [14]शक्त असे न कोणी, अनंत तूझे गुण [15]चक्रपाणी! ॥ १४६
[16]कोळें करूनि धरणीरज मोजणारे, होतील मोजितिल्ही हिमबिंदु सारे; ।

---

१. कळावयाचें नव्हे असें. २. वेद. ३. जीव आणि ईश यांत भेद आहे—अशा मताच्या अभिमानाला. ४. ईश आणि जीव यांचा भिन्नपणा. ५. ब्रह्मदेव. ६. आत्मज्ञान. ७. योगद्वारा. ८. निराकार परमेश्वराचा. ९. अज्ञेय. १०. 'गुणात्मनस्तेऽपि' इत्यादि सातवा श्लोक. ईश्वराच्या सगुण रूपाचे गुण मोजण्यास कोणी समर्थ नाहीं असा याचा भावार्थ आहे. ११. पृष्ठ १८२ टीप ३ पहा. १२. असंख्य आणि कल्याणकारक गुण (धर्म) आहेत ज्याचे अशीं शरीरें तूं धारण करतोस, या विचारानें (या कारणास्तव) विधाता तुला 'गुणात्मा' म्हणजे सगुणदेहधारी असें म्हणतो. १३. निळ्या कमळासारखा आहे नीलवर्ण ज्याचा त्या तुला. १४. समर्थ. १५. पृष्ठ ३१७ टीप ३ पहा. १६. पुष्कळ काळानें (अनेक जन्म घेऊन) पृथ्वीवरचे रजःकण अथवा हिमाचे (दंवाचे) बिंदु मोजणारे असे लोक उत्पन्न होतील, पण तुझे गुण मोजणारे असे लोक होणार नाहींत.

होती समर्थ गणना किरणीं[1] कराया तूझे न मोजवति सद्गुण, देवराया!॥ १४७
वेदश्रुती वेदति[2] येरिति विष्णुसूक्तीं[3], 'विष्णोर्नुकं' म्हणुनि हे श्रुतिचीच उक्ती;।
संतांसही सगुणिचा महिमा कळेना, शिष्योपदेशविषयीं रसना[4] वळेना. ॥ १४८
जाणोनि याचिकरितां अगुणास योगी, ऐक्येंकरूनि भजती सगुणाचलागीं;।
आत्मैक्यभक्ति[5] करितांचि जनार्दनाची, आनंदसागरिं मुरे लहरी मनाची.॥ १४९

सगुण अगुण दोनीं विष्णुरूपें अनंतें;
कवण निपुण ऐसा कीं निरूपी[6] तयांतें ?।
परि अगुण चिदात्मा चित्त चिद्रूप[7] होतां
जितचि अजितभक्तां मुक्ति हो भाग्यवंतां. ॥ १५०

अगुणमात्र उपास्य[8] हरी जयां, सगुण भक्तिविणें नफळे तयां;।
म्हणुनि येरिति भारतिचा[9] पंती[10] विशद[11] बोलियला स्वपित्याप्रती[12]. ॥ १५१
अगुणमात्रउपासक साधनें ऋषिकुळीं करितील तपोधनें,।
तरिहि कां मन निर्गुण केवळीं न विघरे[13] म्हणती जरि येस्थळीं. ॥ १५२
तरि रमापतिच्या पदपंकजीं[14] न भजती रिझती[15] अगुणीं निजीं,।
अचुक मीपण[16] सत्पथ चूकवी[17] निजविलास अगम्यचि दाखवी. ॥ १५३
आम्हीं स्वयें 'ब्रह्म' म्हणोनि एकीं, शब्दात्मबोधें चिदचिद्विवेकीं,।
जाणोनि अभ्यास किमर्थ आतां ते मानिती शाब्दिक बोध होतां. ॥ १५४
म्हणति विप्र न विप्रपणा स्मरे, तरिहि विप्रपणास न अंतरे;।
जरि सुवासिणि[18] मी न म्हणे मनीं, तरि सुवासिणि ते मिरवे जनीं.॥१५५
अशा स्थूळ दृष्टीचिया या कुयुक्ती, बहू बोलती मानिती त्यांत मुक्ती,।
जरी ब्राह्मण ब्राह्मणत्वा स्मरेना, तरी शूद्र मी हें तयाला स्फुरेना. ॥१५६

मी सौभाग्यवती असें घडि घडी ते आठवेना जरी,
वैधव्यस्फुरणें न नापितगृहा[19] क्षौरार्थ जाते तरी;।

---

१. नभोगणांतील नक्षत्रतारकादिकांच्या किरणांची गणना. २. 'विष्णोर्नुक वीर्याणि प्रवोचं यः पार्थिवानि विममे रजांसि' इत्यादि विष्णुसूक्तांतील वचनें. ३. 'विष्णुसूक्त' हा स्तुतिपर मंत्र देवपूजासमयीं म्हणतात. ४. जिव्हा. ५. जीवात्म्याचा परमात्म्याशीं अभेद अशी भक्ति. ६. प्रतिपादन करी, वर्णी. ७. चिन्मय. ८. अर्चनीय, सेव्य. ९. वाणीचा. १०. स्वामी (ब्रह्मा.) ११. स्पष्ट. १२. विष्णूला. १३. विरून जाई. १४. चरणकमळीं. १५. रंजन पावती. ('रिझणें' = हा शब्द 'रंज् आनंद देणें' या संस्कृत धातूपासून निघाला आहे.) १६. अहंता. १७. दूर करी. १८. सुवासिनी=जिचा पति विद्यमान आहे अशी स्त्री, सौभाग्यवती. १९. न्हाव्याचे घरीं.

ब्रह्मात्मत्व न आठवी जइं तईं देहात्मता आयती,
ते देहात्मकता धरूनि धरिते संस्कार पूर्वस्थिती. ॥ १५७
दृष्टीविना दीप जसा कळेना, बुद्धीविना ब्रह्महि आकळेना[1]; ।
देहात्मतेची[2] तिस पूर्वखोडी अभ्यासयोगाविण ते न सोडी. ॥ १५८
जाणोनि अभ्यास किमर्थ आतां, आम्हांस कां हो! सगुणात्मचिंता? ।
जोडे अहंकार तयास ऐसा तो विष्णुभक्तीविण जाय कैसा? ॥ १५९
अभ्यासही करिति एक निजस्वरूपीं, सोडी तयांसहि न मीपण तें तथापी; ।
आम्हीं करूं करितसों दृढ योग ऐसा, चित्तांत भाव उपजे सहसा न कैसा? ॥ १६०
अभ्यास मी करिन आणिक आजि केला, अभ्यासही करुनि मीपण तें तयाला; ।
कोणी मनांत समजोनि अकर्तृता ही, आम्हांस कर्तृपण ते म्हणताति नाहीं. ॥
ऐसा अहंकृतिविलास मना सुटेना, हे शृंखळा[3] हरिकृपेविण तों तुटेना; ।
जो ज्ञानलाभ हरिभक्तजनास वाटे ते तों कृपा म्हणुनि हेचि मनांत दाटे. १६२
जो लाभ तो हरिकृपेस्तव हेचि बुद्धि, जो देखतो हरिकृपेस्तव सर्वसिद्धी; ।
तो विष्णुभक्तहि कसा? कसि सिद्धि त्याची? हे कृष्णपादकमळीं वंदतो विरंची. ॥
जें बोलिलों विधि म्हणे अगुणात्मसिद्धी, जेथें समाधिसुख आत्मसुधासमृद्धी; ।
ते तों कृपा तुझिच केवळ भक्त पाहे, त्याच्या मनीं असि अहंकृति केंवि राहे? ॥
अभ्यासयोग करितां मज या समृद्धी, ऐसें कदापि न मनीं तव भक्तबुद्धी; ।
तो तों क्षणक्षणिं तुझेच कृपेस पाहे, त्याचे मनीं मग अहंकृति केंवि राहे? ॥
ज्ञानें करूनि निरहंकृति[5] चित्त झालें, जें कां अकर्तृपणही हृदया निघालें; ।
हें सर्वही तव कृपेकरितांचि पाहे, त्याचे मनीं असि अहंकृति केंवि राहे? ॥
श्लोकांत[6] यां विधि म्हणे 'सुसमीक्षमाणो,' कीं भाव हा निजमनांतिल सुज्ञ जाणो; ।
यालागिं येथ सुसमीक्षणरीति कांहीं जे वर्णिली किमपि मूळविरुद्ध[8] नाहीं. ॥
येथेंचि या उपरि भक्ति विरक्ति त्याची, सर्वज्ञपादकमळीं[9] विनवी विरंची; ।
कीं पूर्वकर्मफळमात्रचि भोगितो तो वैराग्य[10] याच चरणीं विधि सूचवी तो. ॥

---

१. समजेना. २. देह हाच आत्मा या भावाची. ३. अहंकाराची बेडी. ४. 'तत्तेऽनुकंपां सुसमीक्षमाणो' इत्यादि आठवा श्लोक. स्वार्जितकर्मफल भोगणारा भक्त ईश्वराच्या कृपेनेंच मुक्तीचा वांटेकरी होतो–असें या श्लोकाचें तात्पर्य आहे. ५. अहंकाररहित. ६. आठव्या श्लोकांत. ७. तुझी कृपा (अनुकंपा) केव्हां होईल अशी उत्कंठेनें वाट पाहणारा. ८. मूळांतील अष्टमश्लोकाच्या अर्थास विरोध आणणारी. ९. सर्व जाणणारा जो परमेश्वर त्याच्या चरणरूप कमळीं. १०. पूर्वार्जित कर्मांचें फळ अनासक्त होऊन उपभोगणें हेंच वैराग्य.

कीं हो मला सुख असी सकळांस इच्छा, तों मीपणारहित हे न तयास वांछा, ।
प्रारब्धभोग न सुटे म्हणऊनि भोगी भोगूनि तें सुखहि मागुति वीतरागी. १६९
त्याची वदेल विधि मागुति येथ भक्ती, निःसंशयें जितचि वर्णिल त्यास मुक्ती, ।
कीं तो मनें करुनि वैखरिनें शरीरें, ध्यानीं असोनिहि भजे विविधा प्रकारें. १७०
त्याचें निमग्न मन निर्गुणचित्स्वरूपीं कीं तंतु आपण पटीं जडविश्वरूपीं, ।
किंवा तुझ्या सगुण सुंदर दिव्य मूर्ती ध्यातो मुखीं श्रवणलब्ध तुझ्याच कीर्ती. ॥
तूं विश्वरूप सचराचर देह तूं हें, ध्यानीं स्मरोनि तुज येरिति वंदिताहें; ।
त्या वंदनीं चरणिं या धरणीस पाहें लोळोनि तीवरि समग्र शरीर वाहें. ॥ १७२
ध्यातों मनें तुज, मुखें तव कीर्ति गातों, देहेंकरूनि करि वंदन नृत्यही तो; ।
देहें मनें करुनियां वचनें विरंची जे सुज्ञ सूचवि तयांप्रति भक्ति त्याची. ॥ १७३
जो भक्ति येरिति करोनि कृपाच पाहे, हे भक्ति मी करितसें इतुकें न साहे; ।
आत्मैक्यभक्ति दृढ आणि उपाधिभेदें या सेव्यसेवकपणें भजतो प्रसादें. ॥ १७४
जो भक्ति येरिति करोनि भजे तयाची, श्लोकांत याचि गतिही वदतो विरंची; ।
जो जी असा जितचि मुक्त तया म्हणूनि ब्रह्मा म्हणेल चवथ्या चरणेंकरूनि. १७५
सत्पुत्र जेंवि पितृभाग्यविलास भोगी तो नित्य मुक्तपदवीस तसा विभागी; ।
प्रारब्ध शेष म्हणऊनि शरीरधारी, ऐसा तथापि तव रूपचि तो मुरारी. ॥ १७६
पित्याचीं धनें भोगितो पुत्र, जैसा विभागी तुझ्या मुक्तिचा भक्त तैसा; ।
विधाता असें आपुल्या मायबापा म्हणे वर्णितां तत्कृपेच्या प्रतापा. ॥ १७७
जो आठवा देवकिचा मुरारी जो, आंठवा कृष्ण दशावतारीं, ।
हा आठवा श्लोक धरूनि चित्तीं तो आठवा येरिति चित्तवृत्ती. ॥ १७८
विना भक्ति आत्मज्ञही भ्रष्ट झाले, अहंकारडोहीं स्वदेहीं बुडाले, ।

---

१. आरंभिलेल्या कर्माचे जे भोग भोगिल्यावांचून चुकत नाहींत ते भोग. २. विरक्त. ३. 'त्यावरि' असाही पाठ आहे. ४. कायेनें, मनानें आणि वाणीनें. ५. ऐकण्यानें मिळालेल्या. ६. मी भक्ति करितों एवढा सुद्धां अहंपणा ज्याला सोसत नाहीं. ७. 'जीवेत यो मुक्तिपदे स दायभाग्' हा चवथा चरण. ८ वांटेकरी, दायभाक्. ९. आठवा गर्भ. १०. आठवा अवतार. ११. या दहा अवतारांचीं नांवें आणि त्यांतील कृत्यें पुढील श्लोकांत निरूपण केलीं आहेत:—'वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते । पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते म्लेच्छान्मूर्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥,' 'मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः । रामो रामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दश ॥.' १२. स्मरा, विसरूं नका.

असें बोलिला[1] यावरी तो विधाता म्हणे मीच दृष्टांत येथेंच आतां. ॥ १७९
पाहें हरी[2]! विधि म्हणे अपराध माझा, म्यां वत्सवत्सपपरिग्रह[3] सर्व तूझा ।
नेला, मनीं धरुनि केवळ भाव ऐसा कीं कृष्ण यावरि करील विलास[4] कैसा ?॥
आधींच[5] कारण चराचर[6] अंतरात्मा ज्याचा कळे न निगमास[7] अतर्क्य वर्त्मा[8], ।
तो काय यावरि करील असें पहाया मी कोण ? शक्ति मजला किति ? देवराया ! ॥
या आमुच्या सकळ शक्तिहि अंश जीचे, माया अनादि, कळती न विलास तीचे, ।
तीचा नियामक[9] तयावरि म्या स्वमाया विस्तारिली, विभव काय असें पहाया[10]. ॥
आत्मैक्यमात्र कळतां चिदचिद्विवेकीं[11] तूं आणि आपण न भिन्न म्हणूनि एकीं, ।
तूझा अनादर तिहीं धरिलाच जैसा, ह्याही तसाच पडला मज मोहफांसा. ॥ १८३
मावें अशा कमळसंभव[12] बोलताहे, कीं ऐक्य सत्य परि तुल्यपणा न साहे; ।
एकत्व आणि स्वमहत्व लघुत्व कैसें साधा म्हणाल तरि साधिल तोचि ऐसें. ॥
आत्मत्वभेद न दिसे मज तूज कांहीं, ऐसें तथापि महदंतर, साम्य नाहीं. ।
दावाग्निमाजि[13] जसि एक शिखा[14] स्वरूपीं मी तूझिया हरि ! तसा महदंतरूपीं[15]. ॥
अनेका घटीं एक आकाश जैसा अनेका शरीरीं हरी बिंब तैसा; ।
घटाच्या जळीं भिन्न आकाश नाना, तरी भिन्नता त्या नभाला असेना.॥ १८६
न जीवेश्वरां भेद ऐसा तथापी, अनंतत्व बिंबत्व विष्णुस्वरूपीं, ।
तयाचे कृपेनें जई ऐक्य होतें, अनंतत्व त्याचें तई यास येतें. ॥ १८७
नाहीं तरी बिंब अनंत साचा हा एकदेशी[16] प्रतिबिंब त्याचा; ।
ब्रह्मा म्हणे यास्तव विष्णुधामीं[17] अग्नीमधें जेंवि शिखा तसा मी. ॥ १८८

१. 'पश्येश मेऽनार्यमनंत आद्ये' इत्यादि नवम श्लोक पहा. भगवंताची स्तुति करून त्यानें क्षमा करावी म्हणून त्यास आपला अपराध निवेदन करतो—असा भाव या श्लोकाचा आहे. २. ईश. ३. वांसरें आणि त्यांचे पालक गोपबालक हे सेवक (परिग्रह). ४. क्रीडा. ५. 'आधींच कारण अनंत चराचरात्मा' असाही पाठ आहे. ६. स्थावरजंगमाचें आद्यकारण आणि सकलांस व्यापून असणारा असा. ७. वेदांला. ८. मार्ग. ९. त्या अनादि मायेचा नियंता, शास्ता. १०. माझें स्वतःचें विभव (बळ) किती आहे हें कळण्यासाठीं मी आपली माया तुजवर पसरली. ११. चैतन्य आणि जड यांच्या विचारीं. १२. विधाता. १३. मी आणि तूं यांत भेद नाहीं, तथापि तुझ्यांत व माझ्यांत साम्य (सारखेपणा) नाहीं, मोठें अंतर आहे, कारण मी (भक्त) तुझ्या अनंतरूपाचा अंश आहें. यास दृष्टांत अग्निज्वालेचा—अग्नीपासून उत्पन्न झालेली ज्वाला (शिखा) अग्नींत नाहीं, तद्भिन्न आहे. १४. ज्वाला. १५. प्रकृतीच्या ठायीं लय ज्याचा असा. १६. एकादे अंशानें (सर्वांशीं नव्हे) लागू पडणारा जो दृष्टांत उपमा इत्यादि तो, सार्वत्रिक सिद्धांतमतास विरुद्ध असा. १७. विष्णूच्या तेजांत मी अग्निज्वालेप्रमाणें होय.

'तद्विष्णोः परमं पदं' म्हणुनियां श्रुत्यर्थही पाहतां,
जे कां पाहति संतबिंब पद तें श्रीविष्णुचें तत्वतां; ।
ब्रह्मादि प्रतिबिंब, बिंब नव्हती, बिंबैक्यता पावती,
बिंबैक्यें महदंतर श्रुतिमुखें ब्रह्मा वदे येरिती. ॥ १८९
येणेंकरूनि सकळात्मक तूं मुरारी, आत्मा स्वदेहमयमात्रचि मी शरीरी; ।
यालागिं तूज मज अंतर फार, देवा! इत्यादि भाव विधि दाखवि वासुदेवा.॥
जैसाच उत्तम अनंतगुणें उपाधी तैसें स्वरूपहि अनंत म्हणूनि साधी, ।
दोंहीपरी विधि अनंतगुणें उणा मी, सामर्थ्य काय मज तेथ अनंतधामीं? १९१
अंगीं करूनि अपराध निवेदियेला, आतां क्षमा करिं म्हणेल पुढें हरीला; ।
येथूनियां चरण एक समाप्त झाला, श्रीकृष्णब्रह्मचरणींच समर्पियेला. ॥ १९२
श्रीमद्भागवतीं विचित्रदशमस्कंधीं 'विरंचिस्तुती'
तीची वामन हे त्रिविक्रमपणें व्याख्या करी श्रीपती, ।
टीका या करितांचि हे त्रिचरणी लोकत्रयीं संचरे,
येथें या चरणीं मुकुंदचरणीं सप्रेम जो तो तरे. ॥ १९३
नवश्लोकीं लोकीं विधिजनकअंकीं जसि रमा,
असी टीका जे कां मिरवित असे विष्णुमहिमा; ।
समर्पूं श्रीकृष्णा विषयबहुतृष्णा त्यजुनियां,
पहावी हे संतीं निजरति अनंतीं धरुनियां. ॥ १९४

चरण दुसरा.

(श्लोक.)

श्रीविष्णुभक्ति करितां अगुणात्मसिद्धी, कोणी न मानिति असें जन ते कुबुद्धी, ।
आत्मैक्यमात्र कळतां चिदचिद्विवेकीं, हे टाकिली सगुणभक्ति जगीं अनेकीं. ॥ १

---

१. 'तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यंति सूरयः दिवि' इत्यादि विष्णुसूक्तांतील वचन. २. ब्रह्मादिदेव हे विष्णूचे प्रतिबिंब होत, बिंब नव्हत. ३. 'ब्रह्मस्तुति'काव्याच्या तीन चरणांपैकीं एक. ४. श्रीमद्भागवताच्या नऊ श्लोकांवर. ५. ब्रह्मदेवाच्या बापाच्या (विष्णूच्या) मांडीवर जशी रमा (लक्ष्मी). येथें संधि कर्तव्य असून वृत्तसुखार्थ केला नाहीं. ६. विषयसुखाची आसक्ति न धरतां. ७. स्वानंद. (रति=आनंद.) ८. परमेश्वराच्या ठायीं. ९. निर्गुण परमात्म्याचा लाभ. १०. चित् (ज्ञान) अचित् (जडत्व–अज्ञान) याच्या विचारांत. ११. साकार परेशाची उपासना.

आम्हींच विष्णु तरि कां सगुणा भजावें ? आत्मत्व निर्गुण तयासि सदा पहावें; ।
धंदा वृथा श्रवणकीर्तनरूप आतां, येणें रिती वदति शाब्दिक[1] बोध होतां. ॥ २
जैसी तयांस उपजे सगुणीं उपेक्षा ऐक्यें तसाचि विधिही सरसीरुहाक्षा[2] ! ।
मानूनि एकपण वत्सप[3] वत्स नेतां मी हा समान असि हे घडली अहंता. ॥ ३
मी एक सृष्टि करणार तसाच हाही[4], विष्णु स्थितीस करणार, विशेष नाहीं; ।
वत्सें मुलें हरुनि नेइन मी स्वभावें दावील काय मग वैभव तें पहावें ? ॥ ४
याचा उपाधि[5] सकळांहुनि थोर जैसा सर्वात्मतेंकरुनि बिंब अनंत तैसा; ।
दोहींकडूनि हरि थोर असें स्मरेना, ब्रह्म स्वगर्व हृदयांतिल आवरेना. ॥ ५
वत्सें मुलें विधि हरूनि समस्त गेला, वर्षाभरांउपरि माघुति तेथ आला; ।
तों आपणें सकल वत्सप वत्स नेले, तैसेचि आणिकहि येउनि देखियेले. ॥ ६
देखोनि मोह पडला कमळासनाला[6], ते कोण हे कवण हें नकळे तयाला; ।
ज्यां वत्सवत्सप[7] हरूनि समस्त नेले, ते तों तसेच दिसती अवघे निजेले. ॥ ७
केले नवेच असतील तरी कळेना, ते कोण हे कवण हें मनिं आकळेना[8]; ।
ते आणिले करुनि नूतन नीजवीले, कीं हे नवे मनिं म्हणे हरिनेंच केले. ॥ ८
ऐसें खरें न कळतां हृदयांत कष्टी, होऊनि पाहत असे अतिसूक्ष्मदृष्टी; ।
तो वत्सवत्सप समस्तहि विष्णुरूपीं देखे सरोजभव केवळ चित्स्वरूपीं. ॥ ९
ब्रह्मांड एक चतुरानन एक एक मूर्ती पुढें अजितमूर्ति[9] अशा अनेक; ।
देखोनि मूर्छित पडोनि उठोनि पाहे, तों गोपरूप हरि एकचि तेथ आहे. ॥ १०
तेव्हां अतर्क्य महिमा कळला हरीचा, कीं हा अनंतगुण आणि अनंत साचा; ।
आत्मैक्यतेकरुनि भिन्न नसे तथापी ब्रह्म स्वयें हरिच मी प्रतिबिंबरूपी. ॥ ११
श्लोकाष्टकें[10] करुनि या करितांचि आधीं टाकूनियां सगुणभक्ति निजात्मबोधीं; ।
जे गुंतले श्रमचि त्यांसि म्हणोनि बोले, आत्मज्ञ भक्तचि म्हणे कृतकृत्य झाले. ॥

---

१. शब्दापासून झालेला बोध=शब्दज्ञान. २. कमलाक्षा. (हे कृष्णा.) ३. वासरें राखणारे (बालक). तूं आणि मी (विधाता) एक वास्तव तूं व मी हे समान अशी अहंता उत्पन्न होऊन मी वांसरें घेऊन गेलों. ४. कृष्णही. मी जसी सृष्टि उत्पन्न करतों तसेंच हा तिचें पालन (स्थिति) करतो, तो माझ्यासारखा समान आहे, त्याच्यांत आणि माझ्यांत विशेष (अधिकभाव–अंतर) नाहीं, या समजुतीनें वांसरें नेलीं. ५. बाह्यकारण, बाह्यवस्तुप्रयोजककारण. शुद्धस्वरूप पदार्थाच्या ठायीं अन्यरूप भासायास कारण असा पदार्थांतराचा जो संबंध तो. ६. ब्रह्मदेवाला. ७. वांसरें आणि गोपबालक. ८. समजेना. ९. परमेश्वराच्या मूर्ति. १०. आठ श्लोकांनीं.

जे ऐक्य मानुनि तुझी करिती उपेक्षा तैसेंचि आजि घडलें मज अंबुजाक्षा ! ।
ऐक्येंकरूनि सैलगी करितां मुकुंदा ! अन्याय थोर घडला मज बुद्धिमंदा. ॥१३
भावें अशा नैवम पद्य तयांत धाता अंगीकरूनि अपराध वदे अनंता, ।
कीं थोर तूं हरि उपाधिकरूनि जैसा सर्वात्मतेंकरुनिही बहु थोर तैसा. ॥ १४
एकत्व मानुनि समानपणेंकरूनी ग्यां वत्स वत्सप समस्त तुझे हरूनी, ।
नेले तैयावरि तुझा महिमा पहातां, मी सापराध हरि हा अनुताप आतां. ॥ १५
मायेकरूनि बहु थोर तुझीच माया तत्वेंकरूनि तरि बिंबचि, देवराया ! ।
जो तूं असा तव महत्व पहावयाला मी कोण? येरिति चतुर्मुख बोलियेला.॥१६
अंगीकरूनि अपराध असा विधाता आतां क्षमा करिं म्हणोनि म्हणे अनंता, ।
वाँणीपती परमभक्तिरसें स्ववाणी श्लोकत्रयें वदतसे अतिदीनवाणी. ॥ १७

'करिं अतःपर हें मजला क्षमा' विधि असें विनवी पुरुषोत्तमा; ।
स्वअधमत्व निवेदुनि त्यावरी, भगवदुत्तमता वदतो खरी. ॥ १८
'हरि ! तुवां पद हें मज दीधलें, विभव हें तुजवीण न साधलें, ।
इतुकियावरिही तुजवांचुनी, मजहि ईश्वरता गमली मनीं. ॥ १९
असें मानणें याच अन्यायकोटी नसे मीपणाएवढी गोष्टि खोटी, ।
तथापि क्षमा माधवा तूज मोटी कृपासागरा ! हें धरावें न पोटीं. ॥ २०
रजोगुणें संभव या शरीरा, रजोगुणाचाच मनांत थारा, ।
सर्वेश जो तूं विसरोनि त्याला, मी ईश ऐसा मज गर्व झाला. ॥ २१
जो अंध त्याचें पद लागतांही विवेकियां क्रोधचि येत नाहीं, ।
रजोगुणें अंधें तयासि देवा ! क्षमा दुरन्यायहि हा करावा. ॥ २२
तथापि ऐश्वर्य तुझें हराया समर्थ होतों जरि, देवराया ! ।
क्षमा न तेव्हां करितासि देवा ! अन्याय हा तूं मज वासुदेवा ! ॥ २३
च्युति नव्हे विभवासि तुझ्या कधीं, म्हणति अच्युत याकरितां सुधी ।
सहज अच्युत तूं, पुरुषोत्तमा ! म्हणुनि हा अपराध करीं क्षमा. ॥ २४

१. हे कमलाक्षा. २. 'सलूख' हा शब्द आरबी आहे. ३. 'पश्येश' इत्यादि नवम श्लोक. ४. 'नेले न जाणुनि तुझा महिमा अनंता' असाही पाठ आहे. ५. पश्चात्ताप. ६. स्वीकारून. ७. विधाता. ८. 'अतः क्षमस्वाच्युत मे' इत्यादि दहावा श्लोक. ९. थोरपणा, वैभव. १०. मी समर्थ पुरुष आहें—असा भाव. ११. उत्पत्ति. १२. वास्तव्य. १३. विचारशील पुरुषास. १४. रजोगुणानें जो मी अंध त्यास. १५. भ्रंश, पतन. १६. उत्तम बुद्धिमान् लोक यासाठींच तुला 'अच्युत' म्हणजे पतनरहित असें म्हणतात.

विभव नित्य अनंत तुझें, हरी! न हरवी तिळमात्रहि तें जरी; ।
तरि तुझा अपराध कसा घडे? मन अहंकृतिनेंच तमीं बुडे. ॥ २५
हरुनि नेइन वत्सपरिग्रहा, करिल काय तयावरि कृष्ण हा; ।
म्हणुनियां म्हणतों निजमीपणें बुडतसें स्वउपाधिरजोगुणें. ॥ २६
[1]अविद्याआंधारें करुनि नयनीं लेपें[2] चढला,
जसा तूं तैसा मी म्हणुनि हरि! हा मोहें[3] पडला; ।
मुळें वत्सें नेलीं बहुत मज अन्याय घडला,
क्षमा, लक्ष्मीकांता! करिं, मद[4] मनांतील झडला. ॥ २७
स[5]नाथ ब्रह्मा हा मज करुनि याला मजविणें,
नसे स्वामी कोणी म्हणसि तरि हें सार्थक जिणें. ।
कृपापीयूषाचें[6] कमलभव[7] हा पात्र म्हणुनी,
क्षमा, लक्ष्मीनाथा! धरिं मज अनाथावरि मनीं.' ॥ २८
कमलजापतिची[8] कमलासनें[9] परमउत्तमता चहुं आननें[10], ।
कथियली, परि वैभव आपुलें हृदयिं आठवितां मन शंकलें. ॥ २९
ब्रह्मांड सावरण[11] सर्व शरीर माझें, होतें असें चहुं शिरांवरि गर्वओझें, ।
ब्रह्मांड आणि चतुरानन कोटि कोटी दावोनि बुद्धि हरिली हरिनेंचि खोटी. ३०
जो कां वत्सपवत्सरूप हरि हा तद्वस्त्र तद्भूषणें,
शिंकीं वेत्रें[12] विषाणें[13] वेणु अवघीं झाला स्वयें आपणें, ।
रूपें सर्वहि तीं चतुर्भुज[14] घनश्यामेंचि म्यां देखिलीं,
ब्रह्मांडें सचतुर्मुखें[15] तितकियांपाशीं उभीं राहिलीं. ॥ ३१
अंडें[16] किती? विधि किती? मज लेखवेना तेव्हां अतर्क्य महिमा मज देखवेना;।
आच्छादिलें विभव[17] हें हरिनेंचि जेव्हां आली मला स्मृति हळू हळु आजि तेव्हां.
म्हणुनि अंडशरीरहि मी जरी, तरिहि मेरुपुढें जसि मोहरी; ।
मनिं विचारुनियां विधि येरिती वदतसे स्वलघुत्व हरीप्रती. ॥ ३२

---

१. येथे संधि कर्तव्य असतां केला नाही. २. पटल. ३. भ्रम. ४. गर्व, अभिमान. ५. नाथासहित, तूं नाथ (स्वामी) असतां. ६. अमृताचें. ७. ब्रह्मदेव. ८. लक्ष्मीपतीची (विष्णूची). ९. ब्रह्मदेवानें. १०. चार मुखांनीं. ११. पृथिवी, आकाश, वायु इत्यादि आवरणासहित. १२. वेताच्या काठ्या. १३. शिंग. १४. चार हातांनीं युक्त आणि मेघासारखीं कृष्णवर्ण अशीं. १५. ब्रह्मदेवासह, प्रत्येक ब्रह्मांडापुढें एक एक ब्रह्मदेव आहे अशीं. १६. ब्रह्मांडें. १७. थोरपणा.

[1]अंडें जेंवि विशाळ येचरितिनें ब्रह्मांड हें निर्मिलें,
[2]आकाशादिक पंचकें [3]महदहंकारें तमें वेष्टिलें; ।
माझा यद्यपि देह हा तरि असंख्यातें न जाणों किती ?
एकैका तेंव रोमकूपविवरीं अंडें असीं श्रीपती ! ॥ ३४
गृहीं [5]छिद्रद्वारा दिसति किरणाचे [6]त्र्यणुक तें,
तयांची ही संख्या करिन, म्हणतां ते न घडतें; ।
अशां रेणूचे ते द्व्यणुक त्र्यणु जे त्यांस गणना,
नसे तैसी रोमाप्रति, हरि ! तुझ्या अंडरचना. ॥ ३५
किडे उंबराच्या फळामाजि पोटीं असे [8]अंडकोटीमध्यें जीव कोटी; ।
किडे नेणती आणिकां उंबरांसी असे जीव हे नेणती अंडरासी. ॥ ३६
अनेकें जसीं उंबरें एकवृक्षीं, तसा अंडकोटींस तूं एक साक्षी; ।
फळांच्या [9]त्रिकाळीं तरू तोचि जैसा, अनित्यांस अंडांस तूं नित्य तैसा. ३७
माझें शरीर तंव एकचि अंड देवा ! अंडें अनंत तुजभीतरि वासुदेवा ! ।
तो मी किती किति तुझा महिमा मुकुंदा ! भावें अशा विनवि [10]कृष्णपदारविंदा.॥
जगें जेधवां येरिती कोटिकोटी मुकुंदा ! तुझ्या एकल्याच्याच पोटीं; ।
तयीं हे जरी अस्मदन्याय झाले, न तूं कोपसी येरिती येथ बोले. ॥ ३९
[11]गर्भांत [12]अर्भक जरी जननीस लाता हाणी तयास, हरि ! काय करील माता ? ।
हें विश्व आणि कमलासन अंडकोटी [13]यांतील काय मज सांग तुझ्या न पोटीं ?॥
जैसें समस्त उदरांत तुझ्या, अनंता ! तैसाच मी म्हणुनि बोलियला विधाता; ।
आतां वदेल जननी जनक त्रिलोकीं, लोकां अनेक मज दोनिहि एक तूं कीं.॥
[14]नाभींत [15]पंकज तुझ्या मज जन्म तेथें, तूं माय बाप मज आणिक कोण येथें ? ।
हें अन्यथा जरि म्हणो तरि वेदवाणी बोले असें अनृत केंवि [16]रथांगपाणी ! ॥ ४२

---

१. 'क्वाहं तमोमहदहं' इत्यादि अकरावा श्लोक. २. आकाश, पृथ्वी, आप्, तेज, आणि वायु हीं पंचमहाभूतें. ३. महत्तत्व आणि अहंकार. ४. तुझ्या रोमरंध्ररूप छिद्रीं. ५. खिडकींतून. ६. तीन अणु मिळून जें एक प्रमाण तें. ७. येथें 'वर्णः संयोगपूर्वश्च' या नियमानें येथें 'क'ला दीर्घत्व आलें आहे व त्यामुळें छंदोभंग झाला आहे. ८. ब्रह्मांडकोटीमध्यें. ९. उत्पत्तिस्थितिलयकाळीं. १०. कृष्णाच्या चरणकमळा. ११. 'उत्क्षेपणं गर्भगतस्य पादयोः' इत्यादि बारावा श्लोक पहा. १२. बालक. १३. वामनानें या भक्तिरसपरिपूर्ण काव्यांत फार चांगलीं वर्णनें केलीं आहेत त्यांचा हा मासला आहे. १४. 'जगत्त्रयांतोदधिसंप्लवोदे' इत्यादि तेरावा श्लोक पहा. १५. कमळ. १६. चक्रपाणी. पृष्ठ ३१७ टीप ३ पहा.

त्रिलोकाच्या नाशीं[1] सकळ जळराशीस मिळणें,
तयांमध्यें योगेंकरुनि उदकीं तूज निजणें; ।
सरे निद्रा, द्रेष्टा[2] प्रकटसि, जळें तेंचि दिसती,
विना द्रष्टा दोरीं अघटित मृषा[3] सर्पवसती[4]. ॥ ४३
न ज्ञाणे जो दोरा भुजगचि[5] खरा त्यास दिसतो,
जरी दोरा जाणे, नयनिं लटिका सर्प बसतो; ।
तसा तूं ज्या नीरीं[6] निजसि दिसतें तेंचि उठतां
नसे कोणी द्रष्टा, तरि मग नये सर्प म्हणतां. ॥ ४४
लयाच्याही अंतीं किमपि सदसद्विश्व[7] न दिसे,
तई कोठें पाणी अतिगहन गंभीरहि[8] असे ।
अशा ऋग्वेदाच्या श्रुति वदति यालागिंच लयीं
निजे द्रष्टा, पाणी किमपिहि न निर्वाणसमयीं[9]. ॥ ४५
निजे पाण्यामध्यें, गिळुनि निजतो त्याच सलिलीं[10],
उठे ऐसें वेदीं मुनिवरकुळें[11] हेंचि वदलीं; ।
निजे द्रष्टा दोरीं भुजग अवलोकूनिच जसा,
उठे तेव्हां मिथ्या भुजगचि यथापूर्वचि तसा. ॥ ४६
याकारणें त्रिभुवनप्रळयांत नीरीं, निद्रा करी उदकिं त्याच उठे मुरारी; ।
द्वैपायनादि[12] मुनि बोलति हें पुराणीं[13] तो रज्जुसर्प निजतां उठतांचि पाणी. ४७
याकारणें त्रिभुवनप्रळयांतकाळीं जें नीर त्यांत हरिनाभिसरोजनाळीं[14]; ।
झाला विरंचि[15] म्हणती निगमीं पुराणीं भावें अशाच्च वदतो विधिही[15] स्ववाणीं. ॥
कीं बोलती श्रुति जगत्रयअंतकाळीं[16] नारायणोदरसरोरुहनाभिनाळीं; ।
झाला चतुर्मुख न हे तरि गोष्टि खोटी, तूं सांग कीं उपजलों न तुझ्याच पोटीं. ॥
भावार्थ हा कीं तुझियाच पोटीं मीं जन्मलों, गोष्टि कदा न खोटी; ।
तूं माय, मी बाळ तुझाचि जेव्हां, मानू नको हा अपराध तेव्हां. ॥ ५०
याकारणें जननिच्या उदरांत लाता झाडी शिशू, नै[17] मनि ते अपराध माता, ।
हे पूर्वपद्यरचना दृढ येथ केली ते ब्रह्मवैखरि[18] असे रिति वर्णियेली. ॥ ५१

---

१. प्रलयसमयीं. २. प्रेक्षक. ३. खोटी. ४. सर्पाचें रहाणें. ५. साप. ६. उदकीं. ७. खरें खोटें जग. ८. खोल. ९. अंतकाळीं. १०. उदकांत. ११. मन्वादिक मुनिगण. १२. व्यासादि. १३. पुराण नामक ग्रंथांत. पृष्ठ २९४ टीप १९ पहा. १४. कमळांचा देंठ. १५. ब्रह्मदेव. १६. येथें संधि कर्तव्य असतांही वृत्तसुखार्थ केला नाहीं. १७. न मानी. १८. विधात्याची वाणी. 'वैखरी' हा शब्द दीर्घ ईकारान्त आहे, पण येथें वृत्तसुखार्थ ऱ्हस्व केला आहे.

तुझा पुत्र मीं स्थापिलें हें, तथापी मनीं शंकला [1]येरिती गोपरूपी ।
मला काय तूं पुत्र नारायणाचा, ह्मणी मोह ऐसा करी कृष्णत्राचा. ॥ ५२
म्हणोनि बोलेल विरंचि आतां कीं तोचि नारायण तूं अनंता ! ।
नारायणाचे बहु अर्थ जेथें तो [2]श्लोक वर्णील हरीच येथें. ॥ ५३
[3]नव्हेसि नारायण केंवि, देवा ! आत्माचि तूं केवळ वासुदेवा ! ।
तूं बिंब [4]नानाप्रतिबिंबवृंदा उपाधिभेदें रचिसी, मुकुंदा ! ॥ ५४
अनेकां घटीं एक आकाश जैसा, हरी एक सर्वां शरीरांत तैसा; ।
नभें दूसरीं त्याच कुंभांत नीरीं जसीं येरिती जीव नाना शरीरीं. ॥ ५५
तूं बिंब सर्वात्मक, वासुदेवा ! हे जीव तूझे प्रतिबिंब, देवा ! ।
उपाधियोगास्तव भिन्न होती भोगूनि कर्मे तुजमाजि येती. ॥ ५६
एवं [5]सुषुप्तिसमयीं प्रळयीं जयांला, बिंबैक्य भिन्नपण लेश नसे तयांला; ।
जीवां असा सतत आश्रय तूंचि जेव्हां नारायणाख्य सकळात्मक तूंचि तेव्हां. ॥
जे जीव तेचि नर संस्कृत वेदवाचे तैसेचि नार म्हणिजे समुदाय त्यांचे ।
[6]नारांस त्यां [7]अयन आश्रय बिंबरूपें नारायणाख्य सकळात्मक चित्स्वरूपें. ॥ ५८
[8]व्योमसाम्य वदती श्रुतिबिंब, विष्णु आश्रय असा प्रतिबिंब, ।
जीव जैं प्रतिघटीं प्रतिरूपीं बिंब ईश्वर तदैक्य तथापी. ॥ ५९
नारायणावांचुनि ईश कैंचा ? जो जीवदाता सकळां जनांचा; ।
प्रकाशितो जो जड सर्व नारें आणीक नारायण या प्रकारें. ॥ ६०
नारायणासि सकळात्मकताचि जेव्हां, आत्मा चिदात्मक जडात्मक तोचि तेव्हां, ।
जीवैक्यतेस्तव चिदात्मकता तसी हे, चैतन्य आणि जडऐक्य असेंचि आहे. ॥ ६१
जीवास देहद्वय हे उपाधी तत्त्वें जडें त्यांसि निमित्त आधीं, ।
झालीं जसा सर्प असत्य दोरीं नारायणीं सर्व अशा प्रकारीं. ॥ ६२
जीवांला म्हणती जसे नर नसे त्यांच्या उपाधीप्रती,
शास्त्रीं व्याकरणांत 'नार' म्हणती तत्त्वें जडें मोजिती; ।
त्याचा आश्रय रज्जु जेंवि लटिक्या सर्पा प्रकाशी धरी,
श्रीनारायण [9]नारआश्रय असा आत्मा जडाचा हरी. ॥ ६३

---

१. 'देखतां' असा अन्य पाठ आहे. २. 'नारायणस्त्वं नहि सर्वदेहिनाम्' इत्यादि चौदावा श्लोक पहा. ३. पृष्ठ २०९ टीप ९-१० पहा. ४. प्रतिबिंबसमूहाला, अनेक जीवांला. ५. निद्रासमयीं. ६. नार म्हणजे नरापासून उत्पन्न झालेलीं तत्त्वें. हीं नारतत्त्वें ईश्वराचीं अयनें म्हणजे आश्रयस्थानें होतीं म्हणून त्या ईश्वराला 'नारायण' म्हणतात. ७. स्थान. ८. आकाशाशीं समत्व. ९. स्थूलसूक्ष्मरूप. १०. जीवाश्रय.

चैतन्य आणि जड दोनिच भेद लोकीं आत्मा जसा उभयतांसिहि एक तूं कीं, ।
याकारणें नव्हसि केवळ तूंचि कैसा? नारायणा! त्रिभुवनात्मक तूंचि ऐसा. ॥
नारायणाख्य हरिनाम तदर्थ धाता आणीकही करुनि अर्पितसे अनंता; ।
कीं तूं अधीश सकळात्मक ईश जेव्हां नारायण त्रिभुवनेश न केंवि तेव्हां? ६५
जे जीव ते नर तुझे प्रतिबिंब, देवा! तूं बिंब ईश्वर नियामक वासुदेवा! ।
जो नार जीवसमुदाय समस्तदेहीं नारांसि त्या अयन आश्रय तूं असाही. ॥ ६६

आणीक नारायणनाम धाता व्याख्यानरूपें विनवी अनंता, ।
कीं सर्वसाक्षी हरि तूंचि जेव्हां नव्हेसि नारायण केंवि तेव्हां? ॥ ६७

तंतूंत जेंवि पट हें[3] जड चित्स्वरूपीं तें शुद्धसत्वमय तूं हरि साक्षिरूपीं ।
नारांसि जो अयन तोचि अधीश साक्षी नारायणाख्य तरि तूंचि समस्तपक्षीं. ६८
नारायणार्थ वदला इतुकें विरंची, झाली तथापि बहु शंकित बुद्धि त्याची, ।
कीं नारसंज्ञकजळीं प्रळयीं निजेला नारायण प्रभु असें म्हणती तयाला.॥ ६९
तो पद्मनाभ उदकीं भुजगेंद्रशायी मी चोरितों पशुपनंदनवत्स गायी, ।
नारायणत्व घडतें मजलागिं कैसें? ब्रह्मा म्हणे म्हणि मुकुंद म्हणेल ऐसें. ॥ ७०
याकारणें कमळसंभव बोलताहे कीं बोलणें हरि कदापिहि हें न साहे; ।
रूपें तुझीं दिसति भिन्न तरी तथापी रूपें समस्त लटिकीं, हरि! तूं अरूपी. ७१

नारें ज्या प्रळयोदकासि म्हणती, येथें निजे श्रीपती,
तेव्हां आश्रय तें जळेंचि हरिला ऐसें श्रुती बोलती. ।
श्रीनारायणनाम यास्तव जया देहास तोही असा,
मायामात्र न सत्य येरिति पहा बोले विधाता कसा? ॥ ७२

नसोनी करी सर्प रज्जू तसाच, म्हणोनी म्हणे कीं जसा सर्प सांच, ।
नसोनी असेला दिसे विश्व सारें म्हणोनी जडें हीं नरांचींच नारें. ॥ ७३

जे रज्जु नेणति तयांस भुजंग आहे, सर्वज्ञ रज्जुच असा समजोनि पाहे, ।
पाहे निजीं लय जळें हरि या प्रकारें, त्या कारणें म्हणति त्या उदकासि नारें.॥
संहार सर्वहि करूनि जळीं निजेला, द्रष्ट्यास दृश्य जळमात्र उरे तयाला; ।
त्याला अखंड निजरूपचि दृश्य सारें या कारणें म्हणति त्या उदकासि नारें. ७५
सृष्टिस्थितिप्रळयकार्य करी तथापी, जीवांस सत्य हरिलागिं मृषा स्वरूपीं, ।
जीं जीवदृष्टिस न विष्णुस सत्य नारें, या कारणें म्हणति त्या उदकासि नारें. ॥

१. स्वामी. २. आपापल्या कर्मीं जीवास वागविणारा, नियंता. ३. ब्रह्मांडरूप. ४. विष्णु. ५. शेषशायी. ६. खरोखर. ७. 'असेला'बद्दल 'नराला' असा अन्य पाठ आढळतो. ८. प्रळय.

जीवांत कोणिहि न ते समर्थी तथापी, तद्दृष्टिनें उदक पाहतसे स्वरूपीं, ।
कीं जीवदृष्टिस जशीं दिसणार नारें, या कारणें म्हणति त्या उदकासि नारें.७७
रज्जूस सर्प म्हणणार न अज्ञ जेव्हां, सर्वज्ञ दोंपरिहि पाहतसेच तेव्हां, ।
पाहे हरी लयजळांस अशा प्रकारें, या कारणें म्हणति त्या उदकासि नारें.॥७८
जागाचि जोंवरि जळांत अभावसाक्षी ऐसा जळांस नरदृष्टिकरूनि लक्षी, ।
कीं रज्जु मी जळ भुजंग अशा प्रकारें, या कारणें म्हणति त्या उदकासि नारें.॥
नारें असीं लयजळें नरहेतुभूतें निद्रार्थ तें अयन आश्रय माधवातें, ।
ऐसा समास करितां प्रेळयांबुशायी नारायणाख्य हरिरूप तथापि मायी. ॥ ८०
तो तूंचि यास्तव न संशय येथ कांहीं, हा रूपभेद तरि रूपचि सत्य नाहीं; ।
रूपें अनेक धरितो नट वेषधारी, रूपें असत्य नट तूंचि खरा मुरारी. ॥ ८१
यालागिं नारायण तूंचि जेव्हां, मी पुत्र तूझा श्रुतिसिद्ध तेव्हां, ।
हें पूर्वपद्यें बदला विधाता स्थापूनियां तें स्तविलें अनंता. ॥ ८२
अहो! मायिकें सर्व रूपें हरीचीं, असा बोलिला श्लोक पूर्वी विरंची, ।
पुढें बोलतो कीं मला जन्म जेव्हां असत्यत्वही देखिलें म्यांचि तेव्हां. ॥ ८३
तें सत्य पाण्यांतिल रूप जेव्हां म्यां काय तें देखियलें न तेंव्हां, ।
खरेंचि तें कां उदरीं दिसेना? जें बाह्य तें आंतहि कां असेना? ॥ ८४
शरीर तें मागुति, वासुदेवा! म्यां देखिलें काय न देवदेवा! ।
श्लोकांत हा केवळ अर्थ येथें भावार्थ तो पूर्वकथाचि तेथें. ॥ ८५
कीं तें म्हणो जरि जळांतिल रूप साचें, मिथ्यात्व म्यांचि अवलोकियलें तयाचें,
कीं त्यांत मी कमळनाळपथें निघालों, धुंडूनि वर्षशत त्यांतुनि मीचि आलों. ॥
बाहेरि ये तंवहि एकसरें, मुरारी! म्यां देखिली सगुण सुंदर मूर्ति सारी; ।
तेंही अरूप निजरूप तुझें मुकुंदा! भक्तासि दाविसि विचित्र मुखारविंदा. ॥८७

१. या श्लोकांत 'नारायण' या सामासिक शब्दाचा विग्रह करून त्यांतील दोन पदांचा (नार+अयन) अर्थ दर्शविला आहे. नारें=जळें, प्रळयजळें; अयन=आश्रयस्थान; यावरून नारायण म्हणजे प्रलयांबुशायी असा अर्थ होतो. पृष्ठ २०९ टीप ९-१० पहा. २. प्रळयोदकीं शयन करणारा. ३. हा तुझा गोपाळवेश केवळ रूपभेद आहे, तूं जात्या नारायण खरा. जसा नट हा जात्या खरा, पण त्यांचे अनेक वेश (रूपें–सोंगें) केवळ मिथ्या, त्याप्रमाणें तूं खरा. ४. पूर्वश्लोकें. ५. असत्य. ६. 'तच्चेज्जलस्थं तव' इत्यादि १५ वा श्लोक पहा. ७. कमळाच्या देंटांत प्रवेश करून शोधीत होतों तेव्हां. (श्लोक ८६ पहा.) ८. तपश्चर्या केल्यावर दिसलें. ९. कमळाच्या देंटाच्या मार्गानें. १०. एकदम. ११. 'बाहेरि तोंचि मग एक असे मुरारी' असा अन्य पाठ आढळतो. १२. मुखकमळा.

बाहेरि मूर्ति दिसते निघतां शरीरीं, आकार तो किमपि ही न दिसे मुरारी ! ।
तेव्हां जसा पट दिसे परि त्यांत कांहीं तंतूविणें इतर वस्तु कदापि नाहीं. ॥८८
एवं तुझें कमळनाभ ! शरीर दृष्टीं जें देखिलें उदकिं तेथुनि सर्व सृष्टीं, ।
तेंही न सत्य म्हणवे, जगदात्मदेवा ! भावार्थ हाचि वदला विधि वासुदेवा ! ८९
जें सर्व कारण शरीर न सत्य तेंही, ऐसें तयीं सकळ विश्वहि सत्य नाहीं, ।
'प्रत्यक्ष सत्यहि असत्य कसें ह्मणावें ?' हा पूर्वपक्ष[1] उठला हृदयीं स्वभावें. ॥९०
ऐसें म्हणाल तरि उत्तर काय द्यावें ? प्रत्यक्षही[2] जग असत्य कसें म्हणावें ? ।
तें याच कृष्णअवतारकथेंत आतां म्यां देखिलें म्हणुनियां वदतो विधाता. ९१
[3]येथेंचि माया हरणावतारीं प्रपंचमिथ्यात्व मला मुरारी, ।
मृद्भक्षणीं[4] दाखविलें मुकुंदा ! पाहे जयीं विश्व मुखीं यशोदा. ॥ ९२
प्रत्यक्ष जें दिसतसे जग तेंचि पोटीं देखें असें जरि म्हणों तरि गोष्टि खोटी, ।
बाहेरि जी तुज धरूनि करीं यशोदा जैसी उभी तसिच आंत कसी मुकुंदा!९३
बाहेरि विश्व अवघें उदरांत तैसें विश्वांत विश्व, हरि ! सांठवणार कैसें ? ।
एकांत एक घट तुल्य जसे न माती, सत्या जगांत जग सत्य असेच रीती.॥९४
या कारणें उदरिं दाखविली स्वमाया, देखोनि जीस भुलली व्रजनाथ जाया, ।
आंतील विश्व लटिकें, हरि ! येचि रीती ब्रह्मांडभांड शतकोटि मृषाच होती.९५
स्वप्नप्रपंच न कळोनि खराच वाटे तो या प्रपंचरचनेंत कधीं न दाटे, ।
एके क्षणीं बहुत लोक जयीं निजेले स्वप्नप्रपंच तितके इतक्यांत माले. ॥ ९६
पोटांत येरिति चराचर, वासुदेवा ! मातेसि दाखविसि तें लटिकेंचि, देवा! ।
पोटांमधील जग सर्व मृषाच जैसें, हें विश्वही सकळ दाखवितोचि तैसें. ॥ ९७

म्हणतिल जन येथें आरशामाजि जैसें
स्थिरचर जननीनें देखिलें सर्व तैसें, ।
प्रतिफलित[10] शरीरीं विष्णुच्या विश्व जेव्हां
अघटित अवघें हें पूर्वपक्षोक्त तेव्हां. ॥ ९८

---

१. दुसऱ्यास उत्तर द्यावें या बुद्धीनें केलेला कोणत्या एका मताचा उपन्यास याच्या उत्तरास 'उत्तरपक्ष' म्हणतात. २. 'प्रत्यक्षही परि असत्य असें म्हणावें' असा अन्य पाठ सांपडतो. ३. 'अत्रैव माया धमनावतारे' इत्यादि १६ वा श्लोक पहा. ४. मृत्तिकेच्या भक्षणीं. (पृष्ठें २८९-२९१ पहा.) ५. तूं यशोदेला आपल्या पोटांत विश्वाचा सकळ विस्तार दाखविलास, या कारणास्तव तूं प्रपंचाचें मिथ्यात्वही दाखविलेंस. ६. सामावती. ७. नंदभार्या. ८. मिथ्या, असत्य. ९. हा शब्द फारशी आहे. १०. प्रतिबिंबित.

विधाताचि तो या अशा [1]पूर्वपक्षा निवारूनियां, बोलतो अंबुजाक्षा, ।
जसे आरशामाजि ऐसें न तेव्हां, दिसे दाविलें विश्व मातेसि जेव्हां. ॥ ९९
[2]कुक्षींत हें जगहि हा [3]व्रजनाथ आहे, तूझ्याच येथ जननी तुजमाजि पाहे, ।
मृद्भक्षणीं [4]जननियुक्त जसा अनंता! पाहे जसें त्वदुदरीं तुज तेचि माता. १००

दिसे कुक्षीमध्यें सकळ जग ज्याच्या हरिहि तो,
व्रजीं या ज्या रूपें सतत जननीलागिं दिसतो, ।
तयारूपें तोही निजउदरीं भासे त्रिभुवनीं
अहो! पाहे जेव्हां जग हरिशरीरांत जननीं. ॥ १०१

तूं आरसा तुजमधें जग दीसताहे, हें बोलणें इतकियावरि कैंवि साहे! ।
तूं आरसा तरि कसें तुजमाजि, देवा! [5] देखेल तूज जननी तुझि, वासुदेवा!॥
जया दर्पणीं जें दिसे विश्व नाना, तयामाजि तो आरसा तों दिसेना, ।
शरीरीं दिसे विश्व नानास्वभावें, तुवां आरशानें न तेथें दिसावें. ॥ १०३
तुझी मूर्ति जेव्हां तुझ्या या शरीरीं, समस्तांमधें देखिली या प्रकारीं, ।
पहातां तुवां दाविली सर्व माया, तसें विश्व मायाच हे, देवराया! ॥ १०४
प्रकारांतरें याच पद्यांत आतां, निवारील या पूर्वपक्षा विधाता; ।
म्हणे, 'तूं जसा आणि हें विश्व जैसें जशाचें तसें दर्पणामाजि कैसें? १०५
[6]आकारवंत जितुकें [7]प्रतिरूप त्याचें, कांहीं विलक्षण दिसे [8]नयनासि साचें, ।
जो [9]उत्तराभिमुख तो प्रतिबिंब पाहे, तो दक्षिणाभिमुख त्यासचि दीसताहे. १०६
जसी गोकुळीं मूर्ति तूझी मुकुंदा! उभी [10]ज्यां मुखीं आणि जैसी यशोदा, ।
जसें जेथ तैसें तुझ्या सर्व पोटीं, दिसे दर्पणाची तयीं गोष्टि खोटी. ॥ १०७
'चैतन्यरूप तरि तत्प्रतिबिंब कैसें?' हा पूर्वपक्ष दिसतो तरि तत्व ऐसें, ।

---

१. मागच्या (९८व्या) श्लोकांत सांगितलेला पूर्वपक्ष. आरशांत ज्या प्रमाणें वस्तूचें प्रतिबिंब पडतें त्याप्रमाणें बाहेर दिसणाऱ्या प्रपंचाचें प्रतिबिंब तुझ्या मुखांत पडलेलें यशोदेनें पाहिलें असेल—असा पूर्वपक्ष. यावर उत्तरपक्ष असा:—(श्लोक १०२). आरशाचें प्रतिबिंब आरशांत पडावयाचें नाहीं, आणि प्रतिबिंब हें बिंबाच्या उलट असतें, पण तुझ्याच पोटांत तूंच दिसलास आणि बाह्य जगताचें बिंबाचें प्रतिबिंब तुझ्या पोटांत उलटें दिसावें तसें दिसलें नाहीं, तेव्हां हा जो नित्याच्या अनुभवाविरुद्ध प्रकार घडून आला तो तुझ्या मायेशिवाय घडला नाहीं. २. 'यस्य कुक्षाविदं सर्व' इत्यादि १७ वा श्लोक पहा. ३. गोपाळवेषधारी विष्णु. ४. यशोदेसहित. ५. आरशांत उलट दिसावें तें तसें न दिसतां जशाचें तसें कसें दिसतें? ६. ज्यास आकृति आहे असा पदार्थ. ७. प्रतिबिंब. ८. डोळ्यांना चमत्कारिक दिसतें. ९. उत्तरदिशेस मुख करून असणारा पुरुष. १०. ज्या दिशेस मुख करून यशोदा उभी होती त्याच दिशेस.

साकारतेविण विलक्षणता घडेना चिन्मात्र त्यांत तरि आकृति सांपडेना. १०८
व्यापूनि सर्वहि दिशा उरलेंच जैसें, हें व्योम चिद्गगन सर्व जगांत तैसें; ।
आकाश दर्पणि जळांत दिसे जनाला, कैसें विलक्षण म्हणाल तयासि बोला ?॥
एके दिशेस नभ सन्मुख होय जेव्हां त्याचें विलक्षण तसें प्रतिरूप तेव्हां, ।
सर्वांकडे सम अरूप अनंत ऐसें, चैतन्य तें प्रतिफळें विपरीत कैसें? ॥ ११०
अनंतत्व त्यालाच बिंबस्वरूपीं परिच्छिन्नता त्यासही जीवरूपीं, ।
घटासारिखा सूर्य पाण्यांत भासे, तयीं स्वप्रकाशत्व त्याचें न भासे.॥ १११
हें बिंब आणि प्रतिबिंब तैसें विचार हा सार जगन्निवासें, ।
भाषाप्रबंधीं स्फुट वर्णियेला जो 'कर्मतत्वा'ख्य निबंध झाला. ॥ ११२
त्या कर्मतत्वीं बरव्या प्रकारें श्रीकर्मतत्वाख्यनिबंधकारें, ।
केला असे वामननामरूपें तेथें पहावीं उभय स्वरूपें. ॥ ११३
या प्रस्तुतीं या अवताररूपीं हें सर्व मायामय चित्स्वरूपीं, ।
केलें[6] असें दाखविलें, अनंता!' म्हणूनियां बोलियला विधाता. ॥ ११४
आणीक हे आजिच सर्व माया अनेक विश्वें मज, देवराया ! ।
तुवांचि कीं दाखविलीं मुकुंदें, ब्रह्मा वदे तत्त्वकथानुवादें. ॥ ११५
मिथ्या भुजंग परि सत्य सुगंध हारें भासे दिसे जगहि साच अशा प्रकारें, ।
सत्तेकरूनि तुझिया तुजवीण कांहीं हें पाहतां जड चराचर वस्तु नाहीं.॥११६
ब्रह्मा म्हणे म्हणुनि येरिति देवराया! कीं तूजवांचुनि असत्य समस्त माया, ।
मायामयत्व मज आजिच हें जगाचें, दाऊनि तत्त्व निज सूचविलेंच साचें. ११७
कीं वत्स वत्सपहि म्यां हरितां, अनंता! तूं एकलाचि उरलासि म्हणे विधाता. ।
झालासि त्याउपरि वत्सप वत्स, देवा! होतासि वर्षभरि येरिति वासुदेवा ! ॥
वर्षाभरीं परतलों तुजला पहाया, तों दाविली मज तुवां निज योगमाया; ।
ते वत्स वत्सप चतुर्भुज सर्व केले ब्रंह्मे चतुर्मुख अपारचि दाखवीले. ॥ ११९
ज्या त्या चतुर्भुज तुझ्या घननील मूर्ती शास्त्रें पुराण निगमागम गाति कीर्ती, ।

१. साकार पदार्थाचें प्रतिबिंब उलट (विलक्षण) पडतें पण जो चिन्मात्र (निर्गुण निराकार) आहे त्याचें प्रतिबिंब विलक्षण कसें दिसेल? जो चिन्मात्र आहे त्याला आकृति नाहीं, तेव्हां त्यास विलक्षण प्रतिबिंबही नाहीं. २. आकाश. ३. प्रतिबिंबें. ४. मर्यादा, परिमाण. ५. 'कर्मतत्व' नामक प्रकरणांत. हें वेदांतविषयक प्रकरण वामनानेंच केलें आहे. ६. 'कळे असें' असाही पाठ आहे. ७. 'अद्यैव' इत्यादि अठरावा श्लोक पहा. ८. आजचे आज तूं अनत रूपें धरून अखेरीस एकटाच राहिलास. (श्लोक ११८-११९). ९. आदिशक्ति. १०. अनेक विधाते अनेक सृष्टींसह उत्पन्न करून. ११. वेद आणि शास्त्र.

मूर्ती तुझ्या जितुकिया तितुके विधाते, ब्रह्मांडकोटिरचनेसह जेथ होते. ॥ १२०
ऐसा अतर्क्य महिमा मज दाखवीला, तो घागरींत हरि! रांझण सांठवीला, ।
मी तुच्छ, वैभव तुझें मज पाहवेना, हंसावरि स्मृति धरूनिहि राहवेना. ॥ १२१
जैसा दिवांधनयनीं[1] रवि साहवेना तैसें तुझें विभव तें मज पाहवेना, ।
हंसावरी गगनिं मूर्च्छित मूढ झालों, तूझ्या कृपेस्तव पुन्हा स्मरणासि आलों. ॥
आच्छादिलें स्वविभवासि तुवांच जेव्हां, आली प्रतीति, उठलों गगनींच तेव्हां. ।
तों तेथ तें किमपिही नयनीं दिसेना, वृंदावनीं[2] तुजविना दुसरें असेना. ॥ १२३
अध्याय पूर्विल तयांत कथार्थ ऐसा श्लोकांत या न विशदार्थ[3] निरुक्त[4] तैसा, ।
संक्षेपरूप वदतो विधि कीं मुकुंदा ऐसेंचि तूं रचिसि सर्वहि विश्ववृंदा[5]. ॥ १२४
होतासि एक मग वत्सपवत्सरूपी झालासि, दाविसि असें जग चित्स्वरूपीं, ।
जैसें मृषा उदक सूर्यकरांत[6] भासे केले प्रपंच तुजमाजि तुवांचि ऐसे. ॥ १२५
झालासि तूं वत्सप वत्स जेव्हां केली अविद्या[7] मजलागिं तेव्हां, ।
मी भ्रांत कीं कोठिल आणि कैंची मूढां जना भ्रांति जसी प्रपंचीं. ॥ १२६
तूं एकलाचि पहिला गुणहीन, देवा! झालासि तोचि सचराचर, वासुदेवा! ।
तंतूचि जेंवि पट तूंचि समस्त ऐसा, तत्वार्थ नेणति मला भ्रम आजि तैसा. ॥ १२७
जीवांत त्या भजति जे तुज विश्ववंद्या, त्यांची कृपेकरुनि नाशुनि तूं अविद्या[8], ।
सर्वत्र त्यांस दिसतोसि पटांत तंतू, जैसा तसा त्रिभुवनीं सचराचरीं तूं. ॥ १२८
तैसाचि आजि हरि वत्सपवत्सरूपी, तो तूं सदाद्वयचिदात्मसुखस्वरूपी, ।
झालासि कीं सकळ मी जगदीश आहें रे! ब्रह्मया! विविध विश्व असेंचि पाहें. ॥
केला असा हा उपदेश मातें, संहारिलें पूर्विलिया भ्रमातें; ।
श्लोकांत या ये रितिनें विरिंची करी स्तुति श्रीपुरुषोत्तमाची. ॥ १३०
तूं वत्सवत्सपचतुर्भुजरूप जैसा झालासि सर्वहि चराचररूप तैसा, ।
ऐसें वदोनि विधि शंकितरूप झाला, कीं शब्द हा बहु सदोष मुखासि आला.
मायामयें स्थिरचरें अगुण स्वरूपें, जैसीं प्रकाशति तसीं जगदीशरूपें, ।
हें पाहणें प्रिय बहू जगदीश्वराला गीतेमधें[9] हरिहि येरिति बोलियेला. ॥ १३२
या कारणें उचित हें म्हणणें तथापी, ब्रह्मा महत्व बहु देखुनि विष्णुरूपीं, ।
मूर्तीं म्हणे परम या हरिच्या स्वतंत्रा त्या कर्मबंधरचिता विवशा[10] विचित्रा. १३३
त्या [11]पांचभौतिक जडा विधवा कुयोनी कर्मात्मिका न हरिमूर्तिसमा म्हणोनी, ।

1. घुबडाच्या डोळ्यांनीं. २. यमुनेच्या तीरीं असणारें वन. ३. स्पष्टार्थ. ४. सांगितलेला. ५. विश्वांच्या समुदायाला. ६. सूर्यकिरणांनीं. ७. माया. ८. माया, अज्ञान. ९. भगवद्गीतेंत. १०. परतंत्र. ११. पृथ्वी आकाश आदिकरून पांच महाभूतांपासून झालेल्या.

बोलावया हृदयिं भाव धरी विधाता कीं या जडासम न मूर्ति तुझ्या अनंता ! ॥
ब्रह्म प्रकाशक चराचररूप माया, तूं ब्रह्म देह तुज माइक, देवराया ! ।
हें अन्यथा हरि नव्हे म्हणऊनि ऐसें मी बोलिलों परि समत्व घडेल कैसें? १३५

स्वयें कोण? हें नेणती जीवजाती, जगीं वासनारूप कर्मे करीती, ।
सुटेना विना भोगिल्या कर्म त्यांचें, मृषा विश्व भोगार्थ हें त्यांस साचें. १३६
करिति कर्म परोपरि तें फळे, निज सुखासुख भोगवितें बळें; ।
म्हणुनि देह चराचर पावती, विवश कर्मफळाप्रति धांवती. ॥ १३७
म्हणुनि सत्य शरीर गमे जयां, कवण आपण हें न कळे तयां; ।
तव तनू हरि! यद्यपि मायिका, परि न कर्ममया व्रजनायका ! ॥ १३८

जें जीव कर्म करिती फळ तें तयांतें, देशी त्रिमूर्तिपण यास्तव तूज येथें; ।
एतद्विलक्षण तथापिहि त्या स्वमूर्ती तूझ्या म्हणूनि विधि वर्णिल विष्णुकीर्ती.॥
जे[1] अज्ञ नेणति तुझी पदवी, मुकुंदा ! तूं देह हे सृजिसि[2] त्या जडजीववृंदां[3] ।
त्यांच्याच सृष्टिसमयीं जरि तूं अरूपी मायेंकरूनि चतुराननं तूं तथापी.॥१४०
जें हें अनात्म जग पाळिसि यांत त्याला, तो विष्णुनाम तुज देह नसोनि झाला ।
ऐसा त्रिनेत्र हर होउनि अंतकाळीं संहारिसी परम दारुण रुंडमाळी.[4] ॥१४१
ज्याकारणें धरिसि तूं हरि! देह ऐसे त्यासारिखे[5] वदविती तुज देह कैसे? ।
तूं या जगीं पसरुनी निज शुद्ध माया स्वेच्छेंकरूनि धरिसी तनु, देवराया ! ॥
आत्मा स्वयेंचि सकळात्मकतेंकरूनी ब्रह्म स्वयें स्मृति अखंड असी धरूनी, ।
जे देह तूं धरिसि देहहि ते न, देवा ! देहीं असा अससि केवळ वासुदेवा ! ॥

ईव इव इव तीन्ही शब्द हे याचि भावें
विधिहरिहररूपीं योजिले ब्रह्मदेवें; ।
त्रिविधहि हरिरूपें लोकदृष्टीस मात्रें
दिसति परि न भूतें जे रिती अन्य गात्रें. ॥ १४४
विधि वदत असें कीं तूं हरी ब्रह्मरूपी,
घडि घडि अपराधी मी म्हणो कां तथापी ? ।
तरि रजतमयोगें ब्रह्मया मोह होतो,
म्हणुनिहि अपराधी होउनी प्रार्थितो तो. ॥ १४५

तथापि ते कर्मतनू तयाची नव्हे स्वयें विष्णुचि तो विरंची; ।
श्रीविष्णु तो केवळ सत्वमूर्ती म्हणूनि वर्णी विधि विष्णुकीर्ती. ॥ १४६

---

१. 'अजानतां त्वत्पदवीम्' इत्यादि १९ वा श्लोक पहा. २. उत्पन्न करिसी. ३. समुदाया. ४. उत्पत्तिकाळीं (विधाता), पालनकाळीं (विष्णु), संहारकाळीं (रुद्र) अशा भिन्न रूपानें मायायोगें अज्ञजनांस दिसतो. ५. रुंडमाळा धारण करणारा त्रिनेत्र रुद्र. ६. सारखा.

जशा जीवयोनी तसीं विष्णुरूपें कसीं हो! म्हणावीं सुखाचीं स्वरूपें; ।
म्हणूनीच जीवार्थ सृष्ट्यादिकारें त्रिमूर्ति प्रभू वर्णिला या प्रकारें. ॥ १४७
त्रिमूर्तींतही [1]शुद्धसत्वें मुरारी! जगीं विष्णु तूं एक नानावतारी, ।
करीसी खळां मर्दुनी धर्मरक्षा, विधाता असें बोलतो अंबुजाक्षा. ॥ १४८
देवांत[2] वामन तुझा अवतार, देवा! नारायणादिक ऋषींतहि वासुदेवा! ।
श्रीरामकृष्ण अवतार मनुष्यदेहीं, क्रोडादि[3] दिव्य अवतार पशूमधेंही. ॥ १४९
तैसेचि जे जळचरांतहि मत्स्य कूर्म, स्वामी तुझे सदवतार[4] पवित्र कर्म, ।
दुष्टांस निग्रह[5] अनुग्रह[6] साधुसंतां ऐसे अनंत अवतार तुझे अनंता! ॥ १५०
तूं जन्मशून्य तुज जन्मनिमित्त कांहीं अज्ञानकर्मफळ बंधनरूप नाहीं; ।
लीलामृतें जन तरोत, सरोत पापें, तूं जन्मसी अजहि केवळ या प्रतापें. ॥ १५१
मायामयीं स्थिरचरीं अवतार ऐसे, मायाचि यद्यपि समान, तथापि कैसे ? ।
जे कर्मबंध रचिते परतंत्ररूपें तैसीं तुझीं म्हणवतील कसीं स्वरूपें ? ॥ १५२
ब्रह्मात्मतास्फुरणरूपिणि नित्य विद्या, माया तुझी विमळ, ये रिति विश्ववंद्या[7]; ।
देहात्मतास्फुरणरूपिणि ते अविद्या[8] माया तुझी कसि तसी भवरोगवैद्या!॥ १५३
'अविद्येस विद्येस मिथ्यात्व साम्यें, अनीशत्व ईशत्व हें तारतम्यें,' ।
विधाता असें बोलिला स्पष्ट जेथें उठे एक शंका मनामाजि तेथें. ॥ १५४
स्वातंत्र्य[9] जेव्हां अवताररूपी विद्यामय ब्रह्म सुखस्वरूपीं, ।
न कर्मसंबंध तयासि जेव्हां मत्स्यादिकां[10] देहहि तुच्छ तेव्हां. ॥ १५५
मागावया [11]बळिगृहासि किमर्थ जावें ? सीता[12]वियोगविरहें तरि कां रडावें ? ।
कंसा[13]सही भिडनि कां मथुरा त्यजावी ? हे मूर्ति नंदसदनास किमर्थ[14] यावी ? ॥
शंका असी उपजली विधिच्याच पोटीं, तों आठवे हृदयिं विक्रम[15] [16]कोटिकोटी, ।
चित्तीं स्मरोनि निजयोगबळें हरीचीं, शंकेस या हरिल येथुनियां विरंची. १५७
[17]श्लोकांत या म्हणतसे विधि, 'देवराया! तूं क्रीडसी पसरुनी निज योगमाया, ।
कोठें कसा करील काय असा[18] विवेकी, जाणों शकेल तुज कोण असा त्रिलोकीं ?

१. शुद्धसत्वगुणें. २. 'सुरेषु' इत्यादि २० वा श्लोक पहा. ३. वराहादि. ४. उत्तम अवतार. ५. शिक्षा, दंड. ६. प्रसाद, कृपा. ७. विश्वानें वंदन करण्यास योग्य. ८. अज्ञान. ९. ईश्वरास जर कर्मफळबंधनाचा संबंध नाहीं त्यास अनेक अवतारीं दुःखें कां भोगावीं लागलीं ? या शंकेचें येथें प्रतिपादन करून तिची निवृत्ति पुढच्या पद्याच्या टीकेंत केली आहे. १०. 'मत्स्यादि कां तुच्छ कुदेह तेव्हां' असाही पाठ आहे. मत्स्यादि दहा अवतार सुप्रसिद्ध आहेत. ११. वामनावतारीं. १२. रामावतारीं. १३. कृष्णावतारीं. १४. कां, काय म्हणून. १५. पराक्रम. १६. अनेक, अगणित. १७. 'को वेत्ति भूमन् भगवन्' इत्यादि २१ वा श्लोक पहा. १८. 'असाच कांकीं' असाही पाठ आहे.

लीला अतर्क्य हृदयीं स्मरतां विरंची, संबोधनें[1] तदनुरूप[2] वदे हरीचीं, ।
कीं तूं अनंत भगवंत पराख्य माया, आत्मा प्रकाशक तिचा पति देवराया ! ॥
योगेश्वरा ! अकळ[3] या तव दिव्य लीला जाणों शके कवण नीलसरोजनीळा[4] ! ।
श्लोकार्थ हाचि परि भाव विचाररीती भावार्थ सार बहु फार अपार होती.॥ १६०
भ्रू[5] वक्रमात्रकरि काळशरीर जेव्हां ब्रह्मांडभांड शतकोटि जळेचि तेव्हां, ।
तो भूमिचा असुरभार[6] हरावयाला झाला कसा भिउनि येथ कसा लपाला ?॥ १६१
व्यापूनि विश्व उरलाचि, तया अनंता लंकेमधेंचि कसि अंतरली स्वसीता ? ।
व्यापी त्रिविक्रम[7] चराचर विश्व पायीं तोही बळीस पसरी[8] कर शेषशायी[9]. १६२
इत्यादि सर्वहि अनीश्वरता घडेना, जेथें अनीशपण लेशहि सांपडेना, ।
लीला जशा रुचति लोकरिती मनाला तैशा करूनि हरि उद्धरितो जनाला. ॥
माया अचेतन चराचर ज्या प्रकारें मायामयेंचि हरिचीं सगुणें शरीरें; ।
मायामयत्व उभयत्र वदोनि साम्यें, धाता तथापि वदला बहु तारतम्यें. ॥ १६४
ईशत्व आणिक अनीश्वरता तथापी मिथ्यात्व तों समचि ईशअनीशरूपीं, ।
या कारणें अनृत[10] विश्व म्हणूनि आतां सिद्धांत हा दृढ करीत असे विधाता. ॥
ज्या[11] विश्वकारण तुझ्या अवतारमूर्तीं त्याही मृषा जरि समर्थ पवित्रकीर्ती, ।
त्या कारणास्तव समस्त असत्य देवा ! स्वप्नासमान सचराचर वासुदेवा ! १६६
स्वप्नाअसें अनृत[12] नश्वर[13] दुःखरूपी तें सत्य शाश्वत[14] दिसे तव चित्स्वरूपीं; ।
मायेचपासुनि असत्य जरी उदेलें, जाणों खरेंचि जग येरिति सत्य झालें. १६७
मायाच विश्व म्हणती निगमीं[15] पुराणीं मायेचपासुनि तयांस विरंचिवाणी, ।
उत्पत्ति बोलत असे तरि दोनि माया कैशा म्हणाल ? तरि सावध आयका या.
मातींत जेंवि घटकारण शक्ति कांहीं, आहे जरी अनुभवाप्रति येत नाहीं, ।
नाहीं म्हणाल तरि घागरि[16] होय कैसी ? ब्रह्मीं प्रपंच[17] करणारहि शक्ति ऐसी. ॥
झाला जरीं घटविकार न मृत्तिकेला, दुग्धासि जेंवि दधिरूप विकार केला, ।
दुग्धांतही असति शक्ति तसीच जेव्हां दुग्धत्वहानि नव्हती दधिमाजि तेव्हां. ॥
होती घटाकृति नसोनि उगीच माती, तीमाजि[18] जेंवि घटकारक शक्ति होती, ।

---

१. भूवन्, भगवान्, परात्मन् इत्यादि संबोधनें (विशेषणें) २. त्याला योग्य अशीं. ३. अज्ञात. ४. नीळ्या कमळासारखा वर्ण ज्याचा तो. ५. भृकुटी वांकडी केल्याबरोबर. 'भूकर्तृ' असाही पाठ आहे. ६. असुरांनीं दिलेला भार (पीडा, त्रास.) ७. वामनावतारीं तीन पावलांनीं. ८. त्रिपाद भूमि दानासाठीं हात पुढें करी. ९. शेषावर शयन करणारा. १०. असत्स्वरूप, मिथ्या. ११. 'तस्मादिदं' इत्यादि २२ वा श्लोक पहा. १२. खोटें. १३. नाशवंत. १४. सनातन. १५. वेदांत. ('निगमो वाणिजे पुर्या कटे वेदे वणिक्पथे' इति विश्वः.) १६. घट, घागर. १७. अचेतन जग. १८. 'तीमाजि जे विशद कारणशक्ति होती' असाही पाठ आहे.

ब्रह्मीं प्रपंच नसतां असतेचि माया, जे कां असी तसि म्हणूनि नये म्हणाया. ॥
रज्जूंत सर्प करणार असीच कांहीं जे शक्ति ते अनुभवाप्रति येत नाहीं, ।
जे कां अं[1]वस्तुहि असोनि दिसे न दृष्टी जैसी दिसे अनृतकार्यहि सर्पसृष्टी. १७२
अज्ञान शु[2]क्तिविषयीं करितेच शक्ती जे कां रुपें करुनि दाखवि शुद्धशुक्ती, ।
अज्ञान तें न म्हणवे बहुतांस विद्या देऊनियां उरलियांस करी अविद्या.॥ १७३
अज्ञान तेंचि असती तरि शुक्ति जेव्हां, एकाजणास कळली, तिस नाश तेव्हां. ।
अज्ञान शुक्तिविषयीं मग आणिकांला होऊं नये उपजतें तरि केंवि बोला ? १७४
निर्माण शुक्तिविषयीं करि जे अविद्या, निर्माण शुक्तिविषयीं करि तेच विद्या. ।
दोहींस कारण असी निजशक्ति कांहीं, जे ते प्र[3]तीतिस कदापिहि येत नाहीं. १७५
ब्रह्मीं असी सकळकारणशक्ति कांहीं, माया असोनिहि दुजेपण जीस नाहीं, ।
'मा[4]'शब्द 'ना[5]स्ति' म्हणतो, नदिसे स्वरूपीं. 'या'शब्द जे म्हणुनि तीस वदे तथापी.
ब्रह्मीं दुजेपण करी न म्हणूनि नाहीं कार्या मृ[6]षा करुनि कारणशक्ति कांहीं. ।
मायार्थ कारणपणांत असे रितीचा नामार्थ कार्यपणही वदिजेल तीचा. ॥१७७
'मा'शब्द 'नास्ति' म्हणिजे घटवस्तु नाहीं, 'या'शब्द जे असिहि ते घटसृष्टि कांहीं;।
मातींत येरिति नसोनि दिसे म्हणूनी माया तिला म्हणति वर्ण तिचेच दोनी. ॥
'या'शब्द त्यांत पहिलें मग 'मा' म्हणूनी 'या[7] मा' तिला म्हणति वर्ण तिचेच दोनी. ।
'या'शब्द जे म्हणुनि दाउनि दे अविद्या 'मा'शब्द तीसहि निषेधुनि दे स्वविद्या.॥
इत्यादि अर्थ बहु फार असोत आतां, या प्रस्तुतीं हरिस काय वदे विधाता. ।
मायेचपासुनि म्हणे जरि विश्व झालें सत्या असेंचि जग सर्व दिसोनि आलें.॥१८०
कीं सत्य नित्यसुखबोध अशा स्वरूपीं, तूझ्या म्हणूनि दिसतें न असें तथापि; ।
कीं विश्वकारणहि ते लटिकीच माया हें कार्यरूपहि असत्यचि देवराया ! ॥१८१
मिथ्याचि कारणहि कार्यहि या प्रकारीं, तें सत्य जें परमकारण तूं मुरारी ! ।
मृत्पिंड आणि घट दोनि असत्य माया माती खरी, परमकारण देवराया ! १८२
माती खरी, घट मृषा, परि सत्य झाला, मातीकडूनचि खरेपण कीं तयाला. ।
माती करूनि घट यद्यपि सत्य वाटे, काळत्रयांत घट मातिस तों न भेटे. १८३
मातींत आधीं नव्हताचि जैसा, अंतीं न मातींत उरेल तैसा, ।
मातीविणें तों घटवस्तु नाहीं, माती नसे ही तरि त्यांत पाहीं. ॥ १८४

१. खोटी वस्तु, मिथ्या वस्तु. २. शिंपीविषयीं. ३. अनुभवास. ४. मा=नाहीं; या=जी (घटसृष्टि). ५. नाहीं. जी घटसृष्टि नाहीं असा 'माया'शब्दाचा अर्थ या स्थलीं दर्शविला आहे. ६. खोट्या. ७. 'माया'शब्दांतील वर्ण उलट केले म्हणजे 'या मा' असें पद उत्पन्न होतें. या (जी अविद्या) मा (नाहीं). यांत अविद्येचा निषेध दाखवून विद्या असा अर्थ केला आहे.

ब्रह्मीं प्रपंच नव्हता पहिलाच जैसा, संहार होइल तयीं न तयांत तैसा; ।
आतां असोनिहि दिसोनिहि तो न कांहीं ब्रह्मीं प्रपंच म्हणवूनि कदापि नाहीं.॥
अधिष्ठानसत्यें[1] करूनी विर्वर्ता[2] दिसे सत्यता येरिती विश्ववार्ता. ।
मृषा होउनी ही जसें सत्य दीसे स्वयें दुःखही तें सुखाभास भासे.॥१८६
ऐसें असत्य जग होउनि दुःखरूपी तेथें गमे सुख तुझ्याच सुखस्वरूपीं. ।
जेथें भुजंग लटिका भयकंपकारी तेथें सुगंध सुखकारक पुष्पहारीं[3]. ॥ १८७
तूं सत्य यास्तव असत्यहि सत्य झालें, ज्ञानें तुझ्या जड सचेतनतेस आलें. ।
दुःखांत या सुख तुझ्याच सुखें अनंता! भावार्थ हा धरुनि बोलियला विधाता.॥
कोठें अचेतन दिसे जग हें तथापी, तंतूमधें पट जसा तव चित्स्वरूपीं. ।
याहीमधें नवल एक वदे विधाता कीं हें चराचर नसोनि दिसे, अनंता! १८९
खरें हेम तेथें अलंकार माया नसोनी असेसा दिसे, देवराया! ।
न पूर्वी न अंतीं अलंकार कांहीं नसे वस्तुता भास तो तेधवांही. ॥ १९०
तुझी एक सत्ता खरी तींत नाना दिसे हें जरी विश्व कांहीं असेना, ।
न हें आदि अंतीं दिसे विश्व आतां, तरी तूंचि तें विश्व नाहीं, अनंता!॥
स्वरूपीं तुझ्या विश्व मिथ्या, अनंता! असें बोलिला पूर्वपद्यें विधाता. ।
अलंकारसोन्यास एकत्व जेव्हां म्हणूनी म्हणे विश्व हें तूंचि तेव्हां. ॥१९२
म्हणूनीच 'सर्व[4] खलु ब्रह्म' ऐसें श्रुती बोलती साधलें तेंचि तैसें. ।
घडे ऐक्य हें चिज्जडाचें, तथापी दिसे जीवनामात्मता चित्स्वरूपीं. ॥ १९३
चिदात्मत्वही एक ऐसें विरंची स्वतःसिद्ध जीवात्मता श्रीहरीची, ।
वदों पाहतो या प्रसंगीं विधाता, वदे लक्षणें वस्तुचीं श्रीअनंता! ॥ १९४
तूं[5] एक ऐसें म्हणतो विरंची या एकशब्दें स्तुति काय त्याची? ।
एक स्वयें तो भलताचि आहे यालागिं हा अर्थ न येथ साहे. ॥ १९५
हरिहि एक अनेकपणें जरी, स्फुरण दाउनि भेदहि तो हैरी[6] ।
तरिच एक तया म्हणणें बरें म्हणुनि एक म्हणे विधि आदरें. ॥ १९६
'तूं बिंब एक, अवघे प्रतिबिंब, देवा! चिद्रूप जीव म्हणती श्रुति वासुदेवा! ।
हें स्वप्नजागृतिमधें जरि वेगळाले तुर्यासुषुप्तिसमयीं ढुँरती[7] निराळे. ॥ १९७
भोगार्थ हे तुझि अनादि विचित्र युक्ती, कीं वासनाफळहि भोगुनि नित्य मुक्ती. ।

---

१. स्थानमाहात्म्यानें, स्थानबळानें. २. भोंवऱ्याला. ३. पुष्पांच्या हारांत. ४. छांदोग्योपनिषदांतील हें वर्णन आहे. ५. 'एकस्त्वमात्मा' इत्यादि २३ वा श्लोक पहा. ६. हरण करी. ७. न उरती. (न+उरती; येथें 'न'च्या 'अ'ला परसवर्ण झाला आहे.)

भोक्ता अनीश्वरहि तूं प्रतिबिंबरूपें तें तद्विलक्षणहि बिंब निजस्वरूपें. ॥ १९८
जें एक तूं म्हणउनी विधि बोलियेला, भावार्थ हा विशद त्यांतुनियां निघाला. ।
याकारणें पुढलियाच पदीं विधाता आत्माच तूं म्हणुनि बोलतसे, अनंता! ॥
बिंबत्व आणि तुजला प्रतिबिंबताही आत्मा असा म्हणुनि तूंचि समस्त देहीं, ।
याकारणें पुरुषनाम तुझें, अनंता! ऐसें पदीं तिसरिया वदतो विधाता. ॥२००

वससि यां सकळां विविधा पुरीं पुरुषनाम तरीच तुझें, हरी ! ।
दिसति भेद परस्पर मीपणें, पुरुष तूं प्रतिबिंब अशागुणें. ॥ २०१
लयसुषुप्तिउपाधिस जेधवां, उरसि केवळ बिंबचि तेधवां. ।
पुनरपि प्रतिबिंबपणें तयीं, मिरवसी करिसी जग हें जयीं. ॥ २०२
उदक निर्मळ सत्वहि येरिती, तरि चिदंश पृथक् प्रतिबिंबती; ।
चिखल सत्वजळीं तम कालवे, स्मृति न सत्वगुणीं मग बोलवे. ॥ २०३
गढुळ सत्व तमोमय जेधवां, प्रतिमुखें न जळीं मग तेधवां. ।
तइं सुषुप्तित बिंबचिदैक्यता, श्रुतिहि हें स्फुट बोलति तत्वता. ॥ २०४
जइं बसे दृढ कर्दम तो तळीं, नितळतां प्रतिबिंब दिसे जळीं. ।
पुरुष तूं प्रतिबिंबपणें असा, पुरुष बिंबतसा म्हणवे कसा? ॥ २०५
मिळति तूजमधें प्रतिबिंबकें, निघति होति जयीं अमलोदकें. ।
तुज असें रिघणें निघणें नसे, पुरुष ते तुजतुल्य वदों कसे? ॥ २०६
पुरुष बिंब रिघे न निघे कधीं, म्हणुनि येथ चतुर्थपदें विधी ।
म्हणतसे, 'पुरुषांत पुराण तूं, अगुण होउनि ईश सुजाण तूं.' ॥ २०७
तव पुराणपणेंचि पुराणता, प्रतिमुखा पुरुषां तुजला स्वता, ।
तुजमधें रिघती निवती जरी, तुजकडूनि पुरातन ते हरी. ॥ २०८

जीवात्मता सकळ येरितिनें हरीची, यां चौंपदेंकरुनि बोलियला विरंची. ।
कीं बिंब तूंचि सकळां प्रतिबिंबकांचें, बोलेल याउपरि कीं हरि तेंचि साचें. ॥
'आत्मा पुराणपुरुषा हरि सत्य तो तूं, मिथ्या चराचर पटांतिल सत्य तंतू'. ।
श्लोकांत हें पहिलिया वदला विरंची, ते सत्यता विशद वर्णिल येथ साची. ॥
कीं दृश्य विश्व जरि केवळ सत्य होतें, तूं ब्रह्म सत्य म्हणतांच विरुद्ध येतें. ।
कीं ब्रह्म कारण चराचर कार्य तेव्हां, कां तंतु सत्य म्हणणें? पट सत्य जेव्हां. ॥

१. स्पष्ट. २. ईश्वरत्व. ३. जीवत्व. ४. देहरूप पुरीचे ठायीं शयन करणारा. (पुर्षु शेतेऽसौ पुरुषः.) ५. देहरूप नगरींत. ६. चैतन्ययुक्त. ७. तमोरूप कर्दम. ८. चिखल. ९. स्वच्छ करतां. १०. पंकरहित जलें. ११. जुना. १२. जुनाटपणा.

या कारणें पट असत्य म्हणूनि तंतू, जैसा खरा म्हणति कारण सत्य तो तूं. ।
जैसीं स्वयें दिसति तंतु सुवर्ण माती तैशा स्वयें न पटकुंडलकुंभजाती. ॥२१२
तंतूविणेंचि असता पट वस्तु कांहीं, तंतूविणेंचि दिसता तरि सत्य तोही. ।
सोन्याविणें कैटक कुंडल येचरीती, तैसें असत्यचि घटादिक सत्य माती. ॥२१३
दृष्टांत हे सकळ सत्यपणास ऐसे, हेही पदार्थ जड होतिल सत्य कैसे? ।
जे हे स्वयें सकळ होतिल सत्य जेव्हां कोणी प्रकाशक न यांस दिसेल तेव्हां. ॥

विश्व ब्रह्मविना स्वयेंचि न दिसे मिथ्या म्हणूनि स्वयें,
ज्याणें विश्व दिसे प्रकाशक तया कोणी नसे निश्चयें. ।
तेव्हां तोचि खरा म्हणूनि म्हणतों कीं तूं स्वयंज्योति तो
आत्मा निर्गुण तो प्रकाशुनि जडा विश्व स्वयें भासतो. ॥ २१५

ब्रह्म स्वयंज्योति जसें तसा हा, जीव स्वयंज्योतिहि कां न पाहा? ।
दोष स्वयंज्योतिपणास तेव्हां जीव स्वयंज्योति अनेक जेव्हां. ॥ २१६

हरावया या दृढपूर्वपक्षा, अनंतशब्दें कमळायताक्षा ।
ब्रह्मा म्हणे, 'तूंचि अनंत जेव्हां, दूजा स्वयंज्योति घडे न तेव्हां.'॥२१७

अनंत स्वयंज्योति हा पूर्ण साचा, न देशें न काळें गमे अंत याचा, ।
जसा सर्वकाळीं तसा सर्वदेशीं, प्रकाशे स्वयें, भास मिथ्या प्रकाशीं.॥२१८
दहाही दिशा नेणती अंत ज्याचा, अनंत स्वयंज्योति तो तूंचि साचा; ।
शरीराहुनी जीव बाहेरि नाहीं प्रकाशत्व सर्वत्र ज्याला न कांहीं. ॥ २१९
स्वदेहाविणें जो नसे अन्यदेहीं, स्वयंज्योति बिंब स्वयें तो न कांहीं. ।
असाही तरी जागृतिस्वप्नकाळीं सुषुप्तींत सत्ता दिसेना निराळी. ॥ २२०

सुषुप्तिकाळीं प्रतिबिंब बिंबीं मिळे, स्वबिंबात्मसुखावलंबीं ।
'तेथें न आनंदहि जाणतो तो, उपाधियोगें मग आठवीतो. ॥ २२१

आनंदमात्र, परि त्यांत न धर्म कांहीं, नेणे सुधा स्वमधुरत्व असेंचि तेंही ।
बिंबीं तया मिळतसे प्रतिबिंब जेव्हां आनंदमात्र परि वृत्तिविहीन तेव्हां.॥२२२

रजतमकृत दुःखें जाणतो बुद्धियोगें,
अनुभव असुखाचा त्याच जीवास भोगें, ।

---

१. कर्णभूषण. २. वलय. ३. ब्रह्माच्या प्रकाशाशिवाय विश्व दिसत नाहीं, पण ब्रह्माला प्रकाशक कोणी नाहीं, यास्तव तें ब्रह्म मात्र सत्य आणि विश्व मिथ्या. ४. स्वयंप्रकाशक. ५. कमळासारखे आयत (लांब, विस्तृत) आहेत अक्षि (डोळे) ज्याचे त्यास. ६. तूं स्वयंज्योति आहेस म्हणून पूर्ण आहेस, तुला वृद्धिक्षय हे धर्म नाहींत. ७. तुला प्रदेशानें अथवा कालमर्यादेनें परिमित करतां यावयाचें नाहीं. ८. जीवाला नाहीं. ९. 'तेथें निजानंदहि जाणतो तो' असाही पाठ आहे.

परम असुख मी तों कीं तुझें आणि माझें,
म्हणुनि मनिं वहातो नित्य हें जीव ओझें. ॥ २२३
कोणी शिरीं धरुनि चालति भार जेव्हां, भोगोनियां म्हणति हें उतरेल केव्हां ?।
मीतूंपणें करुनि जो करि जीव धंदा, कंटाळतो मग गुणात्मकवृत्तिवृंदा. ॥ २२४
चित्तांत ज्या उठति चित्रविचित्र वृत्ती, निद्रेमधें प्रबळ तें तम त्याच चित्तीं. ।
वृत्तिप्रतीति नसतां मग भार त्याला, नाहीं स्वबिंबसुख ऐक्य तयीं जयाला. ॥ २२५
सुषुप्तींत मी तूं तुझें आणि माझें, न वाहे शिरीं जीव हें वृत्तिओझें, ।
विना दुःख जो काळ निद्रेंत गेला, प्रबोधीं निजानंद वाटे तयाला. ॥ २२६
सुषुप्तीमधें तों सुखाची प्रतीती, नसे मानितां ते घडेना सुषुप्ती, ।
समाधींतही वीसरे सर्व कांहीं, तयीं विस्मृती स्वात्मतेचीच नाहीं. ॥ २२७
सुषुप्तींतही नाठवे अन्य जेव्हां, निजानंदमात्र स्फुरे यासि तेव्हां; ।
सुषुप्तीसमाधीमधें भेद कांहीं दिसेना, असें बोलतां येत नाहीं. ॥ २२८
विना बुद्धि निर्धर्म नेणे प्रतीती, तमोलीनता तीस जेव्हां सुषुप्तीं, ।
विना दुःख निद्रेंत जो काळ गेला, प्रबोधीं सुखत्वें स्मरे जीव त्याला. ॥ २२९
स्वबिंबीं असा काळ निद्रेंत जातां, न काळें अनंतत्व त्याला अनंता ! ।
तुझा अंश तूझें अनंतत्व त्याला न देशें न काळें स्वयें तें जयाला. ॥ २३०
अनंत स्वयंज्योति तो तूं मुकुंदा ! स्वयंज्योति कैसें म्हणों जीववृंदा ? ।
धरूनी असा भाव पोटीं विधाता अनंताख्यनामें स्तवी श्रीअनंता. ॥ २३१
सुषुप्तिकाळीं सुख बिंबरूपें, तें मानिती सर्व निजस्वरूपें; ।
तेव्हां स्वयंज्योति तुझीच ज्योती, जीच्या प्रतिज्योति अनेक होती. ॥ २३२
स्वयंज्योतिच्या जीवज्योती अनेका असे तेधवां व्यर्थनानात्मशंका, ।
तरी देशकाळें अनंतत्व ज्याला, स्वयंज्योति कैसें वदावें तयाला ? ॥ २३३
अनंत स्वयंज्योति हें सिद्ध जेथें, स्वयें सिद्ध सत्यत्व झालेंच तेथें; ।
नव्हे सत्य जें दीसतें विश्व नाना, प्रकाश स्वयें त्या जडाला असेना. ॥ २३४
स्वयंज्योति शब्दें असें सिद्ध झालें, प्रपंचा जडालागिं मिथ्यात्व आलें; ।
विना मृत्तिका कुंभ जेव्हां असेना विना मृत्तिका कुंभ तेव्हां दिसेना. ॥ २३५

१. गुणात्मक वृत्तीच्या समुदायास. २. जागृतींत. ३. अनुभव, प्रत्यय. ४. प्राणिसमुदायाला. ५. एका दीपापासून जसे अनेक दीप लागतात (उत्पन्न होतात) तसे एका स्वयंज्योतीपासून अनेक ज्योति होतात.

असत्यत्व सत्यत्व एके रितीनें असें सूचिलें भारतीच्या पतीनें; ।
स्वयें मृत्तिका दीसते सत्य ऐसें, तिणें भासतें कुंभमिथ्यात्व तैसें. ॥ २३६
प्रकाश स्वयें ब्रह्म त्यावीण कांहीं दिसेना, असें त्यास सत्यत्व नाहीं, ।
दुजे रीतिनें सत्यमिथ्यात्व आतां, सुचे येरितीनें स्तवी श्रीअनंता. ॥ २३७
तूं आद्य नित्य हरि अक्षर तूं म्हणूनी, सत्यत्व वर्णित असे त्रिपदेंकरूनी, ।
तूं आद्य कीं प्रथम ऐकचि तूं मुकुंदा ! जो निर्मिसी सकळ या जडतत्ववृंदा. २३८
न निर्माण होता मृषा कुंभ जेव्हां, स्वयें मृत्तिका सिद्ध होतीच तेव्हां, ।
नव्हे विश्व होतें जईं श्रीअनंता, तुझा एक लक्षांश चिन्मात्र होता.॥२३९
सरस्वतीचा पति याच भावें म्हणे, 'हरी ! आद्य तुतें म्हणावें, ।
तसाच अंतीं उरसी मुकुंदा ! गिळूनियां सर्वअनित्यवृंदा.'॥ २४०
भावें अशा बोलतसे विधाता, कीं नित्य तूं याकरितां, अनंता ! ।
नासे मृषाकुंभ असेच माती तूं सत्य तो एकचि आदिअंतीं. ॥ २४१
जें आदिअंतीं उरतें तयातें, सत्यत्व मिथ्यात्व दुज्यास येतें, ।
मध्येंच निर्माण घटादि होती, ते पाहतां एकचि सत्य माती. ॥ २४२
घट दिसे परि वस्तुचि तो नसे, अनृत होउनि मातिमधें वसे, ।
तरि नसेचि म्हणा घट यारिती, अनृत हें जग सत्य रमापती !॥२४३
प्रपंचउत्पत्तिलयावरूनी न आदिअंतीं जग हें म्हणूनी, ।
मिथ्यात्व मध्यें सहजेंचि आलें, तथापिही शंकित चित्त झालें. ॥२४४
न हें विश्व झालें न हें विश्व नाशे, जगीं बोलती एक पाषांड ऐसें; ।
जसें होउनी सर्वही नाशताहे, तसें विश्व झालें पुढेंही न राहे. ॥ २४५
जसा पुत्र होतो तसा बाप झाला, पित्याचा दिसे जन्म तर्कें सुताला. ।
समस्तां दिसे नाशउत्पत्ति होती, जगा नाश उत्पत्ति तर्कें करीती.॥ २४६
न यां पंचभूतां दिसे अंत आदी, तरी साधतें येरिती हेंचि वेदीं. ।
जसे देह होती तसीं पंचभूतें, जसा नाश यांला तसा नाश त्यांतें.॥ २४७
जसीं सर्वभूतें क्षरें लोकदृष्टीं, असी सर्वही हे क्षयी ब्रह्मसृष्टी, ।
उरे अक्षर ब्रह्म जें सर्व अंतीं, खरें तेंचि हें साधिलें सर्व संतीं. ॥ २४८
मधेंही क्षरें भौतिकें येचिरीती, क्षरें पंचभूतें न हें आदिअंतीं. ।
क्षितीमाजिही या क्षरत्वें अनंता ! खरा तूंचि हें बोलताहे विधाता.॥२४९

---

१. सूचविलें. २. ब्रह्मदेवानें. (ब्राणीचा पति–विधि.) ३. क्षय न पावणारा. ४. 'येरिति' असा अन्य पाठ आहे. ५ न असे. ६. पाखंडी, नास्तिक. ७. देहांला. ८. पंचभूतांला. ९. नाशवंत. १०. पंचभूतात्मक वस्तु.

नित्यत्व वर्णुनिहि अक्षर तूं म्हणूनि, बोले विरंचि मनि भाव असा धरूनी; ।
कालत्रयीं हरिच सत्य न अन्य कांहीं, भासे तथापि हरिवांचुनि अन्य नाहीं. ॥
सत्यत्वलक्षण असें उभय प्रकारें मिथ्यात्वलक्षणविलक्षण ज्या विकारें, ।
[1]श्लोकांत यारिति असें विधि बोलियेला तस्मात् प्रपंच हरिरूप समस्त झाला. ॥
पटचि तंतु घटादिक मृत्तिका, [2]कनकताचि जसी [3]कटकादिकां ।
भुजगरज्जुचि शुक्तिरुपें जसें, हरिच विश्व समस्तहि हें तसें. ॥ २५२
विनवितां हरिचीं निजलक्षणें, हरिच सत्य म्हणूनि विचक्षणें ।
कथियलें विपरीतविलक्षणें जगमृषात्वकटाक्षनिरीक्षणें. ॥ २५३
जग मृषा तरि कां विषयीं सुखें, म्हणुनि येरिति येथ चतुर्मुखें ।
किमपि शंकित मानस देखिलें, सुखहि तें हरिरूपचि लेखिलें. ॥ २५४
सुख म्हणों हरिरूपचि हें जरी, क्षणिक आणि सदोष कसेपरी? ।
मग म्हणे विषयात्मक निश्चयें, क्षणिक आणि सदोष न तें स्वयें. ॥ २५५
यालागिं नित्यसुख तूं म्हणतो विधाता, हें बोलवे न तुज नश्वरता, अनंता! ।
वारी मृषा विषयदोष तयावरूनी कीं नित्य तें सुख निरंजन तूं म्हणूनी.॥२५६
दुःख प्रपंच, सुख त्यांतहि वासुदेवा! तें तों स्वरूपचि तुझें जगदात्मदेवा! ।
आनंद नश्वर सदोष जगीं तथापी निर्दोष नित्यसुख तूं स्वसुखस्वरूपी. ॥ २५७
[4]सुमनहार [5]सुशीत सुवास तो, अनृतसर्प तयावरि भासतो, ।
सुख तयावरिल्या पवनें क्षणें, किमपि तों भय [6]सर्पनिरीक्षणें. ॥ २५८
घडिघडी विषयीं सुख जें हरी! सुख तुझेंच तथापिहि यापरी. ।
विषयसर्प मृषा भय दाविती, सुख तथापिहि तूंच रमापती! ॥ २५९
[7]सुख तुझें विषयाकरितां हरी क्षणिक आणि सदोष गमे परी, ।
सुख निर[8]ंजन नित्यचि तूं स्वयें क्षणिक आणि सदोष न निश्चयें. ॥ २६०
जे हार नेणति तयांसचि सर्प होतो, जे जाणती मृदु सुगंध तया जना तो. ।
हें विश्व दुःख परि जो विषयांत कांहीं आनंदलेश तुजवांचुनि अन्य नाहीं.२६१
आनंद नाहीं विषयांत कांहीं, आनंद तूं व्यापक सर्व देहीं. ।
मानूनि पाणी [9]रविरश्मि [10]तृष्णा वाटे जसी कां हरणासि [11]तृष्णा.॥ २६२

---

१. 'श्लोकांत या विधि अशारिति बोलियेला' असाही पाठ आहे. २. सुवर्णता. ३. वलयादिकांना. ४. पुष्पहार. ५. शीतल. ६. सर्प अवलोकन केल्यानें. ७. 'घडिघडी विषयीं सुख जें हरी' असाही पाठ आहे. ८. निर्मळ. ९. सूर्यकिरण. १०. इच्छा. ११. तहान.

जैसें मृगांसि लटिकें जळ सत्य वाटे, त्यालागिं धांवति, पथीं जळ सत्य भेटे. ।
त्यातें पिऊनि म्हणती, 'जळ तेंचि प्यालों, लक्षूनि जें उदक धांवत येथ आलों.'॥
ऐसे विलास करितां विषयीं जनाला, आनंद त्यांत गमतो जितुका मनाला, ।
तें तों स्वरूपगत केवळ सौख्य आहे, जो अज्ञ तो सुख तया विषयांत पाहे. ॥
जरि अनित्य तरी सुख तों खरें, म्हणसि सौख्य तथापि न तें बरें. ।
सुख निरंजन एकचि तूं हरी म्हणुनि बोलियला विधि यापरी. ॥ २६५
म्हणति अंजन यद्यपि काजळा परि तमोगुण त्याहुनि आगळा. ।
विषयनिर्मित दुःख तया तमा, सुख निरंजन तूं, पुरुषोत्तमा! ॥ २६६
सहज अग्नि सधूम[1] मधीं नसे, जळति त्यांत तयाकरितां दिसे. ।
असुख जें उपजे सुख भोगितां, विषयभोगचि कारण पाहतां. ॥ २६७
विषय तामस राजस इंद्रियें, मिसळलें जरि सत्व मन स्वयें. ।
त्रिगुण वात असी घृत कामना, करि सुखाग्नि निरंजन[2] अंजना. ॥ २६८
ज्या जीवाच्या उपाधी त्रिगुणमय अहो वासनास्नेहतेला[3],
जाळी जो वातिरूपें सुख अनळ[4] करी अंजनप्राय त्याला. ।
वाती तेलासि जाळी जरि अनळ करी काजळातें तथापी
त्याला तों लेप नाहीं विषयसुख असें चित्सुखीं चित्स्वरूपीं. ॥ २६९
येणेंरिती सुख तुझें विषयीं, मुरारी! झालें असे क्षणिक आणिक दुःखकारी. ।
ते तों मृषा विषय वाटत तूज देवा! यालागिं तूं सुख निरंजन वासुदेवा! ॥
निर्दोष जें सुख निरंजन तें म्हणावें, दोषासि अंजनहि बोलति याचि भावें. ।
कीं दोष अंजन जसें तमरूप काळें यालागिं काजळपणें कथिलें निराळें.॥२७०
सुख निरंजन नित्य हरी स्वयें म्हणुनि बोलियला विधि निश्चयें. ।
परम जें सुख लक्षण ये रिती स्तविल यावरि भारतिचा पती. ॥ २७१
श्रुति सुख वदती हें सामवेदांत तत्वें,
अधिगत[5] सुख संतां जें असाधारणत्वें. ।
श्रुति वदति सुखाचें जे स्थळीं नाम भूमा[6]
निपुण म्हणति भूमा तें जयाला न सीमा. ॥ २७२
सनत्कुमाराप्रति नारदानें केला असा प्रश्न विशारदानें[7]. ।
कीं, 'तूं गुरू केवळ दीनबंधू, माझा निवारीं भवशोकसिंधू.' ॥ २७४

१. धुरानें युक्त. २. कज्जलरहित. ३. वासनारूप तेलपणाला. ४. अग्नि. ५. प्राप्त. ६. मोठें, व्यापक. ७. निपुणानें.

हे दोघही पुत्र विधातयाचे परस्परें बोल असे तयांचे, ।
गाती श्रुती सामक सामवेदीं प्रमाण जे कां सुखदुःखभेदीं. ॥ २७५
त्या नारदालागिं सनत्कुमारें दिलें असे उत्तर याप्रकारें, ।
कीं, 'शोकसिंधू उतरोनि जाणें तेव्हां सुखाचें निजरूप जाणे.'॥२७६
तो नारद प्रश्न करी तयातें कीं, 'तें कसें तें सुख सांग मातें.' ।
स्वरूप तो त्यास वदे सुखाचें कीं नाम भूमा सुख तेंचि साचें. ॥ २७७
'यो वै भूमा तत्सुखं' या श्रुतीचा बोले अर्थ स्पष्ट जो येरितीचा, ।
कीं जो भूमा तोचि आनंद साचा भूमाशब्दें अंत नाहीं जयाचा. ॥ २७८
न देशें न काळें कधीं अंत ज्याला, अहो ! बोलती वेद भूमा तयाला, ।
जडें स्थावरें जंगमें अंतवंतें श्रुती बोलती दुःखरूपें तयातें. ॥ २७९
असी असाधारणता सुखाची या प्रस्तुतीं वर्णितसे विरंची; ।
कीं तूं हरी पूर्ण म्हणूनि धाता या पूर्णशब्दें स्तवितो अनंता. ॥ २८०
सुखसमुद्र अखंड रमापती, लहरिया विविधा विषयाकृती, ।
जळधि तोचि जरी लहरी जळीं, जलधि पूर्ण न त्या अवध्या स्थळीं.॥२८१
विस्तीर्ण अत्यंत समुद्र जैसा, विस्तार नाहीं लहरींस तैसा. ।
समुद्र अंशें लहरींत आहे, तरी न पूर्णत्व तरंग साहे. ॥ २८२
तें सर्वकाळीं सुख सर्वठायीं तो एक नारायण शेषशायी ।
सुखांशलेशें विषयीं जरी तो, तेथें अपूर्णत्वचि दाखवीतो. ॥ २८३
एवं प्रपंच लटिका अतिदुःखरूपी, आनंद केवळ अनन्य हरिस्वरूपीं. ।
त्याच्या सुखेंचि विषयीं सुख हें विधाता श्लोकांत भाव वदला स्तवितां अनंता. ॥
सुखस्वरूपें हरि वर्णियेला, तथापिही शंकितचित्त झाला. ।
कीं ज्यामधें हें जग दुःखरूपी, हें द्वैत तों बाधक त्या स्वरूपीं. ॥ २८५
हृदयिं शंकित होउनियां विधी, मृगजळांत म्हणे रविचे कधीं ।
किरण हे बुडती जरि तेधवां, अनृतदुःखहि बाधक, माधवा ! ॥ २८६

१. सनत् आणि नारद. २. सामवेदांतील. ३. समजणें. ४. हें छांदोग्य उपनिषदांतील वचन आहे. ('यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति भूमैव सुखं भूमा त्वेव विजिज्ञासितव्यः' इति). ५. ना- शवंतें. ६. लाटा. ७. अनेक. ८. समुद्र. ९. समुद्र जसा लहरींत अंशमात्रें आहे, पण पूर्णरूपानें नाहीं, तसा पूर्णसुखी नारायण जीवांत अंशमात्रें आहे, यास्तव जीवास पूर्ण सुख नाहीं, त्याचें सुख अपूर्ण आहे. १०. या प्रमाणें.

जें सत्य तें सत्य असत्य नाहीं, न विश्व आहे हरिमाजि कांहीं, ।
या कारणें अद्वय तूं, अनंता ! म्हणूनियां वर्णितसे विधाता. ॥ २८७
मिथ्या प्रपंच हरि एकचि सत्य सर्वी, हें चिज्जडैक्य कथिलें विधिनेंच पूर्वी; ।
श्लोकांत या सकळजीवचिदैक्य आलें हें सर्व अद्वयपदें स्फुट सूचवीलें. ॥ २८८
'नसे द्वैत जेथें नसे त्रास तेथें,' विधाता असा दावितो भाव येथें. ।
असीं लक्षणें रत्नसंख्या हरीचीं स्तुतीमाजि या बोलियेला विरंची. ॥ २८९
श्लोकांत या भारतिच्या पतीनें निरूपिलें तत्व असे रितीनें, ।
हीं लक्षणें केवळ निर्गुणाचीं साशंक यालागिं मनीं विरंची. ॥ २९०
'सगुण सुंदर निर्गुण हा कसा' कमळसंभव शंकित तो असा, ।
विमळ ईशउपाधि मनीं स्फुरे, सगुण निर्गुण भेद न तो उरे. ॥ २९१
ब्रह्मीं उपाधिकरितां सगुणत्व आलें, साकाररूप मग त्याकरितांचि झालें. ।
त्याला स्वयें अगुण हेचि सदां प्रतीती, तेव्हां कसे सगुणनिर्गुणभेद होती ?॥२९२
हृदयिं येरिति भारतिचा पती धरुनि भाव असा स्वपित्याप्रती ।
'अमृत' आणिक 'मुक्तउपाधि' तो म्हणुनि मूळ पदद्वय बोलतो. ॥ २९३
अमृत म्हणति मोक्षा, तोचि तूं अंबुजाक्षा !
सगुणअगुणलक्षा येसि जो भक्तपक्षा. ।
श्रवणमननसाक्षात्कार ज्या ज्ञानदीक्षा,
तत्र तनु करि शिक्षा कीं जगीं धर्मरक्षा. ॥ २९४
जो उपाधि तुजला सगुणत्वीं नित्यमुक्तचि तया शुभसत्वीं ।
निर्गुणीं सहज नित्य समाधी ज्यास जो हरि तुझा सदुपाधी. ॥ २९५
अगुणताच अखंडपणीं स्फुरे सगुणता मग केंवि दुजी उरे ।
अमृत आणिक मुक्तउपाधि तो द्विपदभाव असा विधि दावितो. ॥ २९६
श्रुतिमणिगणमेळा शुद्धबुद्धींत गोळा,
करुनि रचुनि माळा लक्षणें जींत सोळा ।

---

१. चैतन्याचें आणि जडाचें ऐक्य. २. चतुर्दशसंख्या. कारण रत्नें चौदा आहेत. येथपर्यंत परमेश्वराच्या चौदा गुणांचें (लक्षणांचें) वर्णन झालें. यापुढें परमेश्वराच्या आणखी दोन गुणांचें वर्णन व्हावयाचें आहे. 'अमृत' आणि 'उपाधिमुक्त' (श्लोक २३) या दोन गुणांचें (लक्षणांचें) वर्णन येथपर्यंत आलेल्या विषयांत झालें नाहीं. ३. ईश. ४. सगुणरूपानें व अगुणरूपानें तूं भक्ताच्या ध्यानांत येतोस. ५. मृत्युरहित. ६. उपाधींपासून सुटलेला. ७. दोन पदांचा अभिप्राय. ८. वेदरूप जो मणिगण त्याचा समूह. ९. 'एकस्त्वमात्मा' इत्यादि २३ व्या श्लोकांत वर्णिलेलीं सोळा लक्षणें त्यांची माळा. हीं लक्षणें अशीं आहेत:–एक, आत्मा, सत्य, पुराण, पुरुष, आद्य, नित्य, अनंत, अद्वय, पूर्ण, अजस्रसुख, अक्षर, अमृत, स्वयंज्योति, निरंजन आणि उपाधिमुक्त.

[1]सजळजलदनीळा अर्पुनी विश्वपाळा
चरण धरुनि [2]भाळा वंदितों त्या कृपाळा. ॥ २९७
[3]श्लोकामधें पूर्विलिया अनंता, जीं लक्षणें बोलियला विधाता, ।
तद्बोध कोणेरिति होय संतां, प्रकार तो वर्णिल येथ आतां. ॥ २९८
[4]अनन्यें तुझीं लक्षणें हीं मुरारी! तुतें जाणती शांत ऐशाप्रकारीं, ।
परी [5]स्वात्मतेनें अशेषात्मभावें! न भेदें जना वाटतो जो स्वभावें. ॥ २९९
प्रतिशरीरिं तुझीं प्रतिबिंबकें स्वतनुमात्रचि तीं अवलंबकें, ।
म्हणुनि जे सकळात्मक आत्मता, हरि! तुझी तिस जाणति तत्वता.॥३००
[6]सर्वात्मबोध गुरुवांचुनि हा कळेना, ब्रह्मात्मता गुरुकृपेविण आकळेना. ।
तूं श्रीगुरु प्रकटसी रविरूप जेव्हां, अज्ञानरूप तम होइल दूर तेव्हां. ॥ ३०१
गुरुवर रविरूपें भेटसी ज्यांस जेव्हां,
[7]निजउपनिषदार्था दृष्टि देसील तेव्हां, ।
तवकिरणसमूहीं मृत्यु संसारसिंधू,
मृगजळ मग होतो, तूं असा दीनबंधू. ॥ ३०२
उमजलें गुरु तत्वचि जेधवां अनृत हा [8]भवसागर तेधवां, ।
[9]उदकभासक भानु कळे जयीं, उदक तें तरणें न लगे तयीं. ॥ ३०३
[10]तरंणि भेटलिया किरणीं जळें, उतरणें तरणें न लगे बळें, ।
[11]गुरुरवी निजदृष्टिस भेटि दे, मग [12]मृषा न तृषा जळसृष्टि दे. ॥ ३०४
जरि मृषा उदकीं न तृषा जना, गुरुकृपेस्तव नासति वासना, ।
जितचि मुक्त विरक्त असे सुधी, न तरतां तरले [13]अनृतांबुधी. ॥ ३०५

---

१. जलपूर्ण मेघाप्रमाणें नीलवर्ण. २. मस्तकावर. ३. 'एवंविधं त्वां सकलात्मनामपि' इत्यादि २४
वा श्लोक पहा. या श्लोकाचा भावार्थ—तूं सकल जीवांचा अत्यंत प्रिय आत्मा होस. गुरुरूप सूर्यो-
पासून मिळालेलें उपनिषदांचें ज्ञान हें तुला पाहण्याचें उत्तम नेत्र आहे. या नेत्रानें जे पुरुष तुला
पाहतात, ते संसाररूप मिथ्या सागराला जसे कांहीं तरून जातात. ४. जे पुरुष तुला प्रत्यगात्म
(अंतर्यामी) स्वरूपानें पाहतात. ५. तूं सकलही जीवांचा प्रिय आत्मा आहेस अशा भावानें. ६. तूं
सर्वांचा आत्मा आहेस हें ज्ञान. ७.तुझीं उपनिषदें म्हणजे ईश्वरप्रणीत उपनिषदें आहेत—असें तात्पर्य.
८. संसाररूप समुद्र. ९. उदकाचा भास करणारे हे भानु (सूर्यकिरण) आहेत, हें खरें उदक
नसून मृगजळ आहे असें कळल्यावर. १०. सूर्य. ११. गुरुरूप सूर्य. 'गुरुरवी चरवी निजदृष्टि दे'
असाही पाठ आहे. १२. मिथ्या. १३. संसाररूप खोटा समुद्र.

म्हणुनियां वदतो विधि ये स्थळीं, लटकिया भवसागरिंच्या जळीं, ।
तरलियाचपरी तरती तयीं, गुरुदिवाकर लोचन दे जयीं. ।। ३०६
वळखती जरि आपलि आत्मता तरति तेचि भवांबुधि अच्युता ! ।
अनृतसिंधुहि ते तरल्यापरी, न तरतां तरती जन हे हरी ! ।। ३०७
श्लोकांत हें पहिलिया वदला विधाता, श्लोकद्वयेंकरुनि साधिल हेंचि आतां, ।
ज्ञानेंचि कां तरति यासि निमित्त येथें, आधीं वदेल मननार्थ अपूर्व जेथें.।।३०८
[3]जे आत्मतेकरुनि नेणति आपणाला, त्यांला प्रपंच जड त्याकरितांच झाला. ।
तें आत्मतत्व कळतां मग विश्व कैसें? रज्जूंत जन्म मरणें भुजगासि जैसें. ३०९
श्लोकार्थ हाचि परि भाव बरा पहातां, जो यांत तो विनविजेल विचार संतां, ।
कीं दोर जो नकळतांचि भुजंग होतो, तो जाणतां अनृतसर्प नसो निजातो. ३१०
रज्जूंत सर्प दिसतो परि रज्जु दृष्टी, आधीं दिसे तरि दिसे वरि सर्पसृष्टी; ।
मिथ्या भुजंग परि झांकुनि सत्य दोरी, दोरीकरूनिच दिसे लटिका विकारी. ।।
आत्माचि रज्जु जड देह भुजंगरूपें, पाहे अहंमति धरूनि निजस्वरूपें. ।
आत्मप्रतीति पहिली मग देह पाहे, नेणोनि देह निजरूपचि मानिताहे.।।३१२
मिथ्याच देह परि झांकुनि आत्मयाला, दृष्टीस दृश्यहि तयाकरितांचि झाला; ।
जैसाचि देह सचराचर विश्व तैसें याला दिसे अनृत सर्पशरीर जैसें. ।। ३१३
रज्जूस नेणति तयां भय कंप देहीं मिथ्याभुजंग करि जाणति त्यांस नाहीं; ।
आत्माचि नेणति निजात्मपणें तयांतें, संसारदुःख सुखबंधनरूप होतें. ।। ३१४
रज्जूच सर्प दिसतो, परि सर्प नाहीं, जाणे असें तरि तयां भय तें न कांहीं; ।
ते जीतमुक्त जन येरिति सर्व सृष्टी ब्रह्मीं नसोनि अवलोकिति ब्रह्मदृष्टीं. ।। ३१५

---

१. तरतात असें न म्हणतां 'तरलियाच परी' असें म्हटलें आहे याचें कारण संसाररूप सागर मुळीं मिथ्या आहे हें होय. मूळांत ही 'तरन्तीव' असें आहे, त्याचा अर्थ–'जसे कांहीं तरून जातात' असाच होतो. २. गुरुरूप सूर्यापासून प्राप्त झालेलें उपनिषदांचें ज्ञान हें तुझ्या स्वरूपाचें अवलोकन करण्यास उत्तम नेत्र आहे. ३. 'आत्मानमेवात्मतया विजानतां' इत्यादि २५ वा श्लोक पहा. या श्लोकाचा भावार्थ—ज्ञानानें संसार तरतात असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं–हा सकल संसार अज्ञानोत्पन्न होय. जे पुरुष आत्म्याला 'आत्मा' असें समजत नाहींत, त्यांना हा संसार खरा असें भासतें, पण त्यांना ज्ञान प्राप्त होतांच हा संसार मिथ्या आणि नाहींसा होतो. यास उदाहरण–दोरीवर शरीराची उत्पत्ति खरें ज्ञान नसतें तोंपर्यंत होते, पण ही दोरी आहे असें खरें ज्ञान झाल्यावर दोरीवरील सर्पपणाचा भास नष्ट होतो. ४. जोंपर्यंत खरें ज्ञान नसतें तोंपर्यंत दोरी सर्प आहे असें वाटतें, पण तिचें खरें रूप कळलें कीं लागलाच सर्प नष्ट होतो. ५. सर्प. ६. मीपणा, ७. मिथ्या, असत्य.

आत्मा असा नकळतां भवबंध झाला, आत्माच ज्यांस कळला मग मोक्ष त्यांला; ।
ज्ञानाविणें इतर मुक्तिस मार्ग कांहीं, वेदस्मृती म्हणति याकरितांच 'नाहीं.'॥ ३१६
मी देह येरिति जडात्मपणांत आत्मा, तोचि स्फुरे, परि न हा निजबोधवर्त्मा; ।
सर्पाकृतीकरुनि दोरचि दृश्य हो ! तो, देखोनि नेणति तयां भय कंप होतो. ॥ ३१७
श्लोकांत याचि म्हणवूनि विरंचि युक्ती कीं आत्मतेकरुनियां कळतांच मुक्ती; ।
आत्मज्ञतेंकरुनि जाणति मोक्ष त्यांला, श्लोकांत त्या पहिलियांतहि बोलियेला. ॥ ३१८
श्लोकांत याहि विधि तें स्फुट बोलियेला, सिद्धांत युक्तिबल देउनि सिद्ध केला. ।
त्या आत्मतेकरुनियांच जनास मुक्ती श्लोकांतही पहिलियांत विरंचिउक्ती. ॥ ३१९

भवसमुद्रहि हा लटिका तयां, कळलि शुद्ध चिदात्मकता जयां; ।
तरलियाचपरी अनृतांबुधी तरति ते न तरोनि म्हणे विधी. ॥ ३२०

असें पूर्वपद्यांत जें बोलियेला, तथा बाध येऊनियां प्राप्त झाला. ।
मृषा बंध तेव्हां मृषा मोक्षही तो, मृषा मानितां नित्यता भंग होतो. ॥ ३२१
असत्यत्व बंधास तैसेंचि मोक्षा; असें स्थापुनी वारितो पूर्वपक्षा, ।
पुढें श्लोक बोलेल तेथेंचि ऐसें, पहा बोलतो भारतीकांत कैसें. ॥ ३२२

मोक्षस्वरूप तरि केवळ तत्व त्याला, मिथ्या म्हणाल तरि मोक्ष अनित्य बोला; ।
शंका असी, परि तिचा परिहार आतां, श्लोकांत या करिल कैंवि पहा विधाता. ३२३
मायाच बंध तरि नाशक मोक्ष त्याचा, मायाच जो म्हणति तो म्हणवे न साचा. ।
सत्य स्वयें सहज तें उभय प्रकाशी सर्पप्रकाशकर रज्जु न सर्प नाशी. ॥ ३२४

बिंबरूपिणि जसीच अविद्या मोक्षरूपिणिहि येरिति विद्या, ।
बंधकारक अनित्य उपाधी, मोक्ष नित्य जगदीशसमाधी. ॥ ३२५
नित्यमुक्त जगदीश उपाधी, मोक्षजीवहि तयास्तव साधी, ।
तो असत्य परि नित्य अनादी, येरिती विशद बोलति वेदीं. ॥ ३२६
बंध मोक्ष उभय प्रतिबिंबीं, तें असत्य दिसतें निजबिंबीं, ।
त्यांत बंधचि अनित्य अविद्या मोक्ष नित्य परमेश्वरविद्या. ॥ ३२७
मृषा बंधही मोक्षही हे तथापी फळप्राप्ति देहींचिही जीवरूपीं, ।
सुखें आणि दुःखें जसीं हीं असत्यें तथापि प्रतीतीस येती अगत्यें. ॥ ३२८
ही प्रतीति न चुके प्रतिबिंबीं, ऐक्य त्यासहि जया निजबिंबीं; ।
हें असत्यपण त्यांतचि साहे, तेंचि पद्मभव बोलत आहे. ॥ ३२९

१. आत्मज्ञानाचा मार्ग. २. स्पष्ट. ३. ब्रह्मदेव.

[1]जैया बंधही मुक्तिही त्याच अज्ञा, म्हणूनीच दोहींस [2]अज्ञानसंज्ञा; ।
जरी आत्मबोधाविणें बंध झाला, तया नाशतां मोक्ष तो बोलियेला. ॥३३०
मायाच बंध करणार जसी अविद्या, मायाच मोक्ष करणार अनादिविद्या; ।
हे बंधमोक्ष म्हणऊनि न वस्तु कांहीं, रज्जूंत सर्प म्हणणें परि सर्प नाहीं. ३३१
रज्जूंत सर्प नव्हताचि कधीं जयातें, रूपाविणें भुजगनामचि मात्र होतें. ।
मिथ्याच उद्भवहि नाशहि त्यास जैसा, मिथ्याच बंध तरि मोक्ष मृषाचि तैसा. ॥

बंध मोक्षहि तसेच म्हणूनी, नाममात्रचि म्हणे विधि दोनी. ।
नाममात्रचि न [3]वास्तव कांहीं बंधमोक्षपण आणिक नाहीं. ॥ ३३३
हें खरें परि [4]मृषापण यांचें, त्यास कीं समजलें निज साचें, ।
रज्जु जाणति असत्य तयांला [5]सर्पउद्भवविनाशहि झाला. ॥ ३३४

यालागिं बोले विधि ये स्थलीं कीं, जाणेल तो आत्मपणास जो कीं. ।
सत्यज्ञभावास्तव त्यासि पाहे, असत्यता या उभयांस साहे. ॥ ३३५

निजात्म सत्यत्व कळे जयाला, सत्यज्ञ संज्ञा म्हणती तयाला, ।
जो मुक्त होऊनि [6]जितो तथापी, देखे मृषा मोक्षहि त्या स्वरूपीं. ॥ ३३६
[7]ऋतज्ञभावास्तव बंधमोक्षा, मिथ्यात्व ऐसें [8]सरसीरुहाक्षा ! ।
म्हणूनि जो बोलियला विरंची [9]भावार्थटीका इतुकीच त्याची. ॥ ३३७

ऐसें वदोनिहि विरंचि सशंक झाला, कीं जो [10]ऋतज्ञ जन जीतचि मुक्ति त्याला.
तो मोक्ष मागुनि असत्य कसा म्हणावा? ऐसा तरी अनृतसत्यपणें न घ्यावा. ॥
ते बंधमोक्ष विधि तों प्रतिबिंबरूपीं देखे तदैक्यनिजबिंब सुखस्वरूपीं. ।
बिंबांत त्यांत तरि मोक्ष न बंध कांहीं, यालागिं [11]मोक्षेंअनृतत्व विरुद्ध नाहीं. ॥
आणीक एक सुचली विधिलाचि युक्ती, कीं बिंबएकपण तें प्रतिबिंबमुक्ती, ।
जो नित्यमुक्त जगदीश उपाधिबिंबीं, त्याणेंचि जीव निजबिंब सुखावलंबी. ॥

---

१. 'अज्ञानसंज्ञी भवबंधमोक्षी' इत्यादि २६ वा श्लोक पहा. या श्लोकाचें तात्पर्य:—संसाराचें बंधन आणि संसारापासून मुक्ति हीं नांवें अज्ञानामुळें उत्पन्न झालीं आहेत. जसा सूर्याच्या ठिकाणीं रात्र आणि दिवस हा भेद नाहीं तसा नित्यज्ञानात्मक एक व पूर्ण अशा आत्मस्वरूपाचा विचार केला असतां बंध व मोक्ष हे उभय सत्यज्ञानस्वरूपाहून वेगळे नाहींत. २. ह्या संज्ञा (नांवें) अज्ञानापासून झालेल्या आहेत. ३. खरें. ४. खोटेपणा. ५. सर्पाची उत्पत्ति आणि लय. ६. जिवंत असतो. ७. खरें जाणतो यास्तव. ८. कमलनेत्रा. (हे कृष्णा.) ९. येथपर्यंत वरील श्लोकाच्या भावार्थाची टीका झाली. १०. सत्यज्ञानस्वरूप जाणणारा. ११. मोक्षाचें खोटेपण.

तोही उपाधि लटिकाचि जरी अनादी मायीकमात्र वदती श्रुति हेंचि वेदीं, ।
मुक्तांसि बिंबपण त्याकरितांचि मुक्ती तेही असत्य तरि या न विरुद्ध उक्ती. ॥
यालागिं आतां विधि उत्तरार्धें श्लोकांत याही हरितो विरुद्धें. ।
कीं बिंब तूं त्यांतहि अंबुजाक्षा ! प्रतीति बंधा न तसीच मोक्षा. ॥ ३४२
ब्रह्मा म्हणे तव अखंडचिदात्मकत्वीं तूझ्या स्वकेवळपणांत अनंतकत्वीं, ।
हे बंधमोक्ष न कदापि विचाररीतीं, सूर्यांत जेंवि नसती दिन आणि राती.॥ ३४३
चैतन्य खंडित दिसे प्रतिबिंबरूपीं, त्याचें अखंडपण बिंबनिजस्वरूपीं, ।
जेथें प्रतीति न कदापिहि बंधमोक्षा, तेथेंचि हे नसति यास्तव अंबुजाक्षा ! ॥
जीवासि मायिकपणें जरि बंधमोक्षा, देती प्रतीति सहसा सरसीरुहाक्षा ! ।
बंधप्रतीति तरि बिंबपणांत नाहीं, मोक्षप्रतीति म्हणवूनि तुतें न कांहीं. ॥ ३४५
जो नित्यमुक्त तव बिंबपणीं उपाधी, ज्याला अखंडअगुणीं स्वसुखीं समाधी, ।
हा जीवबंध अवलोकुनि नित्य मुक्ती, त्यालागिं बोलति तथापि वृथाच उक्ती.॥
नसे रोग आरोग्य कैसें तयाला ? उगा नित्य आरोग्य हा बोल केला, ।
असें नित्यमुक्तत्व तूझें मुकुंदा ! श्रुती वर्णिती लक्षुनी जीववृंदा.॥ ३४७
बंध मोक्षहि न निर्गुण तत्वीं येरितीच नसती सगुणत्वीं, ।
निर्गुणत्व सगुणत्वहि बिंबीं, बंधमोक्ष घडती प्रतिबिंबीं. ॥ ३४८
हे बंधमोक्ष लटिकेचि तथापि होती, जीवास ज्यास्तव अवश्य घडे प्रतीती. ।
बिंबींच हे नसति यास्तव अंबुजाक्षा ! तूं बिंबहेतु सकळांसहि बंधमोक्षा.॥ ३४९
सूर्यामधें दिवस आणिक रात्र नाहीं त्यावीण मागुति नव्हे दिनराति कांहीं. ।
बुद्धीस बिंब नकळोनिच बद्ध झाला, बुद्धीस बिंब कळलें तरि मोक्ष आला. ॥
सूर्यास आणि जगदृष्टिस आड जेव्हां, होईल अस्तगिरि रात्रि जनासि तेव्हां, ।
तो लोकदृष्टि उदयाद्रिवरी प्रकाशी, तेव्हां जनास गमतो दिन सर्वदेशीं.॥ ३५१
करी असा जो दिन रात्रि नेत्रीं, नित्यामधें तो दिन आणि रात्री, ।
जीवासि अस्ताचळ हे अविद्या ब्रह्मार्कबोधीं उदयाद्रि विद्या. ॥ ३५२
ब्रह्मा म्हणे, 'हरि असी न विचारदृष्टी, ज्यांलागिं ते मृगजळार्थ तृषार्त कष्टी. ।
यालागिं तूं गुरुदिवाकर दृष्टि ज्यांला, देशी मृषाजळधि कां बुडवील त्यांला ? ॥

---

१. भ्रमानें उत्पन्न झालेलें. २. हे कमलेक्षणा. (कृष्णा.) ३. प्रलय, अनुभव. ४. मूळांतील २६ व्या श्लोकाचा शेवटचा चरण पहा. ५. नष्ट झालेलें. ६. कमलाक्षा. ७. प्राण्यांच्या समुदायाला. ८. त्या सूर्याशिवाय. ९. अस्ताचलामुळें जगास जशी रात्र होते तसें अविद्येच्या योगें जीवास अज्ञान होतें, परंतु परमात्म्याचें खरें ज्ञान प्राप्त झालें म्हणजे उदित सूर्याप्रमाणें त्या अज्ञानाचा नाश होतो. १०. गुरुरूप सूर्य.

मृषा जसा बंध तसीच मुक्ती, हे सिद्ध केली विधिनें स्वयुक्ती, ।
कीं सूर्यबिंबीं दिनराति नाहीं, बिंबीं तसा बंध न मोक्ष कांहीं. ॥ ३५४
बिंबीं मिळे हें प्रतिबिंब जेव्हां, तेथें तया बंध न मोक्ष तेव्हां. ।
जो बंध हा मोक्षहि तो अलीकडे, तें बंधमोक्षाहुनिही पलीकडे. ॥ ३५५
बिंबामधें बंध असेच जेव्हां बिंबामधें मुक्तिहि नित्य तेव्हां. ।
उपाधि जो कां परमेश्वराचा तो नित्य हें बोलति वेदवाचा[1]. ॥ ३५६
बंध मोक्ष लटिके जरि तेथें, पूर्वपक्ष उठला तरि येथें. ।
श्लोक चारिवरि तो कथिजेतो पूर्वपक्ष मग खंडित होतो. ॥ ३५७
बुद्धि जेच पहिली प्रतिबिंबीं, तीकरूनिच तदैक्यहि बिंबीं. ।
जीत मुक्तजन देखति जेव्हां, बंध मोक्ष तिस ठाउक तेव्हां. ॥ ३५८
प्रतीति[2] बिंबांतहि त्याप्रकारें, बंधास मोक्षासहि या बिचारें. ।
जे बुद्धिनें तीसहि नाश आहे, प्रारब्ध याचें सरतां न राहे. ॥ ३५९
जरी ईश्वरोपाधिनें मुक्ति याला, तरी बुद्धि याची असे तेथ बोला. ।
जितां[3] मुक्ति ते बुद्धियोगेंचि जेव्हां, अनित्यत्व मुक्तीस आलेंचि तेव्हां. ३६०
या पूर्वपक्षाख्य तमासही तो, श्रीसूर्यदृष्टांतचि येथ येतो, ।
बुद्धीस जेथें उभयप्रतीती स्फुरोनि दोनी न विचाररीती. ॥ ३६१
बंधदुःख मति जाणत होती, मुक्ति तीकरुनि[4] मुक्त पहाती. ।
हें घडेच परि मोक्ष जयाला तो स्वबिंबसुख त्यांत मिळाला. ॥ ३६२
बंधमोक्ष करिजे प्रतिबिंबीं, बुद्धि तेच उरली मग बिंबीं . ।
बंध मोक्ष तिस दोनि न तेथें, दीसती अगुण केवळ जेथें. ॥ ३६३
जाणें जरी ते मति बंधमोक्षा बिंबांत तो तीस नयेच लक्षा. ।
जो कां दिवारात्रिस जाणताहे, तोही न सूर्यांत तयांस पाहे. ॥ ३६४
अरुण[5] कश्यपनंदन सारथी, सतत जो बसला रविच्या रथीं, ।
दिवसरात्रिस जाणतसे जरीं, न रविमंडळिं देखतसे तरीं. ॥ ३६५
बंधमोक्ष दिसती प्रतिबिंबीं[6], त्यास ऐक्य घडल्यावरि बिंबीं[7], ।
मुक्त दोनिहि न देखति तेथें जीतमुक्त जरि वर्तति येथें. ॥ ३६६

---

१. वेदाची वाणी. २. अनुभव, प्रत्यय. ३. जिवंत असतां. ४. मतीकरून. ५. कश्यपाचा पुत्र आणि सूर्याचा सारथी जो अरुण तो नित्य सूर्याजवळ असतो, व दिवसरात्र होतात हें त्यास विदित आहे, तथापि त्यास दिवसरात्र कधींही दिसत नाहींत. त्याप्रमाणेंच प्रतिबिंबीं बंधमोक्ष होतात हें मतीला ठाउक आहे तरी ती त्या बंधमोक्षांस पहात नाहीं. ६. जीवाचे ठायीं. ७. परमात्म्याचे ठायीं.

कर्मभोग सरल्यावरि बुद्धी नाशल्या वरिल ईश उपाधी, ।
मुक्ति देउनिहि जो प्रतिबिंबा वर्ततोचि [1]अवलंबुनि बिंबा. ॥ ३६७
तो [2]लैयीं मिळतसे जरि बिंबीं सृष्टिकारण पुन्हा अवलंबी, ।
तो असत्य परि बिंब म्हणावा मोक्षनित्यपण येरिति [3]भावा. ॥ ३६८
बंधमोक्ष म्हणवूनि न बिंबीं ते कधीं न चुकती प्रतिबिंबीं, ।
पक्ष [4]संमत न हाच जयाला बंधमोक्ष म्हणवे न तयाला. ॥ ३६९
बद्धता न म्हणती प्रतिबिंबा बंधमोक्ष घडती मग बिंबा, ।
मुक्ति ज्यास भवबंधहि त्याला ब्रह्म बद्ध कवणेपरि बोला. ॥ ३७०
जडास तों मोक्ष कधीं घडेना बंधामधें ब्रह्महि सांपडेना, ।
याकारणें हें प्रतिबिंब घ्यावें तें बद्ध तें मुक्त असें म्हणावें. ॥ ३७१
बंधकारण जसीच अविद्या मोक्षकारण तसी [5]निजविद्या, ।
कारणें अनृत दोनिहि जेव्हां बंध मोक्षहि असत्यचि तेव्हां. ॥ ३७२
विद्या अविद्या जरि बिंबरूपीं, हा बंधही मोक्षहि त्या स्वरूपीं, ।
ज्ञानें जरी बंध गळोनि गेला, आत्मा असे मोक्ष जयासि झाला. ॥ ३७३
गेली जरि ग्रंथि सुटोनि दोरी, जो सूटला तो [6]नैव जाय दूरीं, ।
जों मुक्त तों मुक्ति असेचि त्याची, हें बोलतां मुक्ति तयासि साची.॥३७४
म्हणाल कीं ईश उपाधि आहे तो मुक्तिच्या मुक्तपणा न साहे, ।
युक्तीस मिथ्यात्वहि या प्रकारें, म्हणाल हेंही जरि या विचारें. ॥ ३७५
स्वरूपीं जया बोलतां हा उपाधी, स्वरूपीं तया मानितां बंध आधीं, ।
अहो चित्स्वरूपांत एकांत ऐसें, वदा बंधही मोक्षही नित्य कैसे? ॥ ३७६
हा नित्यमुक्त रविरूप उपाधि जेथें, अज्ञानबंध तम अंधहि केंवि तेथें? ।
होता असें प्रथम साधुनि मुक्ति त्याला, या नित्यईश्वरउपाधिकरूनि बोला. ॥
आतां [7]अवस्थात्रय एकजीवा बद्धत्व मुक्तत्व असेंचि भावा, ।
म्हणाल ऐसें जरि झोंप जेव्हां प्रबोध नाहींच तसाच तेव्हां. ॥ ३७८
जडा अवस्था परि त्या जयाला, जडत्व हें तों वदवे न त्याला. ।
तिन्ही अवस्था जरि त्याचलागीं एके अवस्थेंत दुजी न भोगी. ॥ ३७९
हा नित्यमुक्त सदुपाधि जया स्वरूपीं, तेथेंचि एकसमयीं भवबंधरूपी. ।
होतो उपाधि म्हणतांचि विरुद्ध येतें, यालागि बद्ध म्हणतां प्रतिबिंब होतें. ३८०

---

१. आश्रयून, आश्रय धरून. २. नाशाच्या समयीं. ३. माना, समजा. ४. मान्य. ५. आ-त्मज्ञान. ६. न जाई. ७. जागृति, सुषुप्ति आणि स्वप्न.

हेंही असो प्रस्तुत एक येथें, कीं सूर्यदृष्टांत असेल जेथें, ।
तेथें न घेतां प्रतिबिंबपक्षा श्लोकार्थ सिद्धांत न येचि लक्षा. ॥ ३८१
दिवस रात्रि असोनिहि भूतळीं, दिसति तीं न जसीं रविमंडळीं, ।
घडति बंधहि मोक्षचि जे जिवा दिसति ते तुजमाजि न माधवा. ॥ ३८२
बंधमोक्ष दिसती प्रतिबिंबीं, तेचि दीसति कदापि न बिंबीं. ।
अर्थ अन्यरिति येथ घडेना संतहृत्पदकिं रत्न जडेना. ॥ ३८३
जे विकल्प धरिती प्रतिबिंबीं, त्यांस भोक्तृपण येइल बिंबीं, ।
दुःख आणि सुख तों न जडाला, कोण भोगित असे तरि बोला? ॥ ३८४
मिथ्या म्हणाल तरि रज्जुंत सर्प नाहीं, द्रष्टा खरा म्हणुनियां भयकंप देहीं; ।
शुक्तींतही रजतलाभ सुखास मानी, मिथ्या प्रपंचपरि भोग घडे निदानीं. ३८५
श्लोकांत या तरि अहो प्रतिबिंब नाहीं, शंका अशी जरि धराल मनांत कांहीं, ।
श्लोकांत याच म्हणतो विधि अंबुजाक्षा! तूझ्या अखंडितपणीं अनृतत्व मोक्षा. ॥
नसे खंड तूझ्या चिदात्मस्वरूपीं, नसे बंधही मोक्षही त्याच रूपीं, ।
विधाता असें बोलिला स्पष्ट जेव्हां नसे ठाव त्या बंधमोक्षासि तेव्हां. ३८७
चैतन्य खंडित न हें प्रतिबिंब ध्यावें, बद्धत्व मुक्तपणही कवणा म्हणावें? ।
याची प्रतीति नसतां तुजमाजि नाहीं, हें बोलणें उचित तों न दिसेच कांहीं. ॥
नसे तूजला त्रास वंध्यासुताचा, असें बोलतां ये रिती व्यर्थ वाचा, ।
म्हणूनीच जें खंड चैतन्यरूपीं, म्हणे तें न तूझ्या अखंडस्वरूपीं. ॥ ३८९
या कारणें निगमही प्रतिबिंब बोले, दुःखें सुखें जडउपाधिजळांत डोले, ।
हे बंध मोक्ष हरि त्यास असे तथापी, त्यालाचि दोनिहि तुझ्या न निजस्वरूपीं. ३९०
श्रुत्यर्थ कीं ज्योतिशरीर जैसा, हा सूर्य नाना उदकांत तैसा, ।
क्षेत्रीं अनेकीं जगदात्मदेव स्वयें असा एक, अनेक जीव. ॥ ३९१
एवं प्रतीतिकर सर्प असत्य जेव्हां, त्याचा अभाव वदवेल भल्यांस तेव्हां, ।
वंध्यासुतादिक अभाव कसा म्हणावा या कारणें निगमसंमत पक्ष घ्यावा. ॥ ३९२
मिथ्यात्व ऐसें भवबंधमोक्षा म्हणुनि बोले विधि अंबुजाक्षा, ।
सर्वज्ञतेनें हरि वामनात्मा तदर्थ बोले निजबोधवर्त्मा. ॥ ३९३

१. लक्षांत, ध्यानांत. २. मूळांतील श्लोक २६ वा पहा. ३. पाहणारा. ४. रुप्याची प्राप्ति. ५. अंतीं. ६. निरर्थक उक्ति. ७. वेद. ८. येथें ज्या श्रुतिवचनाचा उल्लेख केला आहे तें:—'यथा ह्ययंज्योतिरात्मा विवस्वान् आपो भिन्ना बहुधैको नु गच्छन् । उपाधिना क्रियते भेदरूपो देवः क्षेत्रे एवमजोऽयमात्मा ॥' याचा अर्थ वर आला आहेच. ९. तेजाचा आत्मा. १०. शरीरांत; प्रतिशरीरीं. ११. अनुभवास येणारा, प्रत्यय दाखविणारा. १२. वेदास मान्य असा. १३. आत्मज्ञानाच्या मार्गी.

न तरतां तरले अनृतांबुधी म्हणुनि जें वदला पहिलें विधी, ।
अनृत बंधही मोक्षहि ये रिती म्हणुनि तो वदला स्वगुरूप्रती. ॥ ३९४
जें वेदगर्भ वदला स्फुट हेंचि वेदीं, हे तों न मानिति कदापिहि भेदवादी, ।
धिक्कारितो कमळसंभव त्यांस आतां, त्याचें कधीं न मत संमत होय संतां. ३९५
आत्माचि तूं, तुजहि मानुनि भिन्न देवा! भिन्नास आत्मपण मानुनि वासुदेवा! ।
बाहेरि धुंडिति असी जैनअज्ञता हे, आश्चर्य हें विधि म्हणे हरिलागिं पाहें. ॥
श्लोकार्थ हा तों इतुकाचि येथें, भावार्थ आहे अतिदिव्य जेथें, ।
आत्मा गमे भिन्न कसा विकारें भिन्नास आत्मत्व कशाप्रकारें. ॥ ३९७
हरी तोचि हे अर्थ भावार्थ आतां स्वयें वर्णितो जेथ आनंद संतां. ।
निजात्मा न तो भिन्न वाटे कदापी, प्रतीतीस भिन्नत्व येना स्वरूपीं. ३९८
मूढां जरीं कवण आपण हें कळेना, भिन्नत्व आत्मगत त्यांसहि सांपडेना. ।
आत्माच तूं तुजहि मानिति भिन्न ऐसें, हें वाक्य ये अनुभवाप्रति येथ कैसें ?॥
आत्माच तंतु पट त्यांत शरीर झालें, भिन्नत्व आत्मगत ये रितिनेंच आलें, ।
आत्माच तो इतर येरिति मानियेला, जे ज्ञानहीन तिहिं हें विधि बोलियेला.॥
विधाता म्हणे तूंचि देहादिरूपीं पटीं तंतु जैसा जडीं चित्स्वरूपीं, ।
दिसेना असेना विना तंतु जैसा, पटाकार आत्म्याविणें देह तैसा. ॥ ४०१
तंतूस त्या विसरतां पट सत्य ज्यांला, आत्मा न जाणति खरा जड देह त्यांला, ।
नाहींच जो पट तयासि खरें म्हणावें, सत्यास तंतुस पटाकृतिनें पहावें. ॥४०२
तंतूमधें पट दिसे, परि तो पैरावा दावी नसोनि नयनीं पटरूपभावा, ।
तंतूचि तो पट तरी लटिक्या विकारें, भासे तयास इतरत्वहि या विचारें. ४०३
आत्माचि तूं हरि! तथापि शरीरभावें, अज्ञा जनासि दिससी जड तें पैरावें, ।
जे आत्मयास इतरत्वजडत्वरीती, मानूनि वर्तति वृथा क्षितिभार होती. ॥ ४०४

---

१. 'त्वामात्मानं परं मत्वा' इत्यादि २७ वा श्लोक पहा. याचा भावार्थ:—अहो! अज्ञ लोकांचें अज्ञान किती विलक्षण आहे पहा, प्रथम सर्वांचा आत्मा जो तूं त्या तुजवर परदेहाचा अध्यास करून, परदेहावर आत्मा अशी बुद्धि धरून, नंतर आत्म्याला बाहेर शोधावयाचें! आत्मा अंतर्यामी आहे, तेव्हां त्याचा शोध बाहेर करणें नलगे. या आत्म्याचें ज्ञान झालें म्हणून अज्ञानोत्पन्न संसारबंधन तुटतें. २. शोध करतात. ३. लोकांचें वेडेपण. ४. अज्ञ लोक तंतु व वस्त्र जसें भिन्न समजतात तसेंच आत्मा व त्यापासून उत्पन्न झालेलें शरीर ते अज्ञ जन भिन्न समजतात; आत्म्यांत आणि शरीरांत भिन्नपणा मानतात. ५. अज्ञ लोक. ६. परकी. ७. परकीय, अन्य असें. ८. पृथ्वीला भार.

या एक अज्ञजनअज्ञपणासि धाता, सांगे असें नवल मानुनियां अनंता ! ।
त्याची असी रचियली हरिनेंच टीका श्रोत्यांस येरिति इथें उपजेल शंका. ४०५

कीं हा चिदात्मा तरि तंतुरूपीं, शरीर मिथ्या पटवत् तथापी, ।
तंतूस तों तंतु दुजा न वाटे मेल्या शरीरास न जीव भेटे. ॥ ४०६
आत्मा जयीं टाकुनि देह जातो, तंतूच गेल्या पट कां रहातो ? ।
ह्या पूर्वपक्षा परिहार तेव्हां कळेल बिंबप्रतिबिंब जेव्हां. ॥ ४०७
विचार हा तों बहुवार येथें झाला असे हा परिहार तेथें, ।
टाकूनि जाणें प्रतिबिंब जीवा, जडामधें वास्तव वासुदेवा ! ॥ ४०८
ज्या चित्प्रकाशें मृतदेह दृष्टी दिसेल तो रज्जु भुजंग सृष्टी, ।
हें तथ्य कीं वस्त्र दिसे तथापी, न भिन्नता तंतुस तंतुरूपीं. ॥ ४०९
पटासि टाकूनि न तंतु जातो, हा अर्थ बिंबांतचि सिद्ध होतो, ।
टाकूनि जातो प्रतिबिंबरूपीं बिंबीं न भिन्नत्व तया तथापी. ॥ ४१०

बिंबात्मया सगुण निर्गुण दोनि रूपें, मायेकरूनि जगदाकृति चित्स्वरूपें, ।
जीवांस त्यांतचि दिसे जरि विश्व नाना, बिंबीं प्रतीति दुसरी अणुही दिसेना. ४११
देहादि भेद गमती प्रतिबिंबरूपीं अज्ञान त्यास निजबिंबसुखस्वरूपीं ।
बिंबीं घडे तरि सुषुप्तिस ऐक्य त्याला, तो भिन्न केंवि म्हणवेल चिदंश बोला ?॥
तद्रूप होउनि सुषुप्तिसुखावलंबीं, भिन्नत्व सांप्रतहि न प्रतिबिंबबिंबीं ।
देहादिरूप निज बिंबचि भासताहे, आत्मज्ञतेविण असे रितिनें न पाहे.॥४१३
या कारणें नवल मानुनियां विरंची माया असी म्हणुनि वर्णितसे हरीची, ।
वेदांतशास्त्रहि पढोनि असाच वेदीं तत्वार्थ मानिति तयास न भेदवादी. ॥ ४१४
जे कां न जाणति कधीं निगमागमातें, तेथें न धिक्करण केवळ त्यांस होतें. ।
आश्चर्य वस्तु न दिसे जरि डोळसाला अंधा दिसे न तरि विस्मय काय बोला ?॥
लोकांत यांतचि वदेल असें विरंची, कीं बाह्य धुंडिति गती तुज आत्मयाची;।
बाहेर धुंडिति जरीं परमात्मयाला शास्त्रज्ञ ते नव्हति केंवि म्हणाल बोला ? ४१६

१. मूढ लोकांच्या अज्ञानाला. २. वस्त्राप्रमाणें शरीर जरी असल. ३. जीवांत. ४. परमात्म्यांत. ५. शुद्ध आत्मा, शुद्ध चैतन्य. ६. सर्व चराचर ईश्वररूपी आहे असें जें वेदप्रतिपादन त्याविरुद्ध प्रतिपादन करणारा, सर्व पदार्थ ईश्वररूपी नाहींत असें प्रतिपादन करणारा, द्वैतवादी. ७. निगम=वेद, आगम=शास्त्र. शास्त्रें आणि वेद यांस जे जाणत नाहींत, त्यांस जर वस्तूचें ज्ञान झालें नाहीं तर त्यांचा धिक्कार होत नाहीं, कारण ते अज्ञच होत, पण जे वेदागमज्ञ आहेत त्यांस वस्तु दिसली नाहीं तर आश्चर्य होय. ८. ज्यास डोळे आहेत त्याला. ९. आपल्या ठिकाणीं आत्मा आहे हें न जाणून त्या आत्म्यास जे बाहेर शोधतात त्यांस.

आतां म्हणाल भजती प्रतिमादिरूपीं बाहेरि धुंडिति हरीस असें तथापी, ।
ते शास्त्र नेणति तयांस असें विधाता बोले म्हणाल तरि तद्गुरु शास्त्रवेत्ता.४१७
द्वैतेंचें जो भजन शिष्यगणास सांगे शिष्यांस भेद भजन प्रतिमेंत लागे, ।
शिष्यांस शास्त्र न कळे कितिएक तेही तैसेचि वर्तति तैदन्य विचार नाहीं.४१८
अद्वैत वेद पथ केवळ तो निषेधी शिष्यांसि भेदचि खरा म्हणऊनि बोधी, ।
त्याला जडाजडविवेकमुखें चिदात्मा विश्वप्रकाश न कळे श्रुतिसिद्धवर्त्मा.॥४१९

अद्वैतभावें प्रतिमादिकांहीं जे पूजिती त्यांस पशुत्व नाहीं. ।
दाटूनि जो दैवत अन्य पाहे, पशुत्व त्याला श्रुति बोलताहे. ॥　　४२०

श्रुत्यर्थ या पहिलिया चरणांत येथें, झाला असे स्फुट विचार समग्र तेथें. ।
सिद्धांतभेद अवलंबुनि भेदवादी कोणेरिती तरि भजो पशु तोचि वेदीं.॥४२१

प्रवर्तवी दुर्मत बोल त्याला, धिक्कार हा त्यासचि बोलियेला; ।
हें धुंडणें बाह्यहि जें स्वभावें या श्लोकटीकेंत पुढें पहावें. ॥　　४२२

येथें वदे विधि अभिज्ञहि शास्त्रवेदीं जे दुर्मतें रचिति केवळ भेदवादी; ।
ते यास रज्जुशरिरींच भुजंग देवा! जे मानिती नवल हें बहु वासुदेवा!४२३
आणीक अज्ञजनअज्ञपणास घाता वर्णूनियां नवल सांगतसे अनंता. ।
कीं आत्मयास तुज मानुनि अन्यभावें जें अन्य तें मिरविती स्वचिदात्मनावें. ॥
कीं बिंब एक दुसरें प्रतिबिंब देवा! हे आत्मता द्विविधमात्रचि वासुदेवा! ।
बिंबात्मता जसि शरीरपणें पहाती जीवात्मता असिच मानुनि अन्यरीती.॥४२६
कीं अन्यता धरुनि त्यासचि वासुदेवा! आत्माचि केवळचि हा म्हणताति देवा! ।
तो अन्य तो कवण आणिक तोचि कैसा? आत्मा म्हणूनि म्हणताति विचार ऐसा.॥
देहात्मता सकळ मानुनि हें प्रसिद्ध ब्रह्मा म्हणे जरि असें तरि हें विरुद्ध, ।
देहात्मता तरि न मानिति भेदवादी देहाभिमान दृढ यद्यपिही अनादी.॥४२७

---

१. जे मूर्तीची पूजा करतात ते हरीस (परमात्म्याला) बाहेर शोधतात असा पूर्वपक्ष केला तर त्यावर उत्तर असें कीं जे अद्वैतभावानें मूर्तीची पूजा करतात ते ज्ञानी होत व जे द्वैतभावानें मूर्तिपूजा करतात ते शास्त्रानभिज्ञ अज्ञ होत. २. द्वैतभावानें, परमात्मा आणि जीवात्मा हे भिन्न होत अशा भावानें. ३. त्याहून भिन्न, तदितर. ४. शुद्ध चैतन्य. ५. वेदांनीं प्रतिपादित असा मार्ग. ६. मूर्ति इत्यादि. ७. जडता, अज्ञान. ८. जाणता. ९. 'ते आत्म रज्जुस शरीर भुजंग देवा' असाही पाठ आहे. १०. देह हाच आत्मा असें मानणारा एक प्रख्यात पंडित. चार्वाक हा नास्तिकपक्षाचा मंडनकर्ता होय. यास नास्तिकशिरोमणि असें प्रख्यात 'सर्वदर्शनसंग्रह' नामक ग्रंथात म्हटलें आहे. त्याच्या मताप्रमाणें आत्मा नाहीं, परलोक नाहीं, असें आहे.

चार्वाक आणि जन केवळ मूढ त्यांची निंदा म्हणाल करितो जरिही विरिंची,।
हे आंत बाह्यहि न धुंडिति आत्मयाला बाहेर धुंडिति तुतें म्हणवे न त्यांला. ॥
बाहेर धुंडिति तुतें परमात्मयासी देहात्मता वदति तन्मतकार कैसी? ।
आत्मा परास म्हणती कवण्या प्रकारीं हें गुह्य वामनमुखें वदतो मुरारी.॥४२९
नानामतीं वदति भेदचि भेदवादी, अद्वैत दूषुनिहि जे परनिष्ठ भेदीं. ।
जीवात्मता वदति सर्व अहंप्रतीती तें अन्य मीपण तदात्मक मूढ होती. ॥४३०
देहेंद्रियादिगुण टाकुनि वेगळेंही, जें मीपणस्फुरण वाटतसे स्वदेहीं, ।
आत्मा तया म्हणति नेणति तत्त्वरीती कीं मीपणें त्रिविध हें त्रिगुणेंचि होती.॥
मी देह तामस अहंपण हें शरीरीं, मी इंद्रियें म्हणुनि हेंचि रजोविकारीं, ।
या दोंविणें स्फुरण सात्विकमीपणाचें आत्मत्व केवळ तयास घडेल कैंचें? ४३२
त्याहीपुढें बुद्धि, तियेपुढेंही, जें चित्त आत्मत्व तयास नाहीं, ।
या मीपणा तेथहि ठाव कैंचा? जें वर्णितां लाजति वेदवाचा. ॥ ४३३
जीवत्वही गुरुकृपेविण हें कळेना या मीपणें तरि कदापिहि आकळेना, ।
वार्ता सुषुप्तिसमयीं न असे जयाची शुद्धात्मतेंत गणना करिती तयाची. ॥४३४
अद्वैत मानुनिहि मानिति हाचि आत्मा कोणी तयांसहि न ठाउक तत्ववर्त्मा; ।
याचा विचार बरवेरिति 'कर्मतत्त्वीं' तो पाहणें विशद वाचुनि शुद्धसत्त्वीं.४३५
अहंप्रत्यया मानिती शुद्ध आत्मा सुषुप्तींत ज्याचा नसे लेश वर्त्मा, ।
अनात्मा परावा अहंकार त्यासी अहो! आत्मता मानिती अज्ञ कैसी? ॥ ४३६
बिंबात्मयातें तुज देहरूपें अहंपणालागिं निजस्वरूपें, ।
अहो! हरी! मानिति अज्ञ कैसे? म्हणूनि बोले विधि येथ ऐसें. ॥ ४३७
बिंबात्मता हरि तुझी प्रतिबिंबताही, जे नेणती पढतमूढ जनांत तेही. ।
आत्मा कसा म्हणुनि मागुति तेचि देवा! बाहेर धुंडिति म्हणे तुज वासुदेवा! ॥
मायामयें हरि! तुझीं बहु चित्र रूपें, मत्स्यादिकें म्हणति हेंचि निजस्वरूपें. ।
प्रत्यक्ष जें दिसत गोचर इंद्रियांसी, तें वाटतें तव अतींद्रिय तत्त्व त्यांसी. ॥४३९
दिसे बाह्य दृष्टीस तें तत्त्व कैसें? असे धुंडणें नेणणें बाह्य ऐसें, ।
जरी अंतरीं बोलती ध्यानरीती तरी तत्त्व साकार ऐसें पहाती. ॥ ४४०
रचियलें मत शास्त्र असे रिती, पढलि तत्वहि तेंचि विचारिती, ।
हुडकिती हरि! बाह्यहि तूजला, धरुनि भाव असा विधि बोलिला.॥४४१

१. तें मत (देहात्मवाद) प्रतिपादन करणारे नास्तिक. २. वेदवाणी. ३. समजेना, गवसेना. ४. तत्वमार्ग. ५. 'कर्मतत्व' नामक प्रकरणांत. ६. स्पष्ट. ७. मी आहे या अनुभवाला. ८. मार्ग. ९. परकी. १०. इंद्रियांस अगम्य असें, जें इंद्रियांस अगोचर तें.

अहो! बाह्यही धुंडिती आत्मयाला म्हणूनी असें जें विधी बोलियेला, ।
न तीर्थादि मूर्त्यादि पूजादि भावें, कसा तो असा शास्त्रदृष्टीं पहावें.॥४४२
हा आत्मशब्द कथिला जगदीशभावें, द्वैतेंचि धुंडिति असेंचि जरी म्हणावें, ।
तोही कसा म्हणुनि धुंडिति शास्त्ररीती तीर्थादिकें सुकृत[1]कारक मात्र होती. ॥
तीर्थैंव्रतेंकरुनि होइल चित्तशुद्धी शास्त्रेंकरूनि तदनंतर सत्वसिद्धी, ।
सत्संप्रदाय तरि हा जरि भेदवादी तेही परात्मपण धुंडिति शास्त्रवेदीं. ॥ ४४४
असे तत्व तें कैंवि सर्वेश्वराचें? विचारीं असें धुंडणें नाम याचें, ।
घडेना कधीं धुंडणें अन्यरीती, तरी भेद मानूनि जिज्ञासु होती. ॥ ४४५
जिज्ञासे[2]विण धुंडणेंचि न घडे ते तत्वजिज्ञासुता,
ज्याला तो गुरु शास्त्र टाकुनि कसा धुंडी न हें तत्वता? ।
सच्छास्त्रें निज आत्मता हुडकिती दुःसंगतीनें वृथा,
जें दृग्गोचर रूप तत्व म्हणती येथें तयाची कथा. ॥ ४४६
बाहेर धुंडिति बहिर्मुखता तयांची, जे अज्ञरीति वदला अवघी विरिंची. ।
जे धुंडिती निगममार्ग धरूनि आतां ते रीति आणि विधि वर्णिल त्यांच संतां. ४४७
देहींच संत तुज धुंडिति हे! अनंता! जें अन्यथा त्यजिति त्या जडअंतवंता. ।
मिथ्या निषेधुनि भुजंग चिदात्मदोरी जे कां खरी तिसचि पाहति कीं मुरारी! ४४८
असा येथें झाला चरण दुसरा या त्रिचरणीं,
त्रिपादें जो मोजी धरणि हरि त्याचीच करणी. ।
दिसे मूळश्लोकीं बहुतचि खुंजा वामनपणें,
स्वयें टीकारूपें करुनि भरिलें विश्व निपुणें. ॥ ४४९
श्रीमद्भागवतीं विचित्रदशमस्कंधीं विरिंचिस्तुती,
तेथें हा चरण द्वितीय चरणद्वंद्वीं हरीच्या श्रुती, ।

---

१. पुण्यकारक. २. जाणण्याची इच्छा. ३. 'अंतर्भवेऽनंत भवंतमेव' इत्यादि २८ वा श्लोक पहा. या श्लोकाचा भावार्थः—हे अनंता! विचारशील सत्पुरुष ह्या उत्पत्तिशील जडशरीरांमध्यें, अंतर्यामिरूपानें वास करणाऱ्या तुझा शोध करतात. रज्जूवर भासणारा सर्प जरी मिथ्या आहे तरी त्या भ्रमाचें निराकरण केल्याशिवाय कितीही चतुर पुरुष असला तरी त्याला खऱ्या रज्जूचें ज्ञान होईल काय? ४. या शरीरांत जो जड अंश आहे तो सत्य नव्हे म्हणून त्याचा त्याग करून. ५. अध्याय. ६. तीन पावलांनीं तीन लोक मोजणारा जो वामनरूपधारी हरि त्यानेंच हा टीकाभाग समाप्त केला असें कवि सुचवितो. ७. मूळभागवतांत हा चरण जरी लहान आहे, तरी टीकेचा विस्तार वामनपदाप्रमाणें मोठा आहे—असा भाव.

रत्नें मस्तकिंचीं चतुर्मुखमुखें अर्पूनि भूमंडळीं,
श्रोत्यांच्या श्रुतिभूषणीं मिरवती निर्माल्य तीं कुंडलीं. ॥ ४९०
ब्रह्मीं द्वैतविचार जो उपनिषद्भागीं श्रुती बोलती,
तीं वाक्यें श्रुतिचीं शिरें मणिगणीं श्रुत्यर्थ जे साधिती. ।
तें कृष्णासि निवेदिलें, विधिमुखें वेदीं धरामंडळीं,
श्रोत्यांच्या श्रुतिभूषणें मिरवती रत्नें जसीं कुंडलीं. ॥ ४९१
पृथ्वी आक्रमिली पदें करुनियां, एक्या स्वभावें क्षिती,
त्याचें केवळ पादपद्म म्हणती पायें दुज्या श्रीपती ।
गंगा आणुनि जेंवि उद्धरि जना ब्रह्मांडही भेदुनी,
तैसी या चरणीं दुज्या मिरवती हे ज्ञानमंदाकिनी. ॥ ४९२

चरण तिसरा.

(श्लोक.)

प्रथम चरण येथें वर्णिला भक्तियोगें,
तदुपरि दुसरा जो ज्ञानकांडप्रसंगें, ।
पुनरपि चरणीं या भक्ति गोविंदजीची,
कथिन सरि न पावे मुक्ति कैवल्य जीची. ॥ १
नित्यानित्यविचारसार करितां वैराग्य चित्तीं धरी,
तो जिज्ञासु मुमुक्षु विष्णुचरणीं सप्रेम सेवा करी ।
ज्ञानें अद्वय भक्ति त्यास कळतां ती गोड मुक्तीहुनीं,
जीवन्मुक्त मुकुंदभक्ति करितो सर्वात्मभावें मनीं. ॥ २
स्कंध जो प्रथम भागवतीं या श्लोक तेथिल असाच पहाया, ।
मुक्तही करिति माधवजीची भक्ति मुक्ति न करी सरि जीची. ॥ ३
जो सर्वत्र जगत्प्रकाशक जगीं तंतूच जैसा पटीं,
कीं कालत्रयिं आंत बाहिर दिसे मातीच नानाघटीं ।
आत्मा येरिति पाहती रमति जे त्यामाजि ऐसी स्थिती,
आत्माराम म्हणूनि संस्कृतपदें ऐशांसि वाखाणिती. ॥ ४

---

१. कर्णभूषणांत. २. ज्ञानरूप भागीरथी. ३. पहिल्या चरणांत भक्तियोग, दुसऱ्या चरणांत ज्ञानकांड आणि तिसऱ्यांत पुन: भक्तियोग, असें वर्णन वामनानें या काव्यांत केलें आहे. ४. तुलना, बरोबरी. ५. आत्मलाभानेंच आनंद पावून इतर सुखाविषयीं जो निरिच्छ तो.

आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचे अविद्यामय,
ग्रंथी सर्वहि सूटले जितचि जे ब्रह्म स्वयें अद्वय. ।
भक्ति श्रीपतिची उगीच करिती, तेही निमित्ताविण,
कीं मुक्तीहुनि गोड केवळ असे श्रीमाधवाचे गुण. ॥ ५
येरिती सगुण सुंदर भक्ती मुक्तही करिति साधुनि मुक्ती, ।
आदि अंतिं हरिभक्तिच संतां, हेंचि वर्णित असे विधि आतां. ॥ ६
ज्ञानहेतु हरिभक्तिच आधीं, ज्ञानियांसि तरि तेचि समाधी. ।
ज्ञानसिद्ध सकळात्मक भक्ती प्रीति आत्मगत अन्यविरक्ती. ॥ ७
असा भाव दाऊनि आद्यंतभागीं वदे भक्तियोगा विधी आदियोगी ।
मधें ज्ञानकांडें स्तुति श्रीहरीची, करूनी पुन्हा भक्ति वर्णी विरिंची. ॥ ८
असंतीं कसा धुंडिला आणि संतीं, चिदात्मा असा ज्ञानकांडीं तदंतीं, ।
विधी बोलिला येस्थळीं केवळात्मा कळे वर्णिला तो अनायासवर्त्मा. ॥ ९
जड शरीर विलक्षण आत्मता, सुगम ती गमती परि तत्वतां ।
हरि! तुझ्याच कृपेकरितां फळे, हुडकितां न कदापिहि आकळे. ॥ १०
तरिच बोध रमापति! भक्तिनें म्हणति केवळ वेद न युक्तिनें, ।
म्हणुनि तूं करुणा करिसी जयीं, म्हणतसे विधितत्त्व कळे तयीं. ॥ ११
सुगम गमत आहे बोध देवा! तथापी
अनुभव धरणें जो पूर्वबिंबस्वरूपीं, ।
चरणकमळ तूझें तत्प्रसादांशलेशें,
[10]न घटित [11]तदभावें [12]धुंडितां सावकाशें. ॥ १२
श्लोकार्थसंक्षेप असाच येथें, भावार्थ आतां वदिजेल तेथें, ।
आत्मज्ञता मानिति एक सोपी, [13]तत्वंपदार्थीं प्रतिबिंबरूपीं. ॥ १३

१. अज्ञानरूप ग्रंथि. २. अहेतुक. ३. जे जीवन्मुक्त आहेत ते अहेतुक भक्ति करतात, कारण भक्ति ही मुक्तीपेक्षां प्रिय वाटते. ४. 'आत्मारामश्च' इत्यादि श्लोक पहा. (स्कंध १ अध्याय ७.) ५. ज्ञानास कारण. ६. ब्रह्मस्तुतीच्या आदीं व अंतीं भक्तियोग वर्णिला आहे. ७. सुलभ मार्ग, सोपा रस्ता. ८. 'अथापि ते देव पदांबुजद्वय' इत्यादि २९ वा श्लोक पहा. त्या श्लोकाचा भावार्थ:—हे देवा! ज्ञान सुलभ असलें तथापि तें भलत्यालाच प्राप्त होत नाहीं. ज्या पुरुषावर तुझ्या चरणकमलयुगुलाच्या प्रसादाचा थोडा तरी अनुग्रह झाला असेल म्हणजे ज्यानें तुला भक्तिद्वारा सुप्रसन्न केलें असेल त्यालाच महिम्याचें तत्त्व समजेल; जो भक्ति करीत नाहीं, त्यानें यत्न केला तरी त्याला तुझ्या महिम्याचें तत्त्व समजणार नाहीं. ९. ज्ञान. १०. घडत नाहीं. ११. त्या प्रसादलेशाच्या अभावें, त्वत्प्रसादावांचून. १२. यत्न करितां. १३. 'तत्वं' या शब्दार्थाच्या ठायीं.

देहास जाणे प्रतिबिंब त्याला जाणूनियां मानिति बोध झाला, ।
शिवासही भासवि तो कळेना जो कां प्रसादाविण आकळेना. ॥ १४

क्षेत्री आत्मपणेंच जाणत असे क्षेत्रज्ञ जीवाख्य तो,
ज्याला तत्त्वमसी म्हणूनि निगम त्वंशब्द हा योजितो, ।
तो तों चित्प्रतिबिंब जो अनुभवीं पाहे स्वबिंबात्मता,
बिंब श्रीभगवत्स्वरूपमहिमा श्लोकांत या तत्वता. ॥ १५

त्वंपदार्थ घडतो प्रतिबिंबीं तत्पदार्थ सकळात्मकबिंबीं, ।
तत्त्वबोध भगवन्महिमेचा, त्वंपदा वदति या श्रुतिवाचा. ॥ १६

जो देशांतरदृष्ट तोचि नर हां देशांतही देखिला,
तें देशद्वय टाकितां स्थळयुगीं तो एकला देखिला; ।
जे येणेरिति लक्षणा करिति ते कूटस्थसर्वेश्वरा,
कूटस्थीं प्रतिबिंब आठउनियां कूटस्थ केला खरा. ॥ १७

जीवोपाधि शरीर कुंभनभवत् कूटस्थदेहीं वसे,
जें ब्रह्मांड मठांत ईश्वरपणीं चिद्व्योम तें उल्लसे, ।
दोघां ऐक्य असे रिती सहज हें तें साधितां जीव हा,
कूटस्थीं प्रतिबिंब मेळउनियां त्या लक्षणें तो पहा. ॥ १८

कूटस्थीं प्रळयीं सुषुप्तिसमयीं एकत्व तों नाकळे,
ज्ञानें ऐक्य समाधिमाजि घडतें बुद्धीस तेव्हां कळे. ।
कूटस्थीं प्रतिबिंब मेळउनियां यालागिं वेदश्रुती,
जें कां सिद्धचि ऐक्य तें असिपदें येणेरिती बोलती. ॥ १९

जीवोपाधिमधें अखंडचि जरी कूटस्थ हा निश्चयें,
भोगातें प्रतिबिंब भोगित असे, तो तों अभोक्ता स्वयें, ।
त्याला बंध न मोक्ष ऐक्य सहजें तें साधिलें हें जरी,
ज्यांला बंध तयास तें अनुभवा एकत्व येना तरी. ॥ २०

---

१. प्रेतास. २. या शरीराला. ३. या शरीराला जाणणारा. हें शरीर माझें असें जो म्हणतो तो क्षेत्रज्ञ. 'हे कुंतिपुत्रा, या शरीराला क्षेत्र म्हणजे शेत असें नांव आहे आणि या शरीराला जाणणारा म्हणजे हें माझें असें म्हणणारा जो त्याला क्षेत्रज्ञ (शेतकरी) असें जाणते लोक म्हणतात.' (भगवद्गीता--अध्याय १३ श्लोक १.) ४. 'तें तूं आहेस' या अर्थाचें उपनिषद्वचन. ५. जीवात्मा. ६. अन्य देशांत पाहिलेला. ७. 'या' असाही पाठ आहे. ८. मायाप्रपंचांत असून स्थिर, कांहीं विकार न होतां एकाच स्वभावानें जो कालास व्यापक असतो तो. ९. घटांतील आकाशाप्रमाणें. १०. चैतन्यस्वरूप आकाश.

आतां श्रीगुरु ते अनात्मजडर्ता मिथ्या निषेधूनियां,
आत्मासर्वनिषेधशेष उरवी आत्मत्व बोधोनियां, ।
तों तों आपण या प्रतीतिस दिसे भोक्तृत्व पूर्वी जया,
प्रारब्धात्मक भोग येतिल पुढें ते भोगणेंही तया. ॥ २१
एवं येरिति आत्मता सुगम हे शिष्या! गमे तत्त्वतां,
ते याची प्रतिबिंबता न कळली याला स्वबिंबैक्यता; ।
कूटस्थैक्य म्हणूनियां असिपदें एकत्व जें बोधिलें
श्रीगोविंददयाप्रसादनिपुणें तें पाहिजे साधिलें. ॥ २२
बिंबात्मतेंत उपजे जड देह त्याला, आत्मा धरी त्यजिहि तो प्रतिबिंब बोला. ।
तो अन्य देह जड अन्यजडास जेव्हां टाकूनि जाय जडभासक[1] तो न तेव्हां. ॥ २३
टाकूनियां सर्प असत्य दोरी त्याचें अधिष्ठान न जाय दूरी, ।
भासे कसा सर्प न रज्जु जेथें? शवांत तों न प्रतिबिंब येथें. ॥ २४
'ममैवांशो[2] जीवलोके' म्हणूनी गीतावाक्यें अर्जुनालागिं कानीं ।
जो कां भोक्ता आपुला अंश सांगे तो चौर्‍यासीं[3] लक्ष योनींत वागे. ॥ २५
'उत्क्रामंतं[4] स्थितं वा' म्हणउनि वदला कृष्ण गीतेंत जेव्हां,
जाणें येणें न बिंबा[5] त्यजुनि जड तनू जातसे अंश तेव्हां, ।

---

१. जडातें प्रकाशित करणारा. २. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानिक र्षति ॥' (भगवद्गीता—अध्याय १५ श्लोक ७). याचा सारांश:—'माझाच सनातन अंश जीवलोकीं जीवांचें रूप धरतो, प्रकृतीमध्यें लीन असलेलीं पांच इंद्रियें आणि मन या सहांना ओढून घेतो. ३. या चौऱ्यायशीं लक्ष योनींची संख्या अशी:—२१लक्ष अंडज खाणींत [९ लक्ष योनि सर्प मुंगी इत्यादि, ४लक्ष योनि जळचरांत, ८लक्ष योनि पक्षिकुळांत,—मिळून २१लक्ष]; २१ लक्ष जारज खाणींत [९ लक्ष द्विपद योनि, ४ लक्ष चतुष्पद योनि, ८ लक्ष श्वापद योनि,—मिळून २१लक्ष]; २१ लक्ष उद्भिज्ज खाणींत, [९लक्ष अन्नधान्यादिक, ४लक्ष सुगंधादिक पदार्थ,८लक्ष वृक्ष तृण इत्यादि,—मिळून २१लक्ष]; २१लक्ष स्वेदज खाणींत [९लक्ष तारांगणादिक, ४लक्ष मेघमाला, ८लक्ष हिरे रत्न माणिकादि, मिळून२१लक्ष]; याप्रमाणें प्रत्येक खाणींत २१ मिळोन चार खाणींत ८४ योनि होतात. दुसऱ्या मताप्रमाणें २१ लक्ष वृक्षयोनि, ११ लक्ष कीटकयोनि, ३० लक्ष पशुयोनि, ९लक्ष जळचर योनि, १०लक्ष पक्षियोनि, आणि ४लक्ष मनुष्ययोनि, मिळून ८४लक्ष योनि होतात. ४.'उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम्। विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः॥' (भगवद्गीता—अध्याय१५श्लोक१०). याचा भावार्थ:—'तो शरीराचा स्वामी एका देहांतून दुसऱ्या देहांत जात असतां, किंवा एकाच देहीं स्थिर असतां, किंवा इंद्रियांनीं युक्त होऊन विषयांचें सेवन करीत असतां, त्याला मूढ जन पाहत नाहींत, पण ज्यांना ज्ञाननेत्र आहेत ते लोक मात्र त्याला पाहतात. ५. आत्म्याला.

जातो टाकूनि देहा परि जड दिसतें त्या मृषा सर्परूपीं
आहे जो बिंब रज्जू हुडकुनि मिळती संत त्या चित्स्वरूपीं. ॥ २६
जें पूर्वपद्यें वदला विधाता कीं रज्जु तूं संत तुतें, अनंता! ।
धुंडूनियां पावति चित्स्वरूपा तें बोलवेना प्रतिबिंबरूपा. ॥ २७
टाकूनि जो जाइल अन्यदेहा तो पूर्वदेहीं न असेंचि पाहा ! ।
तो देह सर्पांत न रज्जु तेव्हां जो गेलिया देह दिसेच जेव्हां. ॥ २८
चैतन्य तुल्य दिसतें प्रतिबिंब बिंबीं, एकत्व दोहिंस समाधिसुखावलंबीं ।
देहांत मात्र अधिक प्रतिबिंब पाहीं, सर्वात्मता अनुभवांत दिसे न कांहीं. ॥ २९
सत्वांत त्यांत निज चित्प्रतिबिंब होतें, तें सत्व विश्वमय बिंब जयीं पहातें. ।
बिंबैक्य पावत असे प्रतिबिंब तेव्हां, बिंबावरी पसरतें निज सत्व जेव्हां. ॥ ३०
जो कां गिरी सिं[२]धुतरींत तीरीं तरींत त्याचें प्रतिबिंब नीरीं, ।
नीरें तयातें प्रतिबिंब आलें, बिंबांत तें त्याच जळें निमालें. ॥ ३१
जळधिमीतरि ये भरतें जळीं, जळ तरींत उचंबळतें तयीं, ।
जळ चढे गिरिहीवरि जेधवां, मग दिसे प्रतिबिंब न तेधवां. ॥ ३२
त्रिभुवनात्मक बिंब चराचरीं पसरतें मन शुद्ध तयावरी; ।
तनुमधें प्रतिबिंब दुजें नुरे मन जयीं निजबिंबसुखीं स्फुरे. ॥ ३३
जों अशा अनुभवास न पावे, चित्त चिन्मय असें न थिरावे ।
तोंवरी अनुभवास न आलें ज्ञान शाब्दिकचि केवळ झालें. ॥ ३४
[१०]गीतेमधें हरिहि येरिति बोलियेला, कीं अर्जुना! तरिच तूं वद बोध झाला, ।
भूतें अशेष जरि देखसि आत्मरूपीं तेव्हांचि देखसिल ऐक्य मम स्वरूपीं. ॥ ३५

---

१. चिदंश, ज्ञानस्वरूपा. २. पर्वत. ३. 'जो कां गिरी सिंधुनदीस तीरीं नदींत त्याचें प्रतिबिंब नीरीं' असाही पाठ आहे. ४. उदकांत. ५. समुद्रांत. ६. भरती. ७. भरती येऊन पर्वतावर पाणी चढलें म्हणजे त्याचें प्रतिबिंब जसें पाण्यांत दिसत नाहीं, त्याप्रमाणें त्रिभुवनात्मक सकल स्थावरजंगमांच्या ठायीं बिंब (आत्मा) पसरला आहे अशी प्रतीति झाली म्हणजे प्रतिबिंबाची अपेक्षा राहत नाहीं. ८. पृष्ठ १८२ टीप ३ पहा. ९. राहत नाहीं. १०. 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव । येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥' (भगवद्गीता–अध्याय ४ श्लोक ३४-३५). याचा भावार्थः—'तूं समज कीं ज्ञानी तत्त्वजाणते जे आहेत त्यांना नमस्कार केल्यानें, पुनःपुनः प्रश्न केल्यानें आणि त्यांची सेवा केल्यानें तुला या ज्ञानाचा उपदेश हे करितील. हे पांडवा, हें ज्ञान प्राप्त झाल्यावर तुझ्या मनांमध्यें पुनः असा मोह उत्पन्न होणार नाहीं आणि सर्व भूतें तूं आपल्या ठिकाणीं आणि माझ्या ठिकाणीं अभेदपणानें पाहशील.'

ज्ञानप्रशंसा बहुसाल केली, तों अर्जुनाची करुणा उदेली; ।
याचा करावा उपदेश याला, आली कृपा हे करुणालयाला. ॥ ३६
परि नये शरणागत तों न दे, अभयहस्त न तत्व तया वदे, ।
गुरु दयाळु तथापिहि येरिती, वदति दाटुनि तत्व न त्याप्रती. ॥ ३७
तरी कृपा ये करुणालयाला देखोनि सत्पात्र म्हणे तयाला, ।
कीं ज्ञान सर्वांहुनि थोर आहे जाणूनि तें होउनि धन्य राहें. ॥ ३८
भावें वदे या हरि अर्जुनाला कीं हें कळावें सकळां जनांला ।
कीं जाण तें संतकृपेकरूनी तयां गुरुत्वें हृदयीं वरूनी. ॥ ३९
म्हणे अर्जुना संत धुंडूनि आधीं तयांपासुनी ज्ञान हें शीघ्र साधीं, ।
करूनी नमस्कार साष्टांग, सेवा करावी, पहावें जसें देवदेवा ! ॥ ४०
कृपादृष्टिनें पाहती तूज जेव्हां करावा अरे अर्जुना ! प्रश्न तेव्हां, ।
तुटे बंध हा कैंवि हें दुःख नाशे कसा नित्य आनंद आत्मा प्रकाशे. ॥ ४१
अशा वंदनप्रश्नसेवाप्रसंगें जयीं त्यांस तूं सेविसी अंतरंगें, ।
तुतें वेदशास्त्रज्ञ जे तत्त्ववेत्ते कृपादृष्टिनें पाहती तेधवां ते. ॥ ४२
तें ज्ञान तूज उपदेशिति तेधवां तें, जेणेंकरूनि सकळांसहि मुक्ति होते, ।
ते संत तूज उपदेशिति तत्त्व जेव्हां, ऐसा पुन्हा न तुज मोह पडेल तेव्हां. ॥ ४३

अनुभव मज कैसा होय तो बोध होतां,
म्हणसिल तरि पार्था ! सांगतों तूज आतां, ।
सकळ विविध भूतें देखसी स्वस्वरूपीं,
तुज मज मग तेव्हां ऐक्यता विश्वरूपीं. ॥ ४४

या कारणें ज्ञान जयांस होतें ते स्वस्वरूपांत समस्त भूतें ।
असे पहाती प्रतिबिंब तेव्हां बिंबीं मिळे येरिति बोध जेव्हां. ॥ ४५
या कारणें तवकृपालवलेश जेव्हां जाणेल येरिति तुझ्या महिमेस तेव्हां, ।
नाहींतरी म्हणतसे विधि याच भावें कीं ज्ञान तोंवरि तयास कसें म्हणावें ? ४६
श्लोकामधें पहिलिया वदला विधाता कीं ज्ञान तें तवकृपांशलवें अनंता ! ।
बोलेल याउपरि कीं मज तोचि देवा ! द्यावा प्रसादलव जो तवपादसेवा. ॥ ४७

---

१. पुष्कळ. २. दयागृह जो कृष्ण त्याला. ३. 'श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप । सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥' (भगवद्गीता—अध्याय ४ श्लोक ३३). याचें तात्पर्य:—'हे परंतपा पार्था, द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ होय, कां कीं सर्व कर्माचें जें फळ, त्याचा अंतर्भाव ज्ञानाच्या फळांत होतो. ४. पृष्ठ ३३३ टीप ३ पहा.

तूझा[1] प्रसादलवही परि भाग्यवृंदा[2] जो आमुच्या उपजवी मज तो, **मुकुंदा** ! ।
येथेंचि[3] होउनि कृतार्थ करो **मुरारी** ! जन्मांतरीं तरि घडो दुसऱ्या[4] शरीरीं. ४८
तूं कल्पवृक्षसम सर्वजनास देवा ! तूझा प्रसाद करितां तवपादसेवा, ।
मी दास यद्यपि जरी अपराध केला, कीं वत्सवत्सप हरूनि समूह नेला. ॥४९
अन्याय थोर घडला मजलागिं, देवा ! तो प्रार्थितों म्हणुनि मागुति **वासुदेवा** ! ।
चित्तांत हा धरुनि भाव वदे **विधाता** कीं तो प्रसाद मज मागुति हो **अनंता** !॥
हा सापराध[5] जरि देह तुझ्या प्रसादा आयुष्यशेषवरि पात्र नव्हे **मुकुंदा** ! ।
जन्मांतरीं तरि घडो मज अन्यदेहीं तूझा प्रसादलवलेश तदंश[6] कांहीं. ॥ ५१
ऐसें वदोनिहि सशंक असा **विरिंची** कीं सापराध तरि उत्तम योनि कैंची ? ।
याचा प्रसाद तरि एक मनुष्यदेहीं शंका अशी उपजतां स्मृति होय कांहीं. ५२

[7]इंद्रद्युम्न **द्रविडधरणीपाल** जो **पांड्यराजा**
जो कां **विष्णुव्रतधर** करी तत्प्रसादार्थ[8] पूजा, ।
तो देवाची करित असतां, तेथ आला **अगस्ती**;
त्याची पूजा नृप न करि तैं तो म्हणे[9], 'होय हस्ती.' ॥ ५३

झाला गजेंद्र नृप जो मग त्यास नक्रें पायीं जळांत धरितां **हरिनें** स्वचक्रें, ।
नक्रास मारुनि गजाधिप सोडवीला, **वैकुंठमुक्तिसदनीं** निजरूप केला. ॥ ५४
पूजाप्रसाद **हरिचा** मज हो म्हणूनी केली मधेंच मुनिशापबळें कुयोनी[10] ।
तो पावला, परि तशांतहि या **मुकुंदें** केला प्रसाद सुरसेव्यपदारविंदें[11]. ॥ ५५
याकारणें **विधि** म्हणे **हरिचा** [12]विरोधी मी वत्स वत्सप हरूनि महापराधी ।
झालों, म्हणोनि **हरि** ! होइल दुष्ट योनी प्रार्थी प्रसाद मज तेथहि हो म्हणूनी.॥
याकारणें म्हणतसे हरिला **विधाता** कीं दुष्ट योनि मज होय जरी **अनंता** ! ।
तेथें प्रसाद मजलागिं तुझा **मुकुंदा** ! हे प्रार्थना इतकि या चरणारविंदा[13].॥५७

---

१. 'तदस्तु मे नाथ स भूरिभागो' इत्यादि ३० वा श्लोक पहा. याचें तात्पर्य:—'हे देवा ! मला एवढी मोठी भाग्याची जोड दे कीं त्या योगें ह्या जन्मांत किंवा दुसऱ्या पशुपक्ष्यांच्या योनींत मी तुझ्या भक्तांपैकीं एक यःकश्चित् भक्त होईन आणि तुझ्या पादपल्लवांची सेवा करीन. २. भाग्याच्या समुदायाला. ३. या ब्रह्मदेवाच्या जन्मांतच. ४. अन्य योनींत. ५. अपराधी. ६. त्या प्रसादलवलेशाचाही अंश. ७. पृष्ठ २६३ टीप १ आणि पृष्ठ २२३ टीप ५-६-७ पहा. (यथार्थदीपिका—अध्याय १४ ओव्या १६१-१७०). ८. त्या विष्णूचा प्रसाद मिळावा म्हणून. ९. हत्ती हो असा शाप देई. १०. गजयोनि. ११. देवांनीं सेवन करण्यास योग्य आहेत पदकमळें ज्याचीं त्यानें. १२. शत्रु. १३. पादकमळाला.

ती योनि भोगुनि अशाच पदास यावें, कीं मुक्तिचें पद तिये पदवीस जावें, ।
ब्रह्मा म्हणे हरि असा अभिलाष नाहीं मागेन एक हरि! दे मज तेंचि कांहीं.॥

प्रसाद श्रीकांता! करि मज असा कीं तुझि जिहीं
पदाब्जांची सेवा सतत धरिली त्यांतचि मिहीं, ।
तुझ्या या पायांचा [१]भृतक असि भृत्यांत गणना
प्रसादें त्या पावे तव चरण भावें मुनिधना! ॥ ५९

मोक्षादि सर्व [२]पुरुषार्थपदें विशेषें सेवासुधा तुझि [३]असार करी अशेषें ।
सेवाप्रसादफळ यास्तव मागताहे ब्रह्मा हरी सफळ वामन तेंचि लाहे. ॥ ६०

प्रसादाचें तुझ्या फळ चरणसेवाच मज दे,
असें पूर्वश्लोकीं कमळभव कृष्णाप्रति वदे. ।
सुधागोडी तुच्छा, असिहि हरिसेवा व्रजजना
घडे, त्याळा घोंटी नवल बहु वाटे विधिमना. ॥ ६१

[४]व्रजजनविभवातें या प्रसंगें विधाता,
विनविल, [५]कड पावे तोंवरी श्रीअनंता! ।
स्तनरस हरि प्याला ज्यांत [६]गोगोपिकांचा,
प्रथम कथिल त्यांचें वैभव ब्रह्मवाचा. ॥ ६२

[७]धन्या अहो! व्रजवधू व्रजलोक गायी, ज्याच्या स्तनेंकरुनि तृप्त [८]सुधाब्धिशायी, ।
प्यालासि वत्स सुत होउनियां जयांचीं दुग्धें न वर्णवति धन्यपणें [९]तयांचीं.॥ ६३

यज्ञादिकें करुनि तृप्ति नव्हे जयाला, येथें क्षणक्षणहि तृप्ति दिसे तयाला, ।
पान्हा स्तनांत उरला परि सर्व पीनां, हे बोल बोलति अशा [१०][११]स्तनयुग्मपीना. ६४

भावें अशा हरिस तृप्त म्हणे विधाता गोगोपिका परम धन्य अशा अनंता! ।
मुक्तींत लाभ न असा म्हणऊनि सेवा श्लोकांत मागत असे पहिल्यांत देवा!॥

१. चाकर, सेवक. २. धर्मार्थकाममोक्षादि चार प्रकारचे पुरुषार्थ तुझ्या सेवामृतापुढें तुच्छ आहेत. ३. क्षुल्लक, निःसत्व. ४. गोकुळांतील लोकांचें वैभव. ५. तीर, पार. ६. गाईचा आणि गोपांगनांचा. ७. 'अहोऽतिधन्या व्रजगोरमण्यः' इत्यादि ३१ वा श्लोक पहा. याचा भावार्थः—'हे विश्वव्यापका विभो! आजपर्यंत झालेल्या यज्ञांनीं ज्या तुझी तृप्ति झाली नाहीं, त्या त्वां वत्सांच्या आणि गोपाळांच्या रूपानें गोकुळांतील धेनूंचें आणि गोपींचें अमृतसदृश असें दुग्ध आनंदानें प्राशन केलें, तेव्हां त्या धेनु आणि गोपी अत्यंत धन्य होत त्यांचें भाग्य केवढें म्हणून सांगावें ?. ८. अमृतसागरांत शयन करणारा भगवान् विष्णु. ९. त्या धेनुगोपिकांचीं. १०. प्राशन करीना. ११. ज्यांचे दोन स्तन पीन (पुष्ट) अशा गोपांगना.

गोगोपिकास्तनरसें हरि तृप्त झाला, त्यांचेंच भाग्य कमळासन बोलियेला; ।
आतां व्रजीं वसति त्यां सकळां जनाचे वर्णूनि भाग्यसमुदाय विरिंचि नाचे. ६६

अहो! धन्य गौळी अहो! धन्य नंद, व्रजीं सर्वही धन्य हो! प्राणिवृंद, ।
अहो! भाग्य यांचें, अहो! भाग्य यांचें, सखे सोयरे रामकृष्णाख्य ज्यांचे. ६७
अहो! भाग्य हा शब्द उच्चार वाचे विधाता मनीं विस्मयाविष्ट नाचे, ।
असा भाव चित्तामधें वासुदेवें अहो दाविला वर्णिला त्याच देवें. ॥ ६८

व्रजजनबहुभाग्यें वर्णितां या प्रकारें,
न कळति विधिलाही जीं अतर्क्यें अपारें, ।
म्हणुनि विभवलेशें त्यांचिया भाग्य जें जे
अनुभविति असे ते वर्णितों देवराजे. ॥ ६९

यांचा न भाग्यमहिमा वदवे, असो हा, कीं जो अतर्क्य मज नीरदनीलदेहा! ।
आम्हीं शिवादि अकराजण धन्य झालों यांच्या अचिंत्यविभवें हरितेंचि बोलों.॥

बुद्ध्यादि पात्रें अकरा करूनी तुझ्या पदांभोजरसें भरूनी, ।
क्षणक्षणा पान करूं मुकुंदा! वर्णूं किती या व्रजभाग्यवृंदा! ॥ ७१

---

१. 'अहो भाग्यमहो भाग्यं' इत्यादि ३२ वा श्लोक पहा. त्याचा सारांश:—'परमानंदरूप सनातन पूर्ण परब्रह्म श्रीकृष्ण ज्यांचा सखा, त्या गोकुलनिवासी नंद आदिकरून गोपालांचें भाग्य किती वर्णावें! ते अत्यंत धन्य होत! २. 'अहो भाग्य हा शब्द उच्चार वाचे, व्रजाचें मनीं आठवी भाग्य नाचे। म्हणे पूर्ण हें नित्य जें ब्रह्म साचें, निजानंद तो मित्र हो या जनाचें ॥' असाही पाठ आहे. ३. गोकुळांतील लोकांचें मोठें भाग्य. ४. अनंत. ५. 'एषां तु भाग्यमहिमाच्युत तावदास्ताम्' इत्यादि ३३वा श्लोक पहा. याचें तात्पर्य:—'हे अच्युता! या गोगोपिकांचें भाग्य तर मोठेंच होय, पण त्यांच्यामुळें इंद्रियांचे अधिष्ठाते जे रुद्रादि आम्ही अकरा देव त्या आमचें भाग्य उदयास आलें; कारण इंद्रियरूप चषकांनीं (पानपात्रांनीं) आम्हांला तुझ्या पादकमळांतील अमृतासव वारंवार प्राशन करण्यास मिळतो, हें केवढें बरें आमचें भाग्य! ६. तो एकीकडे राहूं द्या. ७. मेघासारखा नीलवर्ण ज्याचा देह अशा कृष्णा! ८. शिव इत्यादि देव—इंद्रियांचे अधिष्ठाते:—चंद्र, ब्रह्मदेव, रुद्र, वायु, सूर्य, वरुण, अश्विनीकुमार, अग्नि, इंद्र, दिग्देव आणि निर्ऋति—असे अकरा देव. याविषयीं पुढील ओव्या पहा:—'मनःस्वामी राकापति । ब्रह्म मी तो धिषणापति । अहंतास्वामी तो पशुपति । तीन्ही मूर्ति कर्तृत्वीं ॥ ३६ ॥ दशधा चेष्टा जो कां पवन । तो येथ त्वचा त्वगभिमान । दिग्देवता श्रवणाभिमान । हें पांचवें जाण दैवत ॥ ३७ ॥ चक्षुःस्वामी तो दिनकर । जिव्हास्वामी पाशधर । घ्राणपति ते अश्विनीकुमार । ऐसे सुरवर अष्ट हे ॥ ३८ ॥ आणि वाग्देवता कृशान । पाणिदेवता संक्रंदन । निर्ऋति तो गुह्याभिमान । अकरा जाण हे अवघे ॥ ३९ ॥ [दशमस्कंध—हरिवरदा टीका] ९. बुद्धि कर्ण, हस्त, घ्राण, जिव्हा, त्वचा इत्यादि एकादश इंद्रियरूप पानपात्रांनीं.

ब्रजजन [1]अकराही पादपद्मामृतानें
करिति भरुनि पात्रें जेधवां, नित्य पानें, ।
सुरवर अकरा त्या एकएकाचि पात्रें,
परम विभव आम्हीं मानितों संगमात्रें. ॥ ७२

बुद्ध्यादिकींकरुनियां ब्रजलोकवासी सप्रेम जे भजति चिंतिति माधवासी, ।
[2]बुद्ध्यादि देव अकरा [3]कृतकृत्य तेथें आम्हीं शिवादिक असेंरिति भाव येथें. ॥ ७३

ब्रजास या रक्षक कृष्ण जेव्हां काळादिकांचें भय काय तेव्हां ? ।
हा बुद्धिचा निश्चय त्यांस जेथें ब्रह्मा [4]तिचें दैवत धन्य तेथें. ॥ ७४
माझा हरी आणिक मी हरीचा, अहंपणीं हे ब्रजलोकवाचा, ।
तेथें महारुद्र कृतार्थ होतो, श्री[5]कृष्णभाग्यें गिरिजापती तो. ॥ ७५
कामादि संकल्पहि जे मनाचे श्रीकृष्णरूपीं ब्रजिंच्या जनाचे ।
तद्देवता चंद्र कृतार्थ तेथें, संकल्प होती हरिरूप जेथें. ॥ ७६

येती मुकुंदचरितें ब्रजलोककानीं, दि[6]ग्देवता पिति सु[7]धा [8]श्रवणाभिमानी ।
[9]त्वग्देवता पवनही कृतकृत्य तेव्हां स्पर्शे [10]रमापतिशरीर तयासि जेव्हां. ॥ ७७
डोळे भरूनि हरिला जन हे पहाती, तेव्हां दि[11]वाकर सुधाब्धित मग्न होती. ।
श्रीबाळकृष्णमुखचुंबनलाळपानें जिव्हेमधें [12]वरुण धन्य तया रसानें. ॥ ७८

जो स्वाभाविक दिव्य गंध हरिचा घेतां सुवासा तया,
[13]घ्राणीं अश्विनिचे कुमार पदवी घ्राणेंद्रियांची जयां, ।
तें तेथें कृतकृत्य आणि हरिच्या लीळा जयांच्या मुखीं,
वाचादैवत [14]अग्नि कृष्णचरितें नामामृतें तो सुखी. ॥ ७९

सलगि करुनि लागे चक्रपाणीस [15]पाणी विभव तदभिमानी मानितो [16]वज्रपाणी ।
हरिचरण पहाया चालती लोक जेव्हां जनचरणयुगाचा देव तो तुष्ट तेव्हां. ॥ ८०

चरणदेव [17]उपेंद्र जरी हरी तरि तयास असे गणना सुरीं, ।
[18]अदितिचा सुत वामन या गुणें चरणदैवत वामन आपणें. ॥ ८१

---

१. अकरा इंद्रियांनीं. २. मन बुद्धि इत्यादिकांस अधिष्ठाते देव. ३. सफल. ४. बुद्धीचें. बुद्धीचा स्वामी ब्रह्मदेव होय. ५. 'श्रीकृष्ण भावें' असाही पाठ आहे. ६. अष्ट दिक्पाळ. ७. अमृत. ८. कर्णाची अभिमानिनी देवता. ९. त्वचेची देवता. (वायु). १०. कृष्णदेह. ११. सूर्य, चक्षूंची देवता. १२. रसनेची देवता वरुण. १३. नाकांत. १४. वाणीची अभिमानिनी देवता अग्नि. १५. हात. १६. इंद्र. १७. विष्णु. (इंद्राच्या मागून जन्म झाल्यामुळें 'उपेंद्र', 'इंद्रावरज' असें नांव पडलें.) १८. वामनचरित्र, हें प्रकरण पहा.

सकळ सद्गति ज्याकरितां जसी, चरणिंची गति त्याकरितां तसी, ।
म्हणउनी गतिदायक[1] जो हरी चरणिं राहुनियां गतिही करी. ॥ ८२

इतरइंद्रियदेवगणव्रजीं विभव मानिति जेंवि तसें निजीं[2] ।
निजचि वैभव वामन मानितो चरणदेव उपेंद्र हरीच तो. ॥ ८३

व्रजजनविभवातें वर्णितां वामनाचें
व्रजचि हृदय झालें भाग्य हें वाङ्मनाचें[3] ।
व्रजजनचरणांचा देव तो वामनात्मा
म्हणउनि अणु त्याचा वर्णिला भाग्यवर्त्मा. ॥ ८४

उपेंद्र जो वामन शेषशायी[4] तो देवदेव व्रजलोकपायीं ।
तत्पादधूळी निजनामधारी जो मी तया अर्पितसे मुरारी. ॥ ८५

स्कंधांत एकादश ज्यास संख्या तेथें हरी उद्धव भक्तमुख्या[5] ।
जो बोलिला श्लोक[6] तयास पाहा तो श्लोकही वर्णिल तोचि जो हा.॥८६

ज्या भक्ता मजवीण अन्य नलगे निर्वैर शांत स्वयें,[7]
जो सर्वत्रहि पाहतो सम[8] मला सर्वात्मतानिश्चयें, ।
त्यामागेंचि सदा अरे ! फिरतसें त्याच्या पदाच्या धुळी
मी आंगें धरितों पवित्र करितों लोकांस भूमंडळीं. ॥ ८७

येथें माधव उद्धवास वदला कीं मी अरे! आपणा,
त्याच्या पादरजें पवित्र करितों या उद्धवाला खुणा, ।
त्याच्या ठाउक कीं पवित्र करणें ज्याला तदात्माचि हा,
याभावें[9] वदतो रजांस धरितो सद्भक्त भक्तिस्पृहा. ॥ ८८

आतां पावन भक्तपायधुळिनें सर्वांस जेव्हां करी
कां पापी अपवित्र लोक दिसती बोलाल ऐसें जरीं ? ।
होतें ठाउक हें रहस्य इतुक्यां जे शुद्धि हे प्राथिती
कीं भक्तांघ्रिरजें[10] पवित्र करुनी तारी तयां श्रीपती. ॥ ८९

---

१. मोक्षगति देणारा. २. आपल्याच वैभवाप्रमाणें. ३. वाणीचें आणि मनाचें. ४. शेषावर शयन करणारा (विष्णु). ५. भक्तांत प्रमुख जो उद्धव त्याला. ६. 'निरपेक्षं मुनिं शांतं' इत्यादि अकराव्या स्कंधांतील श्लोक. ७. जो निरपेक्ष, वैरशून्य आणि शांत आहे. ८. समदर्शी, सर्वत्र सारखा पाहणारा. ९. हा अकराव्या स्कंधांतील पूर्वोक्त श्लोकाचा भावार्थ आहे. १०. भक्तांच्या पायांच्या रजःकणांनीं.

ज्याला ठाउक अन्नसत्रचि नसे, जो अन्न मागेचिना,
सत्रीं भोजन लभ्य होइल वदा कोणेरिती त्या जना, ।
ज्याला ठाउक हें रहस्यचि नसे प्रार्थी न या शुद्धीसी,
त्यांला शुद्धि न त्या रजें हरि हरी शंका मनाची असी. ॥ ९०
करी वामन प्रार्थना हे मुकुंदा! तुझ्या भक्तपायांचिया धूळिवृंदा ।
हरी! घालि माझे शिरीं सर्वकाळीं, वहातोसि आंगेंचि ज्या पायधूळी. ॥९१
याकारणें चरणदैवत जो मुरारी आत्मा उपेंद्र हरि वामननामधारी ।
तो घेउनी व्रजजनांघ्रिसरोजधूळी, मातें कृतार्थ करि या कलिदुष्टकाळीं. ॥ ९२
श्रीकृष्ण तो पदरजें व्रजिंच्या जनाच्या दुर्वासना हरितसे हरि वामनाच्या; ।
आत्मा उपेंद्र तरि वामननाम देहासेऊनियां पदरजें करिं धन्य पाहा. ॥ ९३
आत्मैक्य नामैक्यहि शेषशायी देऊनि मातें निजभक्तपायीं ।
उपेंद्र तो वामन जेथ आहे धूळीमधें धन्य करूनि पाहे. ॥ ९४
बुद्ध्यादि देव अकरा विधि बोलियेला, जे आपणासहित भाग्य असें तयांला. ।
विश्वात्मतेंकरुनि भाग्य उपेंद्र मानी कीं धूळि हे स्वजनवैभवराजधानी. ॥ ९५
येथेंचि टीका करिताति कोणी, कीं यांत पद्मोद्भव ईशूळपाणी ।
मिळोनि तेरा जण देव होती श्रीकृष्णपादाब्जरसास घेती. ॥ ९६
श्लोकार्थ तों होत असे असाही, परंतु भावार्थ विरुद्ध कांहीं, ।
कीं मित्र जो देव गुदेंद्रियाचा तद्भाग्यही वर्णिल काय वाचा? ॥ ९७
शास्त्रीं विराडिंद्रियसृष्टि जेथें गुदेंद्रियाला नरकत्व तेथें, ।
त्या इंद्रिया लाभ कसा हरीचा बोलेल सांगा विधि तो स्ववाचा? ॥ ९८
चित्तीं स्फुरे हरि गुदेंद्रियकर्म होतां, ऐसें म्हणाल तरि तें मनबुद्धिचित्ता, ।
सर्वेंद्रियेंकरुनि कर्म घडे तथापी सद्भक्तमानस असे हरिच्या स्वरूपीं. ॥ ९९
पात्रें जसीं आणिक इंद्रियांचीं श्रीकृष्णसेवा असि यास कैंची? ।
म्हणूनि पात्रें अकराचि साचीं जे देव एकादश उक्ति त्याची. ॥ १००
समर्पिती कर्म करूनि देवा, होतें विसर्गें सुख तेंचि सेवा, ।
आत्मासुखें तें सुख वासुदेवा! हा भाव यालागिं कसा वदावा? ॥ १०१
कर्मार्पणादि विधि यांस कधीं कळेना, हा कृष्ण ईश म्हणऊनिहि आकळेना. ।
नैसर्गिकप्रियपणें भजती मुकुंदा देहेंद्रियें करिति सर्वहि कृष्णधंदा. ॥ १०२

१. हरण करी. २. माझा आणि ज्याचा आत्मा आणि नाम हीं एकच आहेत असा शेषशायी. ३. ब्रह्मदेव. ४. महादेव, रुद्र. ५. स्वाभाविक प्रेमानें. ६. कृष्णाची सेवा.

या इंद्रियेंकरुनि काय घडेल सेवा ? सर्वेंद्रियें सहज सेविति वासुदेवा. ।
यावेगळेचि अकराजण देव होतां हा क्लिष्ट कल्पितहि अर्थ किमर्थ आतां ? ॥
आम्हीं शिवादि अकरा अतएव धाता यां दोंसुरांसहित बोलियला अनंता, ।
त्यामाजि शेवटिल इंद्रिय गोपिकांचें झालें कृतार्थ म्हणऊनि म्हणाल साचें. ॥

तथापि हा काळ जयीं स्तुतीचा तयीं न तो लाभ तयां रतीचा. ।
कात्यायनीचें व्रत गोपकन्या करूनि होती रतिलाभधन्या. ॥ १०६

हे धन्य देव अकराजण मात्र जेव्हां, वत्सें हरूनि विनवी विधि येथ जेव्हां, ।
श्लोकार्थ आणिक अबाधित अर्थ जो हा, श्रोते तुम्हीं करुनि येथ विवेक पाहा. ॥

व्रजजनविभवाचा पार नेणे म्हणूनी,
विभव सुरवरांला जें तदंशेंकरूनी, ।
विशद कथुनि आतां श्लोकें हा बोलतो कीं,
व्रजजनपदरेणू लभ्य तो धन्य लोकीं. ॥ १०७

तें भाग्य थोर तरि कीं जरि जन्म येथें, कांहीं घडे हरि असें तव दास्य जेथें.।
हे कृष्णभक्तिपदवी जरि लभ्य नाहीं या गोधनांत तरि हो पशुजन्म कांहीं. ॥
सप्रेम भक्त तुज पाहति शेषशायी ! वृंदावनांत तुज येरिति वत्स गायी. ।
हेही महापदवि लभ्य उगीच नाहीं, हो या वनीं तरुलतादिहि जन्म कांहीं. ॥
जे या वनीं तरुलतादिक जन्म घेती, कोणाचिया पदरजें तरि धन्य होती. ।
झालें जिणें सकळही हरिरूप ज्यांचें त्यांचें पदाब्जरज लाधति भाग्य त्यांचें. ॥

---

१. कृष्णसंभोगसुखाचा. २. कात्यायनीचें व्रत=पार्वतीचें व्रत. भगवान् श्रीकृष्ण हा पति मिळावा म्हणून गोकुळांतील कन्यांनीं कात्यायनी देवीची सहेतुक पूजा आरंभिली. या गोपकुमारी नित्य अरुणोदयीं उठून कालिंदीनदींत स्नान करून तिच्या वाळवंटावर तिची वालुकामय प्रतिमा करून पूजा करीत असत. या नियमास 'कात्यायनीव्रत' असें म्हणतात. गोपी स्नानासाठीं नदींत उतरल्यावर, श्रीकृष्णानें त्यांचीं तीरावरील वस्त्रें अकस्मात् गोळा करून नेलीं आणि स्वतः तो कदंबवृक्षावर जाऊन बसला. नंतर गोपींनीं प्रार्थना केल्यावरून वस्त्रें परत दिलीं इत्यादि कथेस ही 'कात्यायनीव्रत' असें म्हणण्याचा परिपाठ आहे. ३. स्पष्ट. ४. 'तद्भूरिभाग्यमिह जन्म किमप्यटव्याम्' इत्यादि ३४वा श्लोक पहा. याचें तात्पर्यः—'हे परमेश्वरा ! या मृत्युलोकीं कोणता जन्म झाला तरी गोकुळांतील प्राण्याच्या पायांची धूळ अंगावर पडली तर तो जन्म धन्य होय, मग तो जन्म अरण्यांत किंवा गोकुळांत झाला तरी उत्तमच. गोकुळांतील प्राण्यांची योग्यता अशी विलक्षण आहे कीं, ज्याचें पदरज श्रुतिमृग्य आहे त्या तुझ्या साठींच त्या प्राण्यांचें, हे मुकुंदा ! सर्व जीवन आहे. ५. गाईमध्यें. ६. होवो. ७. हें मोठें स्थान सहज मिळणारें नव्हे. ८. आयुष्य.

यांचें जिणें सकळ माधवरूप झालें, ऐसें व्रजस्थजनवैभव बोलियेलें. ।
या भक्तिचें फळ रमापति काय यांला देयील? कीं म्हणुनि येथ सशंक झाला.॥
श्लोकांत यांत वदतो म्हणऊनि धाता, कीं तूं व्रजस्थजनभक्तिरसें अनंता! ।
झालासि केवळ ऋणी फळ काय देसी? उत्तीर्ण कोण फळ देउनि त्यांस होसी?॥

जे या गोवळवाडियांत असती, तूं काय देसी तयां?
मोटी मुक्ति तुझी, परंतु नव्हेसी उत्तीर्ण देऊनियां; ।
द्वेषीही कुळमुक्तियुक्त पदवी पावे तुझी पूतना,
तेही देउनियां ऋणी व्रजजनप्रेमें जगज्जीवना. ॥ ११३

जे थानीं विष घालुनी तुज हरी! मारावया पातली,
द्वेषेंही स्तन पाजितां स्वपदवी तीतें तुवां दीधली. ।
प्रेमें श्रीमुख पाहतां स्तनयुगीं पान्हा जयांचा पिसी,
त्यांला देउनि मुक्ति ते हरि! कसी उत्तीर्णता पावसी? ॥ ११४

आतां यां सकळां कुळांसहितही देसील मुक्ती जरी,
उत्तीर्ण व्रजिच्या जनास करुणासिंधू न होसी तरी; ।
भाऊ जो अघनाम आणि बकही बंधू असी पूतना
तीतें जें पद तें तयांसहि दिल्हें, देवा! जगज्जीवना! ॥ ११५

ज्यांला तूजनिमित्त वित्त सकळ प्राणांदिहीं आपलें,
देवा! वाटत गोड तूजविण तें टाकूनि जींहीं स्थळें, ।
त्यांला जे गति पूतनेसि दिधली ते देउनीयां कसा
उत्तीर्ण प्रभुवर्य! होसिल मनीं? हा मोह माझ्या असा. ॥ ११६

यालागिं काय हरि! देउनियां जनाला उत्तीर्ण होसिल असें नकळे मनाला. ।
देऊनि मुक्तिहि ऋणी व्रजवासियांचा, भावें अशा वदलि तेथ विरिंचि वाचा.॥

---

१. या गोकुळवासी जनांचें. २. 'एषां घोषनिवासिनामुत भवान्' इत्यादि ३५ वा श्लोक पहा. याचा भावार्थ:—'हे देवा! ह्या गोकुळांत राहणाऱ्या लोकांनीं घरें, द्रव्य, स्नेही, आप्त, शरीर, पुत्र, प्राण, मन इत्यादि सर्व कांहीं तुला अर्पिलें आहे; तर तूं त्या गोकुलवासी जनांला तुझ्यावेगळें फळ कोठचें देणार? या गोष्टीचा विचार करतां करतां आमची मति गुंग झाली आहे. हे देवा! पूतनेनें भक्तांच्या वेषाचें नुसतें अनुकरण केलें म्हणून तिलाच एकटीला नव्हे तर तिच्या सगळ्या कुळाला आपली प्राप्ति करून दिलीस, तर आतां गोकुळवासी भक्तांस तूं काय फळ देणार? ३. गोकुळांत राहणाऱ्या लोकांच्या भक्तिरसानें. ४. उतराई, ऋणमुक्त. ५. द्वेष करणारी पूतना तिला देखील तिच्या कुळासह तूं आपली पदवी (मुक्ति) दिलीस. ६. जगताच्या स्थितीला कारण अशा. ७. अघासुर आणि बकासुर. ८. या विचारानें मन गोंधळतें.

कृष्णा तूजनिमित्त सर्व सदन प्राणादि ज्यांचें जिवें,
मुक्तीचें पद [3]राक्षसांसि दिधलें तें त्यांसि देणें उणें. ।
यांचें तूं ऋण केंवि फेडिसि असें श्लोकामधें पूर्विल्या,
भक्ति श्रीव्रजिच्या रमापतिपुढें येणेरिती वर्णिल्या. ॥ ११८
येथें असें विधि वदोनि सशंक झाला, कीं हे खरेंच परि मागुति या जनांला ।
आहे गृहादिअनुराग, विराग नाहीं, कीं गोप हे रमति सर्वहि देहगेहीं.॥११९
टाकूनियां गृहसुतादि कलत्र वित्तें जाती यती भजति त्यजुन विशुद्ध चित्तें ।
जो मोक्ष त्यांस हरि यांसहि तोचि देतो, उत्तीर्ण येरितिकरूनि मुकुंद होतो.॥
ऐसा विचार सुचतां व्रजिच्या जनाची श्रीकृष्णभक्ति मनिं आठवितां मनाची, ।
शंका हरे त्वरित कीं हरिभक्ति जेथें होती अवाधक असे अनुराग तेथें. ॥१२१
तैसी न जोंवरि रमापतिभक्ति चित्तीं, तों [10]गेहदेहसुतकामिनिभोगवित्तीं; ।
ज्या आवडी करिति बंधन या जनांला त्या बंधका नव्हति जो हरिभक्त झाला.॥
चंद्रादि सर्व गगनीं ग्रह आणि तारा दीप्ती तयांसिहि असोनि यथाप्रकारा, ।
श्रीसूर्य त्यांत उगवे, मग त्यां समस्तां दीप्ती यथास्थित असोनिहि होति अस्ता.॥
[11]खद्योत तेजें रविच्या प्रकाशें होती तशा या हरिभक्तिलेशें, ।
भावें अशा [12]श्लोक विरिंचि आतां, बोलेल तो हा सुखकारि संतां. ॥१२४
कामादि चोर वय तोंवरिची हरीती [13]कारागृहासम गृहें हरि! तोंचि होती, ।
माझें तुझें म्हणुनि तोंवरि मोहबेडी कीं जोंवरी न तव दुर्लभ दास्यगोडी.॥१२५
पुत्रादिकांचे अनुराग जे कां हे चोरटे नागविताति लोकां ।
ते तोंच कीं जों तव दास्य नाहीं, जे दास त्यांचें हरिती न कांहीं.॥१२६
आयुष्यवेगीं हरिभक्ति जोडी तुटेल त्याची भवबंधबेडी, ।
तो काळ नेतो विषयानुरागें कामादि हे चोर अशा प्रसंगें. ॥ १२७

---

१. गृह. २. अघासुर इत्यादि. ३. राक्षसांस जें दिलें तेंच भक्तांस देणें योग्य नाहीं. ४. या व्रजस्थजनांचें. ५. संसाराची गोडी. ६. वैराग्य, प्रपंचविरक्ति. ७. स्त्रिया. ८. संन्यासी. ९. जेथें हरिभक्ति आहे तेथें गृहदारादिकांची प्रीति बाधक होत नाहीं. १०. जोंपर्यंत हरिभक्ति नाहीं तोंपर्यंत घर, देह, पुत्र, स्त्री, संसारसुख आणि धन हीं बाधक होतात. ११. काजवा. १२. 'तावद्रागादयः स्तेनाः' इत्यादि ३६ वा श्लोक पहा. याचें तात्पर्य:— 'हे कृष्णा! लोक तुझे भक्त झाले नाहींत तोंपर्यंत प्रीति इत्यादि मनोविकार चोर आहेत, गृह हें शुद्ध कारागृह आहे, मोह हा पायांत एक शृंखला आहे. पण भक्तांचे मोहादिविकार ईश्वरविषयक असल्यामुळें ते मोक्षप्रदच असतात. १३. बंदिशाळेसारखीं.

आतां असोनि अनुराग कैलत्रवित्तीं श्रीकृष्णआवडिठसा बसला स्वचित्तीं, ।
प्रेमें स्मरे हरिस चित्त अखंड ज्यांचें पुत्रादिराग हरिती वय कैंचि त्यांचें ? १२८
देहेंकरूनि करितां स्वगृहादिकामें चित्तीं मुकुंद, वदनीं गुणकर्मनामें, ।
पुत्रादिआवडि असोनि यथाप्रकारें त्यांचें वृथा वय न जाय अशा विचारें. १२९
सर्वांहुनीही प्रिय कृष्ण जेव्हां, भक्तीस ये ना व्यभिचार तेव्हां, ।
हे चोरटे यास्तव तोंचि देवा ! कीं जों न लागे तव पादसेवा. ॥ १३०
कारागृहें कैवळ बंदिशाळा, गृहें जनांचीं सुरलोकपाळा, ।
कीं बंदिशाळेंतुनिही पळाले, कोणी गृहें टाकुनियां न गेले. ॥ १३१
दुःखें जरी अनुभवी पुरुष स्वदेहीं, नाहीं जयास सदनीं सुखलेश कांहीं, ।
जाऊं सके न गृह टाकुनियां तथापि, दारिद्य भोगुनि करी बहु पाप पापी. ॥ १३२
कारागृहासम गृहें वरि तोंचि देवा ! कीं जो गृहस्थ न करी तव पादसेवा, ।
जे कां तुतें भजति, मुक्तिपुरी तयांची, होती गृहें स्मरति तूज मनें जयांचीं. ॥ १३३
टाकूनियां गृहधनासि बनासि जावें, निःसंग होउनि रमापतिला भजावें, ।
ऐसा विवेक उपजे न जया मनाला मोहाख्य बंधन असेच तया जनाला. ॥ १३४
हें स्वप्नतुल्य गृहदारसुतादि कांहीं देहावसानसमयीं सह येत नाहीं, ।
ऐसें विवेकमय शस्त्र करूनि बेडी हें मोहलक्षण महाजनही न तोडी. ॥ १३५
हें मोहलक्षण गृहादिक तोंचि बेडी लागे न जों तव पदांबुजयुग्मगोडी ।
टाकूनि सर्व वनिंही तुजला भजावें, तें सर्व तूंचि तरि टाकुनि काय जावें ? ॥ १३६
ऐसें गृहस्थ भजती हरि तूज चित्तें, प्रारब्ध येरिति असोनि कलत्रवित्तें, ।
त्यांला गृहादिक न बाधक होय तैसें, खद्योततेज रविच्या उदयीं न जैसें. ॥ १३७
खद्योततेजहि असे इतरांसि जेव्हां, नाहीं विरुद्ध भजनीं सुजनासि तेव्हां, ।
जें सर्व कर्म हरिआर्पित ज्यां जनांचें नाहीं गृहादिभय त्यांस विरुद्ध कैंचें ? ॥ १३८
कांहींच ज्यांस भजनास विरुद्ध नाहीं, त्यांलागिं तूं सुलभ, हें न विचित्र कांहीं; ।

---

१. बायको व धन यांवर प्रीति. (अनुराग=प्रीति.) २. श्रीकृष्णाच्या गोडीचा ठसा. हा समास चिंतनीय आहे. असे समास या प्रकरणांत अनेक आहेत. ३. पुत्रादिकांच्या प्रीति. ४. वैकुंठनगरी. ५. संसारपरित्याग करून. ६. मोहनामक. ७. अंतकाळसमयीं. ८. सुतावरोबर. ९. तुझ्या चरणकमलद्वयाची रुचि. हा समास चिंतनीय आहे. १०. काजव्याचा प्रकाश. ११. हरीला दिलेलें. हा सामासिक शब्द असून येथें कवीनें संधि केला नाहीं. वामनाच्या कवितेंत आणि विशेषतः या प्रकरणांत अशीं उदाहरणें पुष्कळ आढळतात.

जे सेविती तुजनिमित्त जितां मुकुंदा यांचा तसा तवनिमित्तचि सर्व धंदा. ॥१३९
संन्यासियांहुनिहि या व्रजिच्या जनांला प्रेमा तुझा अधिक लाभ समान झाला, ।
जे त्यांसि मुक्ति हरि यांसहि तेचि देसी उत्तीर्ण केंवि तरि देउनि मुक्ति होसी? १४०
जैसें यतीस भजनप्रतिकूळ कांहीं नाहीं, तसें व्रजजनांसि असोनि नाहीं. ।
प्रेमा यतीहुनिहि ज्यांस विशेष ऐसा उत्तीर्ण मुक्तिफळ देउनि होसि कैसा?॥१४१
श्लोकांत हें पहिलिया वदला विरिंची ऐसें, तथापि परिशंकित बुद्धि त्याची. ।
कीं मुक्तिमात्र यतिला, परि कृष्ण जैसा झाला व्रजीं सुलभ हा न यतीस तैसा.॥
वत्सांसवें हरुनियां व्रजबाळ नेले, त्यांचे पिते सकळही स्वपितेच केले. ।
जे बाळ ते म्हणविले स्वसखे मुकुंदें, होती कृतार्थ न करी मुनिवर्यवृंदें.॥१४३
ज्या गोपिका वडिल त्या जननी स्वभावें, ज्या धाकट्या सहज त्यांस अनंगभावें ।
केलें कृतार्थ, न यतीसहि हो! विरक्तां श्रीकृष्णलाभ सनकादिक जेंवि मुक्तां.॥
उत्तीर्ण काय हरि होइल येरितीनें हें मानिलें हृदयिं भारतिच्या पतीनें, ।
तो आठवूनि अवतारनिमित्त कांहीं बोलेल कीं हरिपदाविण मोक्ष नाहीं.॥१४५
तूं निष्प्रपंच, तुज माय न बाप कांहीं, कोणी सखा न रिपु आणिक मित्र नाहीं. ।
तो तूं असा किमपिही न जरी अपेक्षा भक्तांसि उद्धरिसि केवळ अंबुजाक्षा! ॥
तूं तो अनादिकरुणामृतपूर्ण सिंधू दीनासि उद्धरिसि केवळ दीनबंधू! ।
सर्वांसि तारक कथा तुझिया पवित्रा यालागिं वाढविसि केवळ या चरित्रा.॥१४७
लोकांसि आवडति केवळ लोकरीती रूपें तुझीं तदनुसार कथा करीती. ।
ते लोकरीति चरितें करितां अनंता! संपादिसी जनक आणिक बंधु माता. ॥
कामातुरा प्रिय न बाप न माय कांहीं स्त्रीगोष्टि एक, दुसरें प्रिय त्यासि नाहीं. ।
याकारणें व्रजवधूसुरतादि लीला आरंभुनी निजकथारुचि देसि त्यांला.॥ १४९
तूं निष्प्रपंच परि वाढविसी प्रपंचा, कीं आयकोत जन कर्ण वदोत वाचा. ।

---

१. जिवंत असतां. २. ज्या संन्याशी जनांस जी मुक्ति देतोस तीच या व्रजवासी लोकांस देतोस. ३. त्या विधीची. ४. त्या व्रजबालकांचे पिते हे आपले पितेच केले, कारण कृष्णानें त्या बालकांचें रूप धारण करून त्या पित्यांचे आपण बालक आहों असें दाखविलें. ५. मदनभावानें, रतिलाभ देऊन. ६. 'बोलेल कीं हरिस हा ऋणमोक्ष नाहीं' असाही पाठ आहे. ७. 'प्रपंचं निष्प्रपंचोऽपि' इत्यादि ३७ वा श्लोक पहा. याचा भावार्थ—हे प्रभो! तूं प्रपंचहीन असूनही, ह्या भूतलावर शरण आलेल्या जनसमूहाला विपुल आनंद देण्यासाठीं प्रपंचाचें अनुकरण करीत आहेस. ८. तुझ्या ठिकाणीं प्रपंच मुळींच नाहीं, तुला प्रपंचाची आवश्यकता नाहीं. ९. इच्छा, आशा. १०. हे कमलाक्षा! ११. मदनानें आर्त. ('अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा'—असें सुभाषित प्रसिद्ध आहे.)

जे कां प्रपन्न जन त्यांस सुखें अनंतें संपादिसी, तरि न तो उपकार यांतें. १९०
ऐसें म्हणोनि विधि शंकितचित्त झाला, कीं मी अयुक्त म्हणतां जगदीश्वराला।
उत्तीर्ण हो हरि नहो मज काय झालें मी सापराध पैण होइन याची बोलें. १९१
ऐसेंच कीं हरुनि वत्सपवत्स नेतां, म्यां मानिलें करिल काय म्हणोनि आतां.।
पाहों म्हणोनि मग वैभव तें पहातां, झालें मला कठिण हें स्मृतिही रहातां.॥
ब्रह्मांडकोटि चतुरानन कोटि कोटी देखोनियां मजहि विस्मय थोर पोटीं,।
बोलेल यास्तव विरंचि तुझा पहातां वाटे अगम्य महिमाहि तुझा अनंता! १९३
जाणों तुझा म्हणति जे महिमा, अनंता! जाणोत ते, परि म्हणेन न मी अनंता!।
कायामनेंकरुनि आणिकही स्ववाचें हे पार कीं न कळती तव वैभवाचे.॥ १९४
ऐशा स्तुती करुनियां विनवी विधाता बोलेल, दे मज निरोप म्हणोनि आतां.।
श्लोकामधें दुसरिया प्रणिपात त्या 'हो ब्रह्मा करूनि भुवनाप्रति चालिला' हो!॥
कृष्णा! निरोप मज दे, बहु काय बोलों? अन्यायही करुनि मी कृतकृत्य झालों.।
कीं नाथ एक हरि तूं बुडतां जनांचा हें आजि सत्य कळलेंच, न अन्य साचा.॥
तूं चित्स्वरूप जग आणिक तूजमाजी! हें देखिलें स्वनयनेंचकरून आजी.।
कर्ता स्वयें मजचि मी म्हणवीत होतों, मी आजि किंकर तुझा, स्वगृहासि जातों.॥
श्रीकृष्ण तूं यदुकुळांबुजसूर्य देवा! केलें कुळांस सकळां सुख वासुदेवा!।
गोब्राह्मणादिसुरसागरवृद्धिकारी, चिद्व्योमचंद्र दिससी मजला मुरारी! ॥१९८॥

---

१. शरण आलेले. २. परंतु. ३. ब्रह्मदेव. यास चार मुखें आहेत त्यांचीं नांवें—(१) दर्दुरमुख—यानें ऋग्वेद जपतो; (२) अश्वमुख—यानें यजुर्वेद जपतो; (३) जंबुकमुख—यानें अथर्ववेद जपतो; (४) श्वमुख—यानें सामवेद जपतो. यास पांचवें खरमुख होतें तें छिन्न झालें अशी कथा आहे. ४. अनंतसंख्याक. ५. 'जानंत एव जानंतु' इत्यादि ३८ वा श्लोक पहा. याचा भावार्थ—हे प्रभो! तुला जे पुरुष जाणतात ते जाणोत, परंतु तुझें वैभव माझ्या शरीराला, वाणीला, किंवा मनाला अगदीं समजण्याजोगें नाहीं. ६. वैभव. ७. 'अनुजानीहि मां कृष्ण सर्वं त्वम्' इत्यादि ३९ वा श्लोक पहा. याचा भावार्थ—हे कृष्णा! तूं सर्व जाणतोस, तूं सर्व पाहतोस, तूं सर्व जगतांचा अधिपति, म्हणून हें जग आणि शरीर तुला अर्पिलें आहे. आतां मला जाण्यास अनुज्ञा दे. ८. नमस्कार. ९. होवो. १०. अहो. ११. सेवक. १२. यादवरूप कमलांना आनंददायी सूर्य. १३. 'श्रीकृष्ण वृष्णिकुलपुष्करतोषदायिन्' इत्यादि ४० वा श्लोक पहा. याचा भावार्थ—हे श्रीकृष्णा! तूं यादवकुलरूपी कमळास आनंद देणारा सूर्य, पृथ्वी विप्र देव धेनु यांची वृद्धि करणारा चंद्र, पाखंडधर्मरूपी अंधकाराचा नाश करणारा, पृथ्वीवरील राक्षसांचा द्वेष करणारा शत्रु, सूर्यादिकांस पूज्य, तुला कल्पांतपर्यंत माझे, हे भगवन्! अनंत नमस्कार असोत. १४. गाई, ब्राह्मणादिक, देव यांचा समुदाय हाच सागर, त्याला भरती आणणारा चंद्र. १५. चैतन्यरूप आकाशांतील चंद्र.

श्रीसूर्य तूज उपमा अजि वासुदेवा ! कीं नाशिलें तम अधर्मक देवदेवा ! ।
जे दैत्य राक्षस निशाचर ते दडाले, हे हंस साधु सुखचिद्गगनीं उडाले.॥ १५९

चमत्कारें येथें विधि करि नमस्कार हरिला;
जगाचा मी ब्रह्मा म्हणुनि मनिंचा गर्व हरिला. ।
म्हणे, 'जों कल्पांतप्रळय तुज तों हेंचि नमन,
स्वयें मीही वंद्य प्रभु न करु हें चिंतन मन.' ॥ १६०

नमस्कार आयुष्यपर्यंत ऐसा, जयाचा तया मोह होईल कैसा ? ।
असा काळपर्यंतही वंदनाचा अभिप्राय गंभीर पद्मासनाचा. ॥ १६१
ऐसा नमस्कार करूनि गेला कोणेरिती तें शुक बोलियेला, ।
अंतीं स्तुतीच्या शुकउक्ति आतां श्लोकार्थ तोही वदिजेल संतां.॥ १६२
म्हणे शुकाचार्य असें अनंता प्रार्थूनि तो वंदुनियां विधाता, ।
प्रदक्षिणा तीन करूनि पायीं तो वंदिला मागुति शेषशायी. ॥ १६३
घेऊनि आज्ञा हरिची स्वधामा गेला असा प्रार्थुनि पूर्णकामा; ।
ऐसी शुकें हे स्तुति संपवीली, पुढें कथा येथुनि चालवीली. ॥ १६४

आज्ञा देउनियां विधीस हरिनें तेव्हां गडी आणिले,
जैसे भोजन ते करीत बसले होते तसे मांडिले. ।
वत्सें आणुनि त्या समीप विधिच्या मायाभ्रमें काढिले,
तों वत्सांसह कृष्णनाथवदन प्रेमें तिहीं देखिलें. ॥ १६५

तेव्हां जेउनियां स्वयें मग हरी आला व्रजा जेरिती,
तैसा वामन गोकुळाप्रतिहि तो आला स्वयें श्रीपती. ।
गोशब्दें मतिइंद्रियें व्रजतनू जेथें स्वयें श्रीहरी
नांदे वामन त्याचियाचि चरणीं हे अर्पितो वैखरी. ॥ १६६

---

१. पाखंडधर्मरूपी. २. धुवडासारखे. ३. ब्रह्मदेवाचा. ४. 'इत्यभिष्टूय भूमानम्' इत्यादि ४१ वा श्लोक पहा. याचा भावार्थ—याप्रमाणें ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाची स्तुति करून, त्रिवार प्रदक्षिणा घालून, आणि नमस्कार करून स्वलोकीं प्रयाण केलें. ५. विष्णु. ६. स्वलोकाला. ७. सोबती. (वत्स आणि वत्सप.) ८. गो=इंद्रिय, कुळ=समूह. बुद्धि इत्यादि इंद्रियें त्याप्रत येऊन व्रजरूप गृहांत शिरला. ९. स्तुति, वाणी. (हें 'ब्रह्मस्तुति काव्य'–असा भाव.)

[1]हरिविलास.

अध्याय पहिला.

(श्लोक.)

[2]फणिफणावरि नृत्य करी हरी, प्रकृति जो [3]भवबंध करी [4]हरी, ।
[5]त्रिभुवनीं जनिं काननिं दीसतो स्मर मना! प्रभु [6]यामिनिदीस तो. ॥ १
त्रिभुवनीं [7]जगजीवन दीसतो करि कृपा [8]यमुनाख्यनदीस तो, ।
मथुनियां [9]भुजगा अतिकाळ या दवडुनी [10]खळदुर्मति काळया. ॥ २
तत्पदीं करुनियां नमनातें, तत्कथा [11]सुखनिधान मनातें; ।
वाटतें म्हणुनि वर्णिल वाचा स्वाद [12]कृष्णगुणलेशलवाचा. ॥ ३
ग्रंथ हा 'हरिविलास' म्हणावा प्राकृतांत सहसा न गणावा; ।
गोवळ्यांतहि बसोनि [13]हरी तो सत्कथा करुनि [14]बंध हरीतो. ॥ ४
धेनु चारित उभा गवतांत श्रीहरी म्हणति [15]भागवतांत ।
प्राकृतांतहि [16]अशी शुकवाणी दीसते बरिच कौतुकवाणी. ॥ ५
आत्मा जगज्जीवन वामनाचा जो [17]सोहळा नित्य नवा मनाचा, ।
नामामृतें ग्रंथ [18]कली करीतो नामें जना तारक लोकरी तो. ॥ ६

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाच्या १६ व्या अध्यायास अनुसरून लिहिलें आहे. यमुनेच्या डोहांत सकुटुंब असणाऱ्या कालिय नामक महासर्पाचें कृष्णानें मर्दन केलें, तो शरण आल्यावर त्याला जीवदान दिलें, आणि त्याच्या तीव्र विषानें मृत झालेल्या प्राणिमात्रांस अमृतवृष्टीनें उठविलें, या कथेचें यांत वर्णन आहे म्हणून या काव्यास 'हरिविलास' अथवा 'कालियमर्दन' अशी अन्वर्थक संज्ञा वामनपंडितांनीं दिली आहे. काव्यारंभीं वर्णनीय कथेचा सारांश थोडक्यांत सांगण्याचा वामनाचा परिपाठ आहे त्यास अनुसरून पहिल्या दोन पद्यांत कथाभाग निर्दिष्ट केला आहे. या काव्याचे नऊ 'विलास' म्हणजे भाग असून वामनाच्या रसाळ काव्यांपैकीं हें एक आहे. २. सर्पाच्या फणेवर. ३. संसारबंध. ४. हरण करी. ५. 'त्रिभुवनीं जगजीवन दिसतो' असाही पाठ आहे. ६. रात्रंदिवस. ७. जगताला जीवन म्हणजे आधारभूत असा (कृष्ण). ८. यमुना नामक नदीस. ९. महाभयंकर कालिय नामक सर्पास दवडून यमुनेवर कृपा करी. १०. दुष्ट व दुर्बुद्धि असा काळ्या (कालिय) नामक सर्पास. ११. सुखाचें स्थान. १२. श्रीकृष्णाच्या गुणलेशाच्या लवाचा (अत्यंत अल्प अंशाचा) स्वाद. १३. जसा हरि गवळ्यांत असूनही कथाद्वारा भवबंध हरण करितो, तसा हा 'हरिविलास' ग्रंथ प्राकृतांत असून ही (तसाच नाहीं, तर) भवबंध हरण करण्यास समर्थ आहे असा भाव दिसतो. १४. संसाररूप बेडी. १५. श्रीमद्भागवतपुराणांत. १६. 'असे शुकवाणी; पाहतां बरिच कौतुकवाणी' असाही पाठ आहे. १७. उत्सव, आनंद. १८. हें संस्कृताप्रमाणें 'कलि' शब्दाच्या सप्तमीचें एकवचन. कलौ=कलियुगांत.

सेव्य देव[1]मुनिमानवसंतीं तो वनीं सुखनिधान वसंतीं; ।
क्रीडतां स्वजनसंकट वारी[2] जे[3] पिती सविष दुर्धर वारी[4]. ॥ ७
म्हणुनि दंड उदंड[5] भुजंगमा[6] करुनियां सुख दे स्थिर जंगमा[7]; ।
शुक नृपास[8] वदे चरिता तया हरिकथा असि भागवतांत[9] या. ॥ ८
हार[10] जे रिति धरी भुजगातें वाहतो जलजनाभ[11] जगातें; ।
तो भुजंगमशिरीं[12] नट[13] नाचे ते विलास[14] परिसा[15] नटनाचे[16]. ॥ ९
नाचली फणिफणावर साची कृष्णमूर्ति तइं सौं[17] वरसांची. ।
हे कथा कथितसे शुक राया, लोक तीनहि कृतार्थ कराया. ॥ १०
करी धन्य पायें वना[18] जीवनातें स्मरा रे! स्मरा त्या जगज्जीवनातें. ।
विरिंचादिकीं[19] मंत्र ज्याचा जपावा वनीं वाजवी तो महाराज पांवा[20]. ॥ ११
परिसुनि वनिं गाई नाद त्या पांवयाचा
विचरति[21] समजोनी अंतरीं भाव याचा; ।
हरिगुणगण गाती भोंवत्या गोपजाती[22]
श्रवणपठणमात्रें ज्यांचिया[23] ताप[24] जाती. ॥ १२
एके दिनीं गोप वसंततापें[25] तृषार्त मार्तंडकरप्रतापें[26], ।
पुढें वनीं धुंडिति सर्व पाणी मागूनि ये दूरुनि चक्रपाणी. ॥ १३
ते पावले नंदिस[27] तों ह्रद[28] कालयाचा[29] जेथें निवास भुजगा अतिकाल याचा, ।
ज्याच्या विषें विषम[30] तें ह्रदनीर[31] भारी, प्याले समीप नसतां मधुकैटभारी[32]. ॥ १४
धेनु गोपहि तया जलपानें[33] ज्या विषानळ[34] कढे जल त्यानें; ।
पावले सकलही मरणातें अंतरोनि हरिच्या चरणातें. ॥ १५

१. देव, मुनि, मनुष्य आणि साधुजन यांस पूज्य. २. निवारी. ३. जे स्वजन. ४. जल. ५. पुष्कळ, मोठा. ६. वक्रगतीनें जाणारा जो भुजंगम (साप). ७. चराचर जीवांस. ८. परीक्षितीस. ९. श्रीमद्भागवतांत. १०. ज्याप्रमाणें हार (पुष्पमाला) हातांत धरतात त्याप्रमाणें जो सापातें धरी. ११. कमलनाभ. १२. कालियसर्पाच्या मस्तकावर. १३. नटासारखा नाचे. १४. क्रीडा. १५. ऐका. १६. नर्तनाचे, नाचण्याचे. १७. सहा वर्षांची. १८. अरण्याला व उदकाला. १९. ब्रह्मादि देवांनीं. २०. मुरली. २१. फिरतात. २२. गवळ्यांची मंडळी, जात. २३. ज्या गुणांच्या श्रवणानें व पठनानें. २४. संसारांतील दुःखें. २५. वसंतऋतूच्या उष्णतेनें. २६. मार्तंडाच्या (सूर्याच्या) किरणांच्या उष्णतेनें. २७. यमुनेस. २८. डोह. २९. कालिय नामक सर्पाचा. ३०. असह्य. ३१. डोहाचें पाणी. ३२. मधु व कैटभ या दैत्यांचा अरि (कृष्ण). ३३. उदकप्राशनानें. ३४. त्या सर्पाचा विषाग्नि इतका प्रखर होता कीं यमुनेच्या पाण्यास कढ येई आणि आसपास आकाशांत उडून जाणारे पक्षी होरपळून पाण्यांत पडत.

पावला इलुकियांत हरी तो जो स्वकीयजनमृत्यु हरीतो; ।
त्याचिया करिति जे स्मरणातें होति ते वश कसे मरणातें ? ॥ १६

आपणाविण अनाथ असे जे काळनिद्रित धरातळसेजे, ।
त्या कृपेकरुनियां अवलोकी, जन्ममृत्यु हरि जो तिहिं लोकीं. ॥ १७

काळसर्पविषपानमृतातें जीववी स्वनयनें, अमृतातें, ।
वर्षतां, पशुप धेनु अशेषें ऊठती खडबडूनि विशेषें. ॥ १८

मग उठूनि परस्पर पाहती, पशुप विस्मित होउनि राहती, ।
विष पिऊनि मरोनि कसे रिती म्हणति जीवन हेंचि विचारिती. ॥ १९

जो जगीं स्वजनमृत्यु हरीतो, आठवे अवधियांस हरी तो. ।
जीववी निजकृपाअवलोकीं कोण त्याविण दुजा तिहिंलोकीं ? ॥ २०

गोविंदामृतदृष्टिवृष्टि करितां आतां मरोनी जितो,
की चित्तास सचेतना. स्मृतिपणें देहादिकां योजितो. ।
जे मेले गरळानळेंकरुनियां ते ऊठले हें खरें,
केलें हें हरिनेंचि या अवधियां देवांचिया शेखरें. ॥ २१

पशुप आणि पशू विषजीवनें मरति त्यांसहि दे हरि जीवनें. ।
दवडि तेथुनि दुष्टभुजंगमा, परम बाधक जो स्थिरजंगमा. ॥ २२

छाया जियेच्या उदकास काळी केलें तिये शुद्ध, तयाचि काळीं. ।
श्रीइंद्रनीलद्युति काळियानें कृष्णेंचि जे दूषित काळियानें. ॥ २३

श्रीकृष्ण काळा, यमुनाहि काळी, दंडूनि काळाफणि तेचिकाळीं; ।
कालिंदिचें जीवन शुद्ध केलें कथामृताला जग हें भुकेलें. ॥ २४

---

१. मृत्यूनें पृथ्वीतलरूप शयनावर निजलेले. २. मृत्युप्रद सर्पाच्या विषाच्या प्राशनानें मरण पावलेल्यांस. ३. सुधेची वृष्टि करीत असतां. ४. गोपाळ. ५. सगळे. ६. प्राणसंरक्षण. ७. हरण करतो. ८. हा सामासिक शब्द असून येथें कवीनें संधि केला नाहीं. वामनाच्या काव्यांत अशा प्रकारचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. ९. जिवंत होतो. १०. विषाग्नीनें. ११. शिरोभूषणानें, श्रेष्ठानें. १२. विषोदकानें. १३. प्राण, जीवित. १४. दुष्टसर्प कालिया. १५. पीडा करणारा. १६. चराचराला. १७. ज्या कालिंदी नदीच्या. १८. काळ्या रंगाची. १९. त्या समयींच. २०. या श्लोकाचा अन्वय— जियेच्या (ज्या यमुनेच्या) उदकास छाया (कांति) काळी, जे काळियानें (सर्पानें) दूषित, तिये (त्या नदीला) तयाचि काळीं (समयीं) इंद्रनीलद्युति (इंद्रनील मण्यासारखी ज्याची कांति त्यानें) काळियानें (कृष्णवर्णानें) कृष्णेंच शुद्ध केलें. २१. काळिया. २२. 'कथानुधेला' असा पाठभेद आहे.

तिघां कृष्णरूपें, तिघां कृष्णवर्णें, तिघांलागिं कृष्णाख्य दोंदोंचि वर्णें, ।
पुराणीं वदे श्रीशुक श्लोक रीया पुढें ग्रंथविस्तार याचा कराया. ॥ २५

कृष्णरूपचि जया जग सारें, कृष्ण त्यास मग सार असारें; ।
कृष्णवर्णेहि तिघां सविशेषीं कृष्ण शब्द अतएव विशेषीं. ॥ २६

कृष्णनीर, यमुना अतिकृष्णा, तींत कृष्णफणि देखुनि, कृष्णा ।
ये कृपा, करि सुधा यमुनेला सागराप्रति तिचा यमु नेला. ॥ २७

सुधासिंधुचा बिंदु हा एक कानें नृपें घेतला वर्णितां श्रीशुकानें, ।
करीतो पुढें प्रश्न राजा मुनीला स्मरोनी इंदंभोरुहीं मेघनीला. ॥ २८

'कसें मर्दिलें काळियातें स्ववाचा वदावें' म्हणे पौत्र तो पांडवाचा, ।
'अजी ! श्रीशुकाचार्य ! तें खोलपाणी, धरी त्यांत सर्पा कसा चक्रपाणी ? २९

युगें बहू त्या उदकाचिमाजी कां लोटलीं सांग भुजंगमा जीं? ।
कृष्णें तयां जीवविलें मृतांतें पुढें वदावें चरितामृतातें. ॥ ३०

अजी कृष्णें कृष्णेमधिल फणि काळा दवडिला,
कथेचा जो भाग त्वरितचि तुम्हीं हा निवडिला. ।
परंतु श्रीकांतें परम भगवंतें निजमुखें
चरित्रें जीं केलीं अमृत तुमच्या वाटति मुखें. ॥ ३१

---

१. कृष्ण, कालिंदी व कालिय या तिघांच्याही नांवांत 'काळा' या अर्थाचे दोनच वर्ण (अक्षरें) आहेत. कृष्ण काळा, कालिंदी काळी आणि कालियही काळा—असें तात्पर्य. २. श्रीमद्भागवतांत. ३. 'विलोकय दूषितां कृष्णां कृष्णः कृष्णाहिना विभुः' इत्यादि १६ व्या अध्यायाचा पहिला श्लोक. यमुनानदी कृष्णसर्पानें (कालियानें) दूषित केली असें पाहून कृष्णानें तिला स्वच्छ करण्याच्या इच्छेनें त्या सर्पाला तेथून काढून लाविलें—असें या श्लोकाचें तात्पर्य आहे. ४. परीक्षित् राजाला. ५. साररहित. ६. काळें पाणी. ७. अत्यंत काळी. ८. कालिय सर्प. ९. श्रीकृष्णाला. १०. यमुनेचें जळ सुधेप्रमाणें (अमृताप्रमाणें) मधुर केलें. ११. मृत्यु. १२. कानें कथामृताचा बिंदु (अल्पकथा) घेऊन परीक्षित राजानें शुकाचार्यास प्रश्न केला. १३. हृत्कमळीं. (पाण्यांत उद्भवणारें जें कमळ तें अंभोरुह.) १४. मेघासारख्या नीलवर्ण कृष्णाला श्यामसुंदर कृष्णाचें स्मरण करून. १५. पुत्राचा पुत्र. पांडवांचा पौत्र म्हणजे अर्जुनपुत्र अभिमन्यु त्याचा मुलगा परीक्षित राजा. १६. अहो. १७. श्रीकृष्ण (पृष्ठ ३१७ टीप ३ पहा.) १८. मृत झालेल्या गोगोपाळांस. १९. यमुनानदींतील. २०. कालियसर्प. २१. श्रीकृष्णानें. २२. श्रीकृष्णचरित्रें तुमच्या मुखानें श्रवण केलीं असतां तीं अमृतरसासारखीं मधुर वाटतात. (अध्याय १६ श्लोक २-३ पहा.)

रमा ब्रह्मा शंभू त्रिभुवनपतीसेव्यचरणें,
स्वतंत्रें गोपत्वें[1] धरणिवरि याचें विचरणें[2], ।
अजी! मानीं तृप्ती श्रवण करितां त्यासि कवणें
त्रिलोकीं क्षेमार्थ[3] त्रिभुवनपतीचें मिरवणें. ॥ ३२

प्रश्न हा परिसतां शुकयोगी, श्रोतयां त्रिभुवनीं उपयोगी, ।
वाटलें सुख बहूत कृपाळा बोलतो हरिचरित्र नृपाळा. ॥ ३३

सांगे कथा शुक भवांबुधित्तें[4] तराया, कीं कालियान्हदिं[5] असे यमुनेंत, राया, ।
जैसें कढैंत[6] कढतें जळ अग्नितापें तैसें न्हदोदक[7] भुजंगविषप्रतापें[8]. ॥ ३४

ऊसळे सळसळां जळ डोहीं ज्यावरी खेग[9] शके न उडोंहीं; ।
अंतरिक्षगत[10] पक्षि जळोनीं लक्ष[11] लक्ष पडताति गळोनी. ॥ ३५

काळिया तरि जळांतचि आहे, जाय दूरि गरळानळ[12] आहे. ।
उष्णवारि[13] विषवायु नभाला व्यापितां न उडवे शैलभाला[14]. ॥ ३६

व्यापुनी विष असे गगनाशी[15] त्यामधीं उडति ते खग नाशी, ।
आग त्यावरिलिया पवनाची रखि[16] ते करि समीप वनाची. ॥ ३७

ह्रदीं ज्या जळाच्या विषाच्या तरंगीं[17] फिरे वायु येऊनि तो अंतरंगीं[18], ।
करी स्पर्श ज्याला तयाचा कणाचा[19] हरी प्राण तो प्राणियांचा गणाचा[20].॥ ३८

चंड[21] वेग विषविक्रम[22] ज्याचा शेषवासुकिचिया अनुजाचा[23] ।
त्या खळासि खळमर्दन[24] पाहे दंडही करि तथाहि[25] कृपा हे. ॥ ३९

जीवनांत[26] जगजीवन नाहीं देखिली असि विषें यमुना ही, ।
दंड जो करिल दुष्टमतीतें[27] तोचि केवळ अनुग्रह[28] तीतें. ॥ ४०

---

१. गोपाच्या रूपानें. २. भ्रमण, फिरणें. ३. कल्याण करण्यासाठीं. ४. संसाररूप सागर तरून जाण्यासाठीं. ५. यमुनेच्या डोहांत. (श्लोक ४.) ६. कढईंत. ७. डोहांतील पाणी. ८. सर्पाच्या विषाच्या प्रभावानें. ९. पक्षी. १०. आकाशामधून उडून जाणारे. ११. 'लक्ष' याचा अर्थ नक्की 'लक्ष' असा नसून 'बहुत' असा आहे. हा अर्थ निरूढलक्षणेनें झालेला आहे. १२. विषरूप अग्नीची ज्वाला. आहे=ज्वाला. १३. तापलेलें वारि (उदक). १४. डोंगराला. १५. गगनाला (आकाशाला) व्यापून विष असे. १६. रक्षा=राख, राखाडी. १७. लाटांवरून, ज्या विषमय जळाच्या लाटांवरून. १८. अंतःप्रदेशांत. १९. त्या जेंळाच्या कणाचा (अंशाचा). २०. समुदायाचा. (श्लोक ५ पहा.) २१. 'तं चंडवेगविषवीर्यमवेक्ष्य तेन' इत्यादि ६ वा श्लोक पहा. २२. ज्या विषाच्या प्रसाराचा वेग तीव्र आहे. २३. जो कालिय शेषवासुकीचा धाकटा भाऊच. २४. कृष्ण (दुष्टांचा शासनकर्ता). २५. कालियाला शासन केलें तथापि त्याजवर कृपाच केली. २६. जळांत. २७. दुष्टबुद्धि कालियाला. २८. सर्पास जो दंड तो त्या यमुनेवर अनुग्रहच होय. अनुग्रह=कृपा, प्रसाद.

इच्छिला नदिं अनुग्रह, राया! या [1]मिसें भुजगगर्व हराया, ।
थोर एकचि [2]कदंब तटाकीं त्यावरूनि उडि अच्युत टाकी. ॥ ४१
जाळणार विष [3]जीवकदंब, जाळवे न तरु तोचि कदंब, ।
त्यावरी [4]अमृतबिंदु गळाला, जाळवे न तरु तोचि खळाला. ॥ ४२
ने जईं [5]विहंगराज सुधेतें, पावला गरुड या [6]वसुधेतें, ।
त्या तरुवरि तईं बसला, हो! घे तईं द्रुम [7]सुधारसलाहो, ॥ ४३
हरि चढोनि तयाच तरुवरी [8]रशना वसनासह सांवरी, ।
कसुनि [9]कास कसी [10]कनकांबरें दृढ करी [11]कटिसूत्र [12]कटीं बरें. ॥ ४४
प्रचंड डावा भुजदंड भारी [13]सव्यें करें वाजवि [14]कैठभारी, ।
गर्जोनि वृक्षावरि त्या तटाकीं उडी विषाच्या [15]सलिलांत टाकी. ॥ ४५
कढे आधीं पाणी, [16]रथचरणपाणी वरुनियां
उडी टाकी हाकेसरसि उदकीं सांवरुनियां, ।
भुजंगाचा डोहो गहनहि अहो! तो [17]खळबळी,
वसे जेथें सर्प स्वगृह करुनीयां [18]खळ [19]बळी. ॥ ४६
पाणी [20]धनुःशत उचंबळलें ऱ्हदाचें, ज्यामाजि तें विषचि तुंबळ [21]दुर्हृदाचें ।
[22]कल्लोळलोळ भयकारक ये तटाका, । आश्चर्य हें जरि गमेल मनांत [23]टाका.॥ ४७
कीं अनंतबल ज्या प्रबलाचें काय हो! नवल याच बलाचें ? ।
हें चरित्र सुरमानव तारी वर्णिजे म्हणुनियां अवतारीं. ॥ ४८
'अमृत[24]हरिविलासीं' श्रीहरी हा [25]विलसे,
प्रथम '[26]हरिविलासें' तूंचि म्यां सेविलासे, ।

---

१. निमित्तानें. २. हा कळंबाचा वृक्ष कालिय-ह्रदाच्या तीरावर असूनही विषाग्नीनें शुष्क झाला नव्हता, याला कृष्णपादस्पर्श व्हावा असें याचें भाग्य होतें, अथवा अमृतकलश घेऊन गरुड चालला असतां यावर बसला होता, यामुळें तो वृक्ष दग्ध झाला नाहीं, अशी कथा आहे. ३. प्राणिसमुदायाला. ४. अमृताचा थेंब. ५. गरुड. ६. या प्रदेशाला. ७. तेव्हां या द्रुमानें (कदंबानें) सुधारसाचा लाभ घेतला. ८. आपला कमरपट्टा. ९. कमर बांधून. १०. पीतांबर. ११. कडदोरा. १२. कमरेवर. १३. डाव्या हातानें भुज थापटून उडी टाकी. १४. कैटभ=मधुदैत्याचा अनुज, त्याचा अरि=शत्रु (कृष्ण). १५. पाण्यांत. १६. चक्रपाणी (रथाचा चरण म्हणजे चक्र, तें ज्याच्या हातांत तो, कृष्ण.) १७. खळबळ वाढूं लागला. १८. दुष्ट. १९. बलिष्ठ. २०. शंभर धनुष्यें उंच त्या डोहाचें पाणी उसळलें. २१. दुष्टहृदय कालियाचें. (दुर्हृद=शत्रु, दुर्हृदय=दुष्टमानस पुरुष; तसेंच सुहृत्=मित्र, सुहृदय=शोभनमानस पुरुष.) २२. लाटांचे लोळ. २३. टाकून द्या. २४. 'अमृतहरिविलास' हें या पहिल्या अध्यायाचें (विलासाचें) नांव असावें असें दिसतें. 'अमृतहरिविलास' नामक काव्यांत. २५. शोभे. २६. 'हरिविलास' नामक काव्यद्वारा.

कथिसि निजचरित्रा तूंचि हे वामनाला
श्रम परिहरुनी दे नित्य हेवा मनाला. ॥ ४९

अध्याय दुसरा.

(श्लोक.)

न्हदीं उडी घालुनियां निघाला, आला खळाच्या छेदनास धाला, ।
'विलास' येथूनि दुजा हरी तो करी, खळाचा मद जो हरीतो. ॥ १
खेळे जळीं त्या खेळदंडपाणी, विदारिती श्रीभुजदंड पाणी ।
जळांत हस्ती करि विक्रमातें, दावी तसा श्रीहरि विक्रमातें. ॥ २
आफळी न्हदजळीं भुजदंड, त्रास तो करि खळास उदंड[11]. ।
घोर्ष[12] तो परमदुःसह मानी, कालिया विषमदें अभिमानी. ॥ ३
कर्णहीन नयनीं[13] ध्वनि घेतो, क्रुद्ध होउनि भुजंग निघे तो, ।
देखिला ढेवळि जो स्वजळाला, देखतांच हृदयांत जळाला[15]. ॥ ४
देखिलें नयनिं नंदकुमारा, श्यामसुंदरवरा सुकुमारा, ।
मंद हास्य अतिरम्य मुखाचें दाखवी स्वमुख नित्य सुखाचें. ॥ ५
जैं[16] ये न कोणे उपमेसमान, नानातपीं जेथ रमेस मान, ।
श्रीवत्स ऐसा हृदयांबुजांत दयार्णवीं एक दयांबु जांत. ॥ ६
हरी[18] तेज सौंदर्य पद्मोदराचें[19], असें श्रीपदद्वंद्व दामोदराचें[20], ।
न रूपास ज्या साम्य वेदीं पुराणीं[21] पहातां पुरेना जयाची शिरोणी[22]. ॥ ७

---

१. इच्छा. २. बरावर. ३. दरवडा. ४. खेळ. ५. खळास दंड करण्यास योग्य असे पाणी (हात) ज्याचे तो. (श्रीकृष्ण.) ६. कृष्णबाहुदंड. ७. लीला. ८. जळांत हत्ती ज्याप्रमाणें शुंडादंडानें लीला करतो तसा कृष्ण भुजदंडानें पराक्रम दाखवी. (श्लोक ८ पहा.) ९. डोहाच्या पाण्यांत कृष्णानें हात आपटले. १०. सापाला. ११. मोठा. १२. आवाज. १३. सापास कान नाहींत म्हणून तो नयनानें (डोळ्यानें) ऐकतो. 'चक्षुःश्रवा' (चक्षु=नयन हेच ज्याचें श्रव=कान तो–डोळ्यानें ऐकणारा) असें नांव सापास 'अमरकोशां'त आहे. १४. हालवी. १५. रागानें संतप्त झाला. १६. जें हृदयांबुज=हृदयकमळ. १७. ज्या हृदयांबुजांत रमेस (लक्ष्मीला) अनेक तपें केल्यानें मान मिळतो. १८. हरण करी. १९. पद्माच्या (कमळाच्या) उदराचें (अंतर्भागाचें). २०. कृष्णाचें चरणयुगुल. (श्लोक ९ पहा.) २१. पृष्ठ २९४ टीप १९ पहा. ("पुराण' म्हणजे 'प्राचीन, जुना' असा मूळचा अर्थ असून विशेषण आहे. पुढें 'पुराण' हें नाम झालें. ज्या ग्रंथांत प्राचीन धर्मकथा आचारविचार इत्यादि विषय आहेत त्यांस 'पुराणें' असें म्हणूं लागले. पुराणग्रंथ वाचून जो आपली उपजीविका करतो त्याला 'पुराणिक' असें म्हणतात. कालांतरानें विशेषणें नामें होतात, असा नियम अनेक भाषांत आढळतो.) २२. आवड, कौतुक.

खेळे जळीं तो खळगर्वहंता[1] हरावया जी फणिची अहंता[2], ।
ज्यावीण कोणी खमदा न वारी[3] तो देखिला येरिति दानवारी[4]. ॥ ८
देखोनि तो क्रुद्ध फणींद्र[5] झाला, धांवोनियां श्रीगरुडध्वजाला[6] ।
मर्मस्थळीं दंश करूनि दांतें दावी बळें विक्रमसंपदा[7] तें. ॥ ९
स्वसर्पदेहें मग कृष्णजीची श्रीमूर्ति[8], सत्कीर्ति पवित्र जीची, ।
अनंतकल्याणगुणावतारी[9] आच्छादिली, जे भुवनासि तारी. ॥ १०
लोकरीति जगदीश्वर दावी ते अपूर्व म्हणऊनि वदावी, ।
हें न जाणत जन व्रजवासी[10]. दुःख शोक करितील जिवासीं. ॥ ११
त्यामाजि जे संनिध गोप जाती, गाई गुरें दुःखपथासि जाती, ।
तीरीं समस्तांसहि कृष्ण आधी[11] झाली, वदे श्रीशुक तेंचि आधीं.॥ १२
भुजंगें हरी वेष्टिला सर्व देहीं, न हाले न चाले न कांहीं वदेही, ।
असें देखती सर्व[12] मूर्छेस जाती महादुःखशोकें भयें गोपजाती[13]. ॥ १३
ज्यां लाभ हा ते प्रियपूर्णकाम[14] ज्याचा पदीं देहकलत्रकाम[15], ।
समर्पिलें येरिति त्या अजाला[16] देखोनि त्यातें बहु शोक झाला. ॥ १४
मूर्छा विमानीं गगनीं सुरांला, आक्रांत गोई[17] वृषवासुरांला. ।
आक्रंदती[18] मांडिति रूदनातें देखोनि ऐसें मधुसूदनातें ॥ १५
कृष्णाकडे अर्पुनि लोचनातें[19] भयें पहाती भयमोचनातें[20], ।
स्वशोक यांला बहु तीव्र झाला, दावी महोत्पात[21] अति व्रजाला. ॥ १६
उत्पातधाकें यमुनातटातें यावें पहावें निजसंकटातें, ।
व्रजीं अरिष्टें म्हणवूनि दावी[22], कथा असी येरितिनें वदावी. ॥ १७

---

१. कृष्ण. (दुष्टांच्या गर्वाचा नाश करणारा.) २. गर्व. ३. निवारण करी. ४. दानवांचा शत्रु (कृष्ण). ५ नागेंद्र. (कालिय.) ६. कृष्णाला. ७. मोठ्या पराक्रमातें. ८. या श्लोकाचा अन्वयः—मग जीची सत्कीर्ति पवित्र, जे (श्रीमूर्ति) अनंतकल्याणगुणावतारी, [व] जे भुवनासि तारी [अशी ते] कृष्णजीची श्रीमूर्ति स्वसर्पदेहें [त्या कालियानें] आच्छादिली. ९. अनंत आणि कल्याणकारक अशा गुणांनीं अवतार पावणारी. १०. गोकुळवासी. (श्लोक १० पहा.) ११. व्याधि, दुःख. १२. त्या कृष्णाचे सर्व प्रिय गोपाळ. १३. गोपसमुदाय. १४. ज्या [गोपांला] हा (कृष्ण) लाभ (लब्ध होय) ते प्रियपूर्णकाम [होत], ज्यांची आवडती इच्छा परिपूर्ण झाली असें जे ते. १५. शरीर स्त्रिया आणि कामना ज्याच्या पदीं समर्पिल्या आहेत त्यांनीं. १६. जन्मरहित श्रीकृष्णाला. १७. बैलांस. १८. श्लोक ११ पहा. १९. नयनातें. २०. भयापासून मोचन करणारा कृष्ण त्यातें. २१. गोकुळांत मोठे अनर्थ होतील अशीं दुश्चिन्हें झालीं. २२. आपलें संकट गोपांनीं येऊन पहावें म्हणून गोकुळांत कृष्णानें उत्पात उत्पन्न केले.

वृत्तांत ऐसा यमुनेस झाला, तों सूटला त्रास महा व्रजाला; ।
कांपे धरा[1], वर्षति[2] तीव्र तारा[3], देखोनि गांवांत निघे न वारा. ॥ १८
बहु अकाळ विजा पडती क्षिती, लवति लोचन[4] ते भय लक्षिती. ।
अतिसमीप अनर्थ गमे मना, 'हरि असो सुखि' हे मनकामना[5]. ॥ १९
नभीं उल्कापात[6] क्षितिवरिहि उत्पात[7] दिसती,
हरी कोठें आहे? म्हणुनि जन अन्योन्य[8] पुसती. ।
'हरी गेला राना त्यजुनि बलरामास सदनीं[9]'
असें हें जाणोनि वदति अतिदुःशब्द वदनीं. ॥ २०
न बळरामहि आजि[10] अजी! वनीं म्हणुनि निश्चय कृष्ण अजीवनीं[11], ।
करिति धैर्यहि जाय गळोनियां, प्रभुमहत्व[12] तयां न कळोनियां. ॥ २१
हरी चित्त वित्त[13] प्रिय प्राण ज्यांचा, न सोसे वियोगाग्नि[14] पादांबुजाचा, ।
न उल्लंघवे दुःखशोकार्णवातें[15], उडे धैर्य जैसीं तृणें जीर्ण वातें[16]. ॥ २२
हरीच्या वियोगाचि सीमा न साहे, व्यथा प्राप्त सर्वांचिया मानसा[17] हे ।
वियोगानळें[18] जाळिता काळजाला[19] जगाच्या लयाचा[20] गमे काळ जाला.॥ २३
धरूनी मनीं सर्व या काळजीला निघाले पहायास गोपाळजीला, ।
सवें चालिली बाळवृद्धादिसेना हरीवीण जीवित्वें[21] कोणा दिसेना. ॥ २४
परम वृद्ध बहू लवले[22] कटीं धरुनि यष्टि[23] करीं अतिसंकटीं; ।
त्वरित चालति बाळहि रांगती हरिचिया सुपथीं सकळां गती. ॥ २५
ज्यांसि नित्य हरिदर्शनबोढें[24] चालिल्या तरुण आणि नवोढा[25]. ।
[26]अंतरीं धरुनि दैत्यंजनारी[27] चालिल्या वडिलही व्रजनारी. ॥ २६

---

१. पृथ्वी. भूकंप झाला. २. उल्कापात झाले. ३. वारा सुद्धां हालला नाहीं, गोकुळ स्तिमित आणि अचेतन होऊन गेलें—असा भावार्थ. ४. स्त्रियांचे वामनेत्र आणि पुरुषांचा दक्षिणनेत्र लवणें हें अशुभसूचक होय, असें सामुद्रिकशास्त्रांत आहे. ५. मनाची इच्छा. ६. आकाशांतून अग्निरूप जो तारा पडतो त्याला 'उल्का' असें म्हणतात, त्यांचें पतन हें दुश्चिन्ह समजतात. ७. अशुभ चिन्हें. ८. परस्परांस. ९. घरांत. (श्लोक १३ पहा.) १०. आज. ११. मृत्युमध्यें. कृष्ण मरण पावला असावा असा त्यांनीं निश्चय केला. (श्लोक १४ पहा.) १२. कृष्णाचा प्रभाव. १३. हरि हाच केवळ ज्यांचें मन, धन, आणि प्रियप्राण होय. १४. ज्याच्या चरणकमलाचा वियोगरूप अग्नि न सोसे. १५.सागरातें. १६.वायूनें, वाऱ्यानें जसें सुकलेलें गवत उडतें तसें त्यांचें धैर्य उडून गेलें. १७.चित्ताला. १८. विरहाग्नीनें. १९. हृदयाला. २०. नाश, अंत. २१. प्राण. २२. कंबर मोडलेले वयोवृद्ध लोक. २३. काठी. २४. बळकट इच्छा. २५. वधू. २६. मनांत. २७. दैत्यजनांचा शत्रु (कृष्ण).

‘स्वयें काळ जो मृत्युकाळादि कांहीं नसे [1]त्रास त्या श्रीहरीलागिं कां हीं,’ ।
असें [2]राम जाणुनि त्यांतें निवारी, म्हणे, ‘यांस नेतो स्वयें दानवारी.’॥ २७
जाणोनियां [3]येरिति कृष्णभावा, जो जाणताहे [4]अनुजप्रभावा, ।
म्हणे, ‘हरी प्रेरुनी ने जयांला मी कां निवारूं सकळां तयांला ?’॥ २८
दुःख तें करुनि तीव्र जिवासी चालिले सकळही व्रजवासी. ।
[5]रज्जुकृष्णभवसर्प हरीतो धुंडिती सकळ गोप हरी तो. ॥ २९
[6]चैतन्यरज्जुभुजग स्थिरजंगमाचा त्यालागिं [7]आवरण देह भुजंगमाचा ।
गोपाळ धुंडिति तया निजदेवराया [8]साकार जो चरण त्यांसहि दे [9]वराया.॥ ३०
म्हणुनि शुक म्हणे कीं आइकें गा ! नृपाळा !
[10]पशुप [11]निगमरीती धुंडिती त्या कृपाळा, ।
हरिचरणरजातें लक्षुनी गोपजाती
सकळहि यमुनेच्या जे तटाकास जाती. ॥ ३१
सुरवर धरि [12]माथां शंभु[13]पादांबु ज्याचें,
क्षिति [14]विभव जयाच्या दिव्यपादांबुजातें, ।
[15]धरणिवरि तयांच्या लक्षितां [16]लक्षणातें
परि न [17]लविति कोठें ते सुशील क्षणातें. ॥ ३२
[18]जलज वज्र यवांकुश देखिले ध्वज मनोहर सुंदर रेखिले, ।
[19]उमगलीं धरणीतळमंडनें, [20]हरिपदांबुरुहें [21]भवखंडनें. ॥ ३३

---

१. भय. २. बलराम. (श्लोक १६ पहा.) ३. कृष्ण स्वतःच या लोकांस नेतो असें जाणून. ४. कृष्णाच्या सामर्थ्यास. ५. कृष्ण हाच रज्जु (दोरी) त्याजवर झालेला संसाररूप सर्प (जो हरण करतो). ६. चैतन्यरूप (कृष्णरूप) रज्जूचे ठायीं सर्पाप्रमाणें भासमान असा स्थिरजंगम संसार. ७. वेष्टण. ८. आकार (रूप) धारण करून. ९. सेवा करायास. १०. गोपाळ. ११. वेदांप्रमाणें. (वेद परमात्म्याचा शोध करतात, त्याच्या स्वरूपाचा शोध करतात त्याप्रमाणें.) १२. मस्तक=माथा. संस्कृत शब्दांतील ‘स्त’ या जोडाक्षरास मराठींत बहुधा ‘थ’ आदेश होतो–जसें पुस्तक=पोथी, स्तन=थान, प्रस्तर=पाथर, मुस्ता=मोथा, आस्तरण=आथरणें, स्तंभन=थांबणें, स्तर=थर, स्तोक=थोकडें, थोडकें. १३. पादोदक. १४. वैभव, ऐश्वर्य. १५. पृथ्वीवर. १६. चिन्हांतें. १७. लाविती; ते क्षणभरसुद्धां (उशीर) लावीत नाहींत. १८. कमल. १९. कमळ वज्र, अंकुश इत्यादि पादावरील चिन्हें धुळींत उमटलेलीं त्यांनीं पाहिलीं (श्लोक १७ पहा.) २०. हरिपादकमळें. २१. संसाराचा नाश करणारीं (पदांबुरुहें.)

[1]अमितगोपदअंकितवाट ते [2]श्रुतिपथोपम जी मज वाटते, ।
[3]श्रुतिपथीं हरिचें पद धुंडणें तसि पदें प्रभुचीं [4]क्षितिमंडणें. ॥ ३४
गो[5]शब्द येथें [6]श्रुति सूचवीतो, दावी रसीं श्रीशुकजी चवी तो, ।
जे गो[7]पदीं पाय रमापतीचे सद्रूप ते अर्थ तया श्रुतीचे. ॥ ३५

असा तो गो[8]मार्ग श्रुतिपथ जसे कां नि[9]गम ते,
अनात्मत्व त्यागें वदति निज जे [10]वस्तु गमते, ।
[11]तसें गोपालांघ्री त्यजुनि नयनीं वि[12]श्वगुरुचीं,
पदें तीं पाहाती [13]स्वजन मनिच्या कल्पतरुचीं. ॥ ३६

आत्मता कथुनि ही [14]प्रतिकोशीं वे[15]दकोश दुसरा उपदेशी, ।
[16]ब्रह्मपुच्छ म्हणते श्रुति जेथें आत्मता नि[17]खिलें केवळ तेथें. ॥ ३७
ब्रह्म तें म्हणति जें श्रुति पुच्छ, ज्ञानमात्र जड जावरि तुच्छ; ।
[18]रज्जुही वरि मृषा फणि जैसा, काळिया [19]हरितनूवरि तैसा. ॥ ३८
अहो! [20]पुच्छ तें काळियानें स्वपुच्छें दिसेना असें वेष्टिलें कृष्ण तुच्छें. ।
असे त्या भुजंगामधें हार जैसा हरी काळियाच्या शरीरांत तैसा. ॥ ३९
भुजंगें असें वेष्टिलें त्या हरीतें, [21]अविद्यादिकां ज्ञान ज्याचें हरीतें, ।
करी कर्म तो लोक जैसें करीती पुढें दावितो येथुनी लोकरीती. ॥ ४०
पावले नदितटा व्रजवासी, सर्वही धरुनि तीव्र [22]जेवासी; ।
[23]रज्जु जो भवभुजंग हरीतो देखिला [24]भुजगबंध हरी तो. ॥ ४१

---

१. असंख्य गोगोपाळांच्या पावलांनीं चिन्हित अशी वाट. २. वेदमार्गतुल्य. (वेदांतून जसा हरि शोधून काढावयाचा असतो तसा हरिपदनिक्षेप अनेक पदपंक्तींतून शोधून काढावयाचा.) ३. वेदमार्गांत. ४. भूमीला भूषण देणारीं. ५. गोशब्द=गो म्हणजे वाणी. ६. गोशब्दावरून येथें श्रुतिमार्गांतील हरीचें पद असा अर्थ समजावयाचा. ७. गाईच्या उमटलेल्या पावलांत जसें हरिपद शोधून काढावयाचें तसें श्रुतींत हरिपद म्हणजे ब्रह्म शोधून काढावयाचें. श्रुतीचे अर्थही त्याच प्रकारचे होत. ८. गोगोपचरणांकित मार्ग हाच श्रुतिमार्गासारखा होय. परब्रह्म कोणचें हें जसें निगम (वेद) पाहतात, तसें गोकुळवासी जन हरिपदपंक्ति पाहतात. ९. वेद. १०. ब्रह्म. ११. 'तसे गोपाळांचे सजुनि पद जे विश्वगुरुचीं' असाहि पाठ आहे. १२. विश्वाचा स्वामी कृष्ण त्याचीं. १३. स्वभक्ताच्या मनांतील कल्पवृक्षाची (कृष्णाची.) १४. प्रत्येक कोशांत, अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आणि आनंदमय, असे पांच कोश शरीरांत आहेत. (वेदांतशास्त्र.) १५. वेदरूप कोश. १६. अखेरचें ब्रह्म. १७. सकळ. १८. दोरीवर सर्पाचा मिथ्या भास जसा होतो तसा. १९. कृष्णाच्या शरीरावर. (श्लोक १९ पहा.) २०. तें ब्रह्मपुच्छ. २१. मायादिक. २२. वेगास. २३. 'जो मुकुंद भवबंध हरी तो' असा पाठभेद आहे. २४. भुजंगानें बांधलेला.

[1]भुजगवेष्टित कृष्ण कळेवरी पुरुषचेष्टितही न कळे वरी, ।
दुरुनि देखति लोक समस्त कीं उरगबंधन [2]आनख मस्तकीं. ॥ ४२
नदीतटीं मूर्छित गोप सारे, राया! हरी देखियला असा रे! ।
आक्रंदती वत्स गुरें तटाकीं नेत्रोदकें तो [3]पशुवृंद टाकी. ॥ ४३
असा देखतां कृष्ण गोपाळ गाई, 'अहाहा! अहाहा! अगाई! अगाई!' ।
स्त्रिया बोलती, सर्वही कष्ट भारी करीती, ऱ्हदीं लक्षिती कंठभारी. ॥ ४४
मृतपतीसह जेंवि पतिव्रता स्वमरणीं सकळांसहि तीव्रता, ।
'हरिविणें' म्हणती 'न जिणें बरें' 'मरण येसमयीं [4]गुळखोबरें.' ॥ ४५
'स्वदेह कृष्णाचपुढें पडो हा.' जे ते म्हणे देखुनि पापडोहा, ।
बुडावया धांवति एकवेळा तो [5]राम त्या [6]सिंधुसि होय [7]वेळां. ॥ ४६
[8]बळ तयांसि म्हणे, 'तुम्हि आयका, सकळ [9]गोवेळगौळणिबायका; ।
भय कदापि न या [10]व्रजनायका [11]असुख कोण करी सुखदायका?' ॥४७
अशा [12]रामशब्दासि घेऊनि कानीं यशोदादि संपूर्ण त्या गोपिकानीं ।
दिल्हे प्राण नाहीं तया बायकांहीं, गमे धैर्य त्या रामवाक्येंचि कांहीं.॥४८
नंदादिकां सर्वहि गौळियांला त्या रामवाक्येंच करूनि [13]थांला, ।
विश्वास कांहीं हृदयांत झाला ते पाहती सर्व [14]बळानुजाला. ॥ ४९
गोपिका हरिपदीं [15]अनुरक्ता, त्याविणें त्रिभुवनांत विरक्ता, ।
[16]सर्पवेष्टितअचेष्टितकांता देखतां रडति त्या [17]व्रजकांता. ॥ ५०
हरिसवें रमल्या [18]दिनयामिनी वदति तेंचि परस्पर [19]कामिनी, ।
नयनिं नीर कथारस [20]आननीं, बसलिया यमुनातटकाननीं. ॥ ५१
यशोदेसवें बैसल्या गोपजाया, हरीकारणें सिद्ध देह त्यजाया; ।
यशोदेस त्यांस व्यथा तत्समाना [21]शवाच्या जशा पुतळ्या वर्तमाना.॥५२

---

१. शरीरावर. २. पायांच्या नखांपासून मस्तकापर्यंत. ३. तो पशूंचा समुदाय अश्रुबिंदु टाकी. ४. गुळखोबऱ्यासारखें सहज आणि सुकर. ५. बळराम. ६. शोकसागरास. ७. तीर, कांठ. ८. बळराम. ९. गोवळ=गवळी. १०. कृष्णा. ११. जो स्वत: दुसऱ्यास सुख देणारा त्याला असुख (दु:ख) कोण देणार? (श्लोक २२ पहा.) १२. बळरामाचें आश्वासनपर वचन ऐकून. (श्लोक २३ पहा.) १३. या गौळियांला. १४. बळरामाचा कनिष्ठ बंधु कृष्ण त्याला. १५. प्रेमयुक्त. १६. सर्पानें वेष्टिलेला आणि चेतनेनें सोडलेला असा त्यांचा प्रिय कृष्ण. १७. गोकुलस्त्रिया. १८. रात्रंदिवस. (यामिनी=रात्रि, याम=प्रहर.) १९. स्त्रिया. २०. नेत्रांनीं बाष्पें गाळीत आणि मुखांनीं कृष्णकथा गात. २१. प्रेताच्या. त्या सर्व स्त्रिया निर्जीव पुतळ्यासारख्या दिसल्या--असें तात्पर्य.

देखोनि डोहीं व्रजलोकपाला हाणोनि घेती युवती[1] कपाला, ।
भूमीवरी हाणिति मस्तकांहीं हरीविणें शून्य समस्त कांहीं. ॥ ५३
स्वशोक[2] सर्वांसहि तीव्र ज्ञाची, देखे व्यथा हेचि अति व्रजाची ।
पुरे करी येथुनि लोकलीला निर्दाळिती[3] जे श्रवणें कलीला[4]. ॥ ५४
कष्टी[5] खगोकुल असे स्वनिमित्त भारी, स्त्री बाल वृद्ध पशु देखुनि कंठभारी, ।
राहे मुहूर्तभरि[6] आणिक लोकरीती, पाहे स्वहेतु जन शोक कसा करीती. ॥ ५५
निरूपिलें जेरिति या प्रबंधीं[7], मुहूर्त राहोनि भुजंगबंधीं; ।
बंधांतुनी शीघ्र निवे हरी तो, जो बंध[8] लोकीं अवघे हरीतो. ॥ ५६
स्वतनु फुगवि कांहीं बंधनीं कंठभारी,
तट तट करि त्याचा देह, ते कष्ट भारी, ।
त्वरित उकलि वेढे, सर्प कांपे थरारी,
झडकरि फणिबंधाबाहिरी ये मुरारी[9]. ॥ ५७
क्षणभरी जरि देहें[10] न सूटता[11], तटतटां स्थळिंच्या स्थळिं तूटता[11]. ।
बळ असें कळलें खळसत्तमा[12], दुरुनि लक्षितसे पुरुषोत्तमा, ॥ ५८
डोळे विशाळ अतिवर्तुळ कोपतापें जे स्तब्ध रक्त[13] बहुउष्ण विषप्रतापें, ।
दृष्टांत दे शुकहि मंडुकभाजनाचे[14] तैसेच नेत्र अतिदारुण दुर्जनाचे. ॥ ५९
झाली व्यथा बहुत कोपें[15] मनीं न थारे[16], नासापुटीं[17] निघति दारुण उष्ण वारे, ।
श्वासासवें वमतसे गरला[18] कराळा[19], पाण्यावरी हरिस लक्षितसे निराळा. ॥ ६०
फणिफणावरती[20] व्रजराज[21] तो प्रकरणीं[22] पुढिल्याच विराजतो; ।
करिल दंड उदंड भुजंगमा निजसुखप्रद जो स्थिरजंगमा. ॥ ६१
हा लोकरीतीच विलास[23] देवें केला शुकें दाखविला सदैवें, ।
जो रज्जुसर्पी स्थिरजंगमाचा वेष्टी तया देह भुजंगमाचा. ॥ ६२

---

१. तरुण स्त्रिया. २. आपल्याकरितां झालेला शोक. ३. नाशिती. ४. पातकाला. ५. दुःखी. ६. क्षणभर, अल्पकाळपर्यंत. मुहूर्त=(चांगली वेळ) दोन घटका काळ असा मूळचा अर्थ असून पुढें शुभकाल, अल्प काल–असा अर्थ झाला. ७. या प्रकरणांत, या काव्यांत. ८. संसाररूप बंध. ९. मुरनामक दैत्याचा अरि (कृष्ण). १० सर्पाचा देह (कृष्णापासून.) ११. जेथें 'सू' आणि 'तू' हे वृत्तसुखार्थ दीर्घ केले आहेत. १२. खलश्रेष्ठ. १३. लाल. (कोपानें डोळे लाल होतात हें अनुभवसिद्ध आहे. याच कारणास्तव कोपाचा रंग लाल (रक्त) असा प्राचीन कविसंकेत आहे.) १४. तापलेल्या लाल मडक्यासारखे डोळे ज्याचे. (भाजन=पात्र, मंडुक=मडकें.) १५. राग. १६. राहे. १७. नाकपुडींत. १८. विषाला. १९. भयंकर. २०. सापाच्या (कालियाच्या) फडेवर. २१. कृष्ण. (गोकुळाचा राजा.) २२. पुढच्या म्हणजे तिसऱ्या अध्यायांत. २३. खेळ.

म्हणुनि 'हरिविलासीं[1]' 'लोकलीलाविलास[2]'
त्रिभुवनपति तुझा कीं असा भाविलास[3], ।
पदयुग फणिमाथां[4] जें जगद्धाम[5] नाचे,
सुखकर करु लोकीं शब्द हे वामनाचे. ॥ ६३

अध्याय तिसरा.

(श्लोक.)

आतां शुकाचार्य म्हणे, 'नृपा! हे दंडप्रसंगांत[6] कृपाच पाहे, ।
कीं पादपद्में जगदीश्वरानें तो मर्दिला सर्प रमावरानें[7]. ॥ १
क्रुद्ध तो ऱ्हदजळीं परमेशा लक्षितो दुरुनि साप रमेशा, ।
त्या खळा फणिसही हरि पाहे, ते कथा परिस दिव्य नृपा! हे! ॥ २
थोर वेग वदनीं रसनांचे[8] दुर्विषें प्रतिमुखीं रस नाचे, ।
दंत आंत शिशु[9] भूमिधरांचे[10] प्रांत[11] चाटित असे अधरांचे. ॥ ३
ज्याच्या विषाचे उदकीं चपेटे[12] वनाग्नि ज्याच्या नयनेंच पेटे, ।
देखे असा गर्व भुजंगमाचा निर्माणकर्ता[13] स्थिरजंगमाचा. ॥ ४
जवळि खेळत खेळत पातला, झडप घालुनियां करें[14] घातला. ।
गरगरां धरुनी भ्रमवी[15] नभीं[16] गरुड सर्प जसा धरितां न भी[17]. ॥ ५
अहो! तोही पाहे अवसर[18] डसायास हरिला,
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिला[19]; ।
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या,
गती तत्प्राणाच्या सकळहि गळ्यामाजि[20] चढल्या. ॥ ६
नासिलें भ्रमवितांचि[21] बळातें, क्षीण देखुनि खळा प्रबळातें; ।
शेपुटी धरि अधोमुख हातीं कौतुकें स्वजन सर्व पहाती. ॥ ७
समग्रही सत्त्व[22] अलक्ष[23] यातें नेलें तरी देहबळ क्षयातें; ।

---

१ 'हरिविलास' या काव्यांत. २ हें या विलासाचें (दुसऱ्या अध्यायाचें) नांव होय. ३. मानिलास. ४. सापाच्या (कालियाच्या) मस्तकावर. हा समास संस्कृतप्राकृत शब्दांचा आहे म्हणून चिंतनीय होय. ५. जगताचें घर–आश्रयस्थान; (जगन्निवास–कृष्ण.) ६. शासन करून कृपाच केली. ७. लक्ष्मीपतीनें. ८. जिव्हांचे. ९. लहान. १०. शेपांचे. ११. ओष्ठप्रांत. १२. वेग. १३. चराचरांचा उत्पन्न कर्ता. १४. हात. १५. फिरवी. १६. आकाशांत. १७. भीत नाहीं. १८. वेळ. १९. हरण केला. २०. प्राण कंठांत आले. २१. फिरवितां. २२. बळ. २३. अतर्क्य.

निःसत्व मानी फणि आपणातें तरी बळें तो उचली फणांतें. ॥ ८
अधोमुख श्रीहरि साप हातीं धरी, जसा गोपस्त्रिया पहाती. ।
डसावया जों मुख सांवरीतो वेगें हरी तो सहसा वरी तो. ॥ ९
मुरडुनि नेरडी करें दुजानें, धरुनि असें धरिलेंच पुच्छ ज्यानें ।
रगडुनि फणिकंठ कैटभारी उपरि चढे करि नाट्य नीट भारी. ॥ १०
फणांवरी सारथि पांडवाचा आरंभ मांडी मग तांडवाचा ।
पादांबुजीं देवशिखामणीचा फणींचिया दीप्तिशिखा मणीचा. ॥ ११
उदक चंचळ, चंचळ त्या फणा, फिरवितो फणि जेरित्ति गोफणा, ।
चपळ नृत्य करी वनि मोकळा, सफळ जाकरितां सकळा कळा. ॥ १२
जो प्रवर्तक विलासकळांचा जो कलाप्रद कलासकलांचा, ।
जे शिवादिक गुरु नटनाचे त्यांसि आदिगुरु तो नट नाचे. ॥ १३
जो रची अघटिता घटनातें तो करी फणिवरी नटनातें ।
काय विस्मय विलासमयाचा हा कथारस तया समयाचा. ॥ १४
चपळ तो पळतो उदकावरी, उळखतो खळ तो हरि आवरी; ।
कुळपती लपती फणि ते किती भुजग ती जगतीतळ टाकिती. ॥ १५
आरंभल्या ऊपरि नृत्य काय तेथें करी कौतुक विश्वकाय ? ।
देवीं[16] कसा श्रीहरि पूजिला, हो! श्रोत्यांसही ऊपरि तोचि लाहो. ॥ १६
विमानींहुनी वृंदें वृंदारकांचे नभीं मल्लिकाकुंदमंदारकांचे; ।
फुलांचे समूह खनाथावरी ते बहू वर्षती, ज्यासि लक्ष्मी वरीते. ॥ १७

---

१. या पद्याचें वृत्त 'पुष्पिताग्रा' आहे. हें अर्धसमवृत्त वृत्त आहे. याला 'औपच्छंदसिक' असें ही म्हणतात. याच्या समपादांत दोन नगण, रगण, यगण, आणि विषम पादांत एक नगण, दोन जगण, रगण आणि गुरु अक्षर अशी रचना असते. २. कंठ. ३. दुसऱ्या हातानें. ४. नृत्य. ५. अर्जुनाचा. ६. नृत्याचा. ७. देवशिरोमणि. ८. कांतीच्या ज्वाला. ९. चालक. १०. नृत्याचे. नृत्यकलेचे गुरु शंकर आदिकरून त्यांचाही जो आदिगुरु. ११. सृष्टीतें. १२. नृत्यातें. १३. विलासरूपी. १४. या श्लोकाच्या प्रथम चरणांत 'पळतो,' द्वितीय चरणांत 'खळतो', तृतीय चरणांत 'लपती', आणि चतुर्थ चरणांत 'जगती' या अक्षरांची आवृत्ति आली आहे म्हणून येथें यमक नामक शब्दालंकार झाला आहे. या यमकाचे अनेक प्रकार आहेत. प्रस्तुत पद्य हें 'मध्यमध्यकयमकसमुच्चया'चें उदाहरण आहे. (काव्यप्रकाश—नवम उल्लास—पृ० ५६९ वामनाचार्य झळकीकरांची आवृत्ति.) मुख, गर्भ, पुच्छ, संदष्टक, पंक्ति, इत्यादि यमकाच्या जातींचीं नांवें आहेत. यमकांत 'ड'चे जागीं 'ळ,' 'व'चे जागीं 'ब,' 'र'चे जागीं 'ल,' 'श'चे जागीं 'ष,' आणि 'न'चे जागीं 'ण' आले असतां, वर्णभेद असूनही, यमकहानि होत नाहीं असा नियम आहे. १५. विश्वरूपी. १६. देवांनीं. १७. लाभ. १८. समुदाय. १९. देवांचे.

आणूनि नानाविध पूजनाचे ऱ्हदांत जेथें सुरराज[1] नाचे. ।
ते पूजिती त्या पुरुषोत्तमातें जो पूज्य सर्वां सुरसत्तमातें[2]. ॥ १८
पूजूनि पुष्पादि अनेकरीती स्तोत्रें विचित्रें नमनें करीती, ।
सुवाद्यघोषें सुर गीत नाना गंधर्व गाती करिती तनाना. ॥ १९
सप्रेह गाती विबुधांगनांचे[3] श्रीरंग मध्यें विविधांग[4] नाचे ।
सुरस्त्रियांचे ध्वनि टाळियांचे[5] मर्दी असे हो फणिकाळियाचे. ॥ २०
मृदंग एकी कितिएक वीणा संगीतविद्याकुशलप्रवीणा, ।
नाचोनि मर्दी हरि काळियातें त्या वाजवीती करताळियांतें. ॥ २१
तुडवि काळियमौळिं[6] समस्त[7] कीं म्हणि चुकोनि उरे शतमस्तकीं[8], ।
प्रतिशिरांतुनिही मद[9] नाशितो हर[10] अनंग[11] करी मदनासि तो. ॥ २२
तयामाजि ज्या मस्तकीं तो लवेना[12], पुन्हा त्यास मर्दी जसा हालवेना, ।
करूनी असा नाच देवें नटाचा फणी मर्दिला हाणहाणोनि टांचा. ॥ २३
मुखांतुनी शोणित[13] वाहताहे होऊनियां[14] मूर्छित राहताहे, ।
ऐशाप्रकारें खळगर्वहंता[15] हरी[16] तयाची सगळी अहंता[17]. ॥ २४
शतांशिरांमाजिहि जें लवेना मर्दी तयातें मग हालवेना; ।
होतांचि चेंदा अवघे अहीनें[18] आच्छादिलें मस्तक सत्वहीनें[19], ॥ २५
निजेला मूर्छेनें भुजगपति[20] तो मृत्युशयनीं[21],
मुखें रक्तें ओकी, तरळगरळ[22] क्रूरनयनीं. ।
शतांमध्यें जें जें शिर उचलि निश्वाससहित
प्रभू तें तें मर्दी निजपदतळें अव्यवहित[23]. ॥ २६
शिरें पदाऊपरि सत्वहीनें जाणों फुलें[24] अर्पियलीं अहीनें; ।
केला असा तो फणि नम्र देवें हरूनि त्याचा मद वासुदेवें. ॥ २७
राहिल्या सकळही चपळा या यत्नही न करवेचि पळाया; ।
गर्व सर्व हरिला भुजगाचा आठवे मग गुरु त्रिजगाचा. ॥ २८

---

१. देवांचा राजा. २. देवश्रेष्ठांस. ३. देवस्त्रियांचे. ४. तऱ्हेतऱ्हेचें अंगकौशल्य करणारा. ५. देवांगनांच्या टाळ्यांचे ध्वनि. ६. मस्तक. ७. सगळें. ८. शंभर मस्तकांतील उरेल या शंकेनें. ९. गर्व. १०. शंकर. ११. अंगरहित. १२. वांकेना. १३. रक्त. १४. 'मूर्छाभरें न स्मृतिवार वाहे' असाही पाठ आहे. १५. नाशकर्ता. १६. हरण करी. १७. गर्व. १८. सर्पानें. १९. बलहीनानें. २०. कालिय साप. २१. मृत्यूच्या बिछान्यावर. २२. चंचल अथवा तीव्र विषा. २३. स्वस्थचित्तानें. २४. हें उत्प्रेक्षा नामक अलंकाराचें उदाहरण आहे.

फणाछत्रें ऐसीं विकळ हरिनें जीं तुडविलीं,
मुखें रक्तें, धैर्यें सकळहि मनाचीं उडविलीं; ।
स्वचित्तें तो सर्प स्थिरचरगुरूतेंचि शरण
कळोनीयां गेला न कळति शिरीं तेचि चरण. ॥ २९
नारायणा आठवि सर्पराणा, 'पावें' म्हणे 'गा पुरुषा पुराणा!' ।
स्वयें शिरीं तोचि असें कळेना वेदांसि ज्याचें पद आकळेना. ॥ ३०
धरुनियां उदरीं स्थिरजंगमा तुडवितां बहु कष्ट भुजंगमा, ।
मग नितंबिनि त्या भुजगाचिया शरण येति पित्यास जगाचिया. ॥ ३१
नागिणीच परि मानवनारी कामरूप धरि तो पवनारी, ।
होउनी मनुजरूप रमावें त्या स्त्रियांसह असें करमावें. ॥ ३२
कृष्ण हा त्रिभुवनेश्वर साचा, हा निजात्मरस सर्वरसांचा, ।
हें कळोनि शरणा चरणातें आलिया स्तविति आचरणातें. ॥ ३३
श्री अनंत विविधां अवतारीं जो कथा करुनि केशव तारी, ।
तोचि धन्य करि या भुवनातें वेद गर्जति अशा स्तवनातें. ॥ ३४
देवांचिया या स्तवनासि कानीं घेऊनियां नागिणिबायकांनीं, ।
श्रीकांत नारायण हाचि यातें केलें तिहीं हो! दृढ निश्चयातें. ॥ ३५
ऐकोनि गातां सुरगायकांनीं, कानीं बरें नागिणिबायकांनीं, ।
सर्वेश हा सर्वसमान साचा केला असा निश्चय मानसाचा. ॥ ३६
शरण त्या रिघती समजोनियां, न फणि मूर्छित मूढ निजोनियां, ।
न सुरगायन तें श्रवणीं पडे न हरि हा म्हणुनि स्मृति सांपडे. ॥ ३७
परि शरणागत याचि वासुदेवा भुजगहि तो स्मरनेंचि देवदेवा, ।
जरि शरण तया तरि अहाहा कवण म्हणे मज पीडितो महा हा. ॥ ३८
हरिस जो स्मरतो मनिं कालिया, शरण सुंदरि त्यासचि आलिया, ।
परि [13]परोक्ष भजे फणिराज तो भुजगियां अपरोक्ष विराजतो. ॥ ३९
हुडकितां निज रज्जुहि साप तो गमतसे म्हणऊनिच कांपतो, ।
हरिचि पाहतसे मनिं वाट तो हरिच तो शिरिं अंतक वाटतो. ॥ ४०

---

१. 'स्मरोनीयां' असाही पाठ आहे. २. स्त्रिया. ३. जगाचा पिता झाला. ४. या वृत्ताचें नांव 'स्वागता' असें आहे. ५. मनुष्यरूपिणी. ६. सर्प. (पवन+अरी=वायु+शत्रु. सर्प हा वायूचा शत्रु आहे, कारण तो त्याचें भक्षण करतो. सर्पाला 'पवनाशन' असें नांव अमरकोशांत आहे.) ७. कृष्णाच्या वर्तनातें. ८. वेदही अशीच स्तुति करतात. ९. लक्ष्मीपति. १०. गंधर्व. ११. मला महापुरुषाला १२. त्याच्या स्त्रिया. १३. अप्रत्यक्ष.